म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
अ. नं. २

# श्रीशिवछत्रपति विजय

## नाटक.

९८३ सव ९८३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
ले. ० श्री मा. जोशी
क्रं. नांव - ९८३
सं. क्र. २६९
वि—

छत्रपति विजय
नाटक

९३

# श्रीशिवछत्रपतिविजय नाटक.

( संगीत. )

हें

**रा. रा. अण्णा मार्तंड जोशी**

यांनीं रचिलें,

तें

**मुंबईंत**

**जावजी दादाजी**

यांच्या "निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

( पुस्तकासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपल्याकडे ठेविले आहेत. )

शके १८१५ सन १८९३.

किंमत ९ आणे.

हें दृश्य काव्य

श्रीशिवाजीमहाराजाच्या निस्सीम भक्तांस

अत्यादरें अर्पण केलें असे.

अ. मा. जो.

ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

# प्रस्तावना.

हें श्रीशिवछत्रपतिविजय नांवाचें वीररसप्रधान ऐतिहासिक नाटक मीं यथामति रचिलें आहे. शाइस्तेखानानें पुण्याजवळ तळ दिल्यापासून श्रीशिवाजीमहाराज राज्यासनावर वसतपर्यंतचें कथानक ह्या नाटकांत संक्षिप्त रीतीनें गोंविलें आहे. काव्येतिहाससंग्रहांत छापून प्रसिद्ध झालेल्या चिटणीसकृत श्रीशिवाजीमहाराजांच्या वखरीचा ह्यांतील कथानकास मुख्य आधार आहे. त्यावेळचा काळ, स्थल व लोकस्थिति वगैरेचा करवला तितका विचार करून, ह्यांतील लहान मोठ्या पात्रांच्या, गुण, स्वभाव आचरणादिकांच्या भूमिका तयार केल्या आहेत. ह्यांतील कांहीं पात्रांची भाषा देशी, हेटकरी व उर्दु योजिली आहे. उर्दु भाषेंतील अर्थ ती न जाणणाऱ्या वाचकांस समजावा ह्मणून, तिचा भावार्थ मराठींत दिला आहे. ह्यांतील उर्दु भाषा माझे आर्यबंधु **लाला चतरसिंग शुकदयाळ** ह्यांच्या साह्यानें रचिली आहे.

ह्या नाटकाची मूळ प्रत शोधून त्यांत योग्य फेरफार करण्याची तसदी माझे बाळमित्र रा. रा. **गंगाधर रामचंद्र मोगरे** ह्यांनीं घेतल्याबद्दल मी त्यांचा फार फार उपकारी आहें. तसेंच मित्रवर रा. रा. **काशिनाथ पांडुरंग परब**, रा. रा. **केशव नीलकंठ मोगरे** फर्स्ट बी. ए., व रा. रा. **नारायण हरि भागवत** ह्यांनींही जागजागीं योग्य सूचना केल्यावरून मला त्यांचें अभिनंदन केल्यावांचून राहववत नाहीं. ह्या दृश्य काव्यांत रसिकजनांस रंजविणारें जें काव्यत्व असेल, त्याचें श्रेय वरील मंडळीस असून दोषाचा विभागी मी आहें.

शृंगारिक नाटकांपेक्षां हें नाटक देशहितेच्छु व इतिहासज्ञ जनांस विशेष प्रिय होईल असें जाणून, माझे जिवलग मित्र रा. रा. **विनायक दादोबा पुरंदरे** ह्यांनीं हें रंगभूमीवर करून दाखविण्याविषयीं मला

प्रोत्साहन दिलें, इतकेंच नाहीं, तर प्रयोगास लागणाऱ्या साहित्यांच्या खर्चाचेंही साह्य उदार वृत्तीनें त्यांनींच दिलें व देत आहेत. तसेंच शिवाजीमहाराजांसारख्या पूर्ण स्वदेशाभिमानी, खऱ्या स्वधर्मनिष्ठ वीर पुरुषाचें चरित्र नाटकरूपानें तरी आमच्या लोकांस कळावें व त्यांवर त्यांची पूज्यबुद्धि अधिक बसावी ह्मणून, माझे मित्र रा. रा. **बाळकृष्ण धर्माजी गोपाळे**, रा. रा. **जगन्नाथ लक्ष्मण वैद्य**, रा. रा. **श्रीधर परशराम जोशी**, रा. रा. **गोविंद दिनकर करंदीकर**, रा. रा. **अण्णा काशिनाथ जोशी**, रा. रा. **बळवंतराव आत्माराम**, रा. रा. **बाबाजी लक्ष्मण**, **लाला च. शु.** व **मो. शिवशंकर** वगैरे बंधूंनीं **'आर्यनाट्यकलोत्तेजक'** मंडळीद्वारा ह्या नाटकाचे बरेच प्रयोग येथील रंगभूमीवर करून दाखविले व अझूनही निरीच्छबुद्धीनें त्यांचें पूर्ण साह्य असल्यामुळें मीं त्यांचा परम ऋणी आहें.

ह्यांत जीं चित्रें घातलीं आहेत, तीं माझे बाळमित्र रा. रा. **भिवाजी महादेव** पेन्टर व रा. रा. **बा. आ.** ह्यांनीं काढिलीं आहेत.

हें नाटक वीररसप्रधान असल्यामुळें संगीताचा भाग ह्यांत फार थोडा आला आहे. असो. ऐतिहासिक नाटक रचण्याचा हा माझा पहिलाच यत्न आहे. तेव्हां, गुणज्ञजन दोषांची क्षमा करून, गुणलेशाचा आदर करतील व मीं रचलेल्या संगीत **मृच्छकटिक**, संगीत **उत्तररामचरित्र**, संगीत **सौभाग्यरमा** व संगीत **सावित्री** नाटकांच्या पुस्तकांस जसा त्यांनीं आपला उदार आश्रय दिला आहे, तसाच ह्या **श्रीशिवछत्रपतिविजय** नाटकास ते आपला उदार आश्रय देतील अशी पूर्ण आशा आहे.

मुंबई, ता० ६।३।९३.

**अ. मा. जो.**

# पात्रें.

**सूत्रधार** ( नाटकाचार्य. ) **नटी** ( त्याची स्त्री. ) **शिवाजीमहाराज** ( मराठी राज्याचे मुख्य संस्थापक. ) **मोरोपंत पिंगळे** ( महाराजांचा मुख्य प्रधान. ) **बाळाजी आवजी** ( चिटणीस. ) **येसाजी, तान्हाजी** ( महाराजांचे बाळमित्र व मुख्य सरदार. ) **नेताजी, चिमणाजी, प्रतापराव, बापूजी, हिरोजी, रघुनाथपंत, निराजी, राघोजी** ( महाराजांचे लहान मोठे सरदार व कारभारी. ) **बहिर्जी** ( महाराजांचा गुप्त हेर. ) **संभाजी** ( महाराजांचा वडील मुलगा. ) **निळोपंत** ( एक कारभारी. ) **जानराव, कोंडाजी, मानाजी,** हुजरे, गारुडी वगैरे.

**औरंगजेब बादशाहा** ( दिल्लीपति. ) **जाफरखां** (त्याचा प्रधान.) **शाईस्तेखां** (एक सरदार.) **जमालखां, बहिलोलखां, दलेलखां, पौलादखां, इनायतउल्लाखां** ( बादशाहाचे लहान मोठे सरदार. ) काजी, फकीर, वगैरे व इतर शिपाई.

**जयसिंग** (अंबरचा राणा व औरंगजेबाचा अंकित सरदार.) **भवानसिंग** ( त्याचा कारभारी.) **रामसिंग** (जयसिंगाचा पुत्र.) **जसवंतसिंग** ( औरंगजेबाचा आश्रित एक रजपूत सरदार. ) **भीमसेनशर्मा** ( एक ब्राह्मण. )

**विष्णुशर्मा** ( एक अध्यापक. ) **अंबा** ( त्याची मुलगी. ) **मुलें** ( त्याचे शिष्य. ) **श्रीरामदासस्वामी** ( महाराजांचे गुरु. ) **सईबाई** ( शिवाजीमहाराजांची स्त्री. ) **जिजाबाई** ( शिवाजीमहाराजांची आई. ) **लक्ष्मी** वगैरे दासी.

**रामभट, गोविंदभट** वगैरे ब्राह्मण, हुजरे, चोपदार, स्तुतिपाठक, गडकरी, इ. इ.

म. ग्रं
ि

श्री शिवछत्रपति महाराज.



# श्रीशिवछत्रपतिविजय नाटक.

## अंक १ ला.

### स्थल–रंगभूमि.

#### मंगलाचरण.

॥ पद ॥ ( चाल, "नमामी" )

॥ करो ती मंगल महाशक्ति ।

जगत्कारण जगज्जननी निशिदिनी ऋषिमुनी गाउनी, विनवुनी, प्रार्थुनी, अखिल सौख्यास वरिती ॥ मंगल० ॥ ध्रु० ॥

दुरित भवसंतापहारिणी ।

शौर्या, धैर्या अभया देउनी, विजयिनी, अघविनाशिनी, आनंद-भुवनीं, बसवि निजभक्तां नेउनी, अनयमहिप-मर्दिनी, स्वातंत्र्य-बलदायिनी, सत्य धर्म नय रक्षुनी, देवो विजय शांति ॥ मंगल० ॥ १ ॥

**सूत्रधार**–पुरे हें इतकें मंगलाचरण. आज ह्या रंगमंडपाला ही केवढी सुंदर शोभा आली आहे? रसिक व स्वदेशभक्त जनांचा हा केवढा समाज जमला आहे? आजचा योगच कांहीं विलक्षण आहे! तेव्हां, अशा प्रेक्षकांचें मनोरंजन करण्यासाठीं कोणत्या बरें ऐतिहासिक नाटकाचा खेळ करून दाखवावा? ( अंमळ विचार करून ) हं; तर मग आतां ( चुटकी वाजवून ) विलंब नको. प्रियेला हाक मारावी. ( पडद्याकडे पाहून ) प्रिये,

**नटी**–( प्रवेश करून विनयानें ) काय ह्मणणें आहे?

**सूत्र०**–ह्मणायचें काय आणखी ? ह्या सुंदर रंगमंडपांत जमलेल्या नाट्यप्रिय प्रेक्षकांच्या मनांला रंजविणाऱ्या अशा कोणत्या प्रकारच्या नाटकाचा खेळ करून दाखवावा वरें प्रिये ?

**नटी**–मला हो काय पुसायचें यांत ? थोडीं का आहेत नाटकें आपल्यापाशीं रचलेलीं ? ह्मटलें तर, त्या सगळ्यांचीं नांवें घेतां घेतांच मला एक सगळा दिवस लागायचा.

**सूत्र०**–खरें; पण तीं माझींच ना सारीं रचलेलीं ? मग मला त्यांतून बरें वाईट कसें निवडून काढतां येणार ? ह्मणून तुला पुसतों.

**नटी**–असें. माझ्या मनाजोगेंच का व्हायचें आहे आजचें नाटक ?

**सूत्र०**–तसेंच का होईना.

**नटी**–( अंमळ विचार करून ) असो; तर मग प्राणनाथ,

॥ **पद** ॥ ( "जलभरनजात" या चालीवर. )

समरधीर जे वीर धुरंधर । कीर्तिनभींचे केवळ दिनकर ॥ ध्रु० ॥
जन्मभूमि निजधर्म जयांला । असती प्राणाहुनिही प्रियकर ॥ स० ॥
महापुरुषार्थी, चतुर, सत्यप्रिय । धैर्यें ज्यांच्या लज्जित गिरिवर ॥स०॥
ऐशा आर्यजनांचीं चरितें । असती आपुल्या देशा हितकर ॥ स० ॥
नाट्यप्रबंधीं तीं रचितांना । होतिल स्वजनां अधिक बोधपर ॥ सम० ॥

**सूत्र०**–प्रिये, माझा पण तोच विचार आहे. पुनः, कित्येक रसिकांचीही अशीच आज्ञा झाली आहे.

**नटी**–तर मग सगळें ठीकच जुळलें ह्मणायचें ! वरें पण प्राणनाथ,

॥ **दिंडी** ॥

कवण वीराची आज चरित-माला ।
ग्रथुनि रसिकां अर्पिण्या सिद्ध झाला ॥
नाम सांगुनि त्या वीरनायकाचें ।
करा आनंदित कर्ण या जनांचे ॥ ३ ॥

**सूत्र०**–आपल्या श्रीशिवछत्रपति महाराजांची. कारण,

॥ श्लोक ॥

होता जो निजदेशभक्त विजयी गाजी शिवाजी, जया ॥
होते म्लेच्छ सदैव भीत, ह्मणती "सैतान" ऐसें जया ॥
गाई, ब्राह्मण, देश, धर्म, सुजनां जो दक्ष रक्षावया ॥
चिंताग्नींत मनास जो वस ह्मणे औरंगजेबाचिया ॥ ४ ॥

आणखी—

॥ दिंडी ॥

पूर्ण आंगीं पाहून देशभक्ति ।
आर्यभूची ह्या तोच करिल मुक्ति ॥
ह्मणुन झाली ज्या साह्य महाशक्ति ।
सहज तेणें त्या होय जयप्राप्ति ॥ ५ ॥

**नटी**–पण प्राणनाथ, त्यांच्या चरित्रांतील कोणता भाग नाटकरूपानें व्हायचा ?

**सूत्र०**–योग्य प्रश्न केलास. ऐक,

॥ साक्या ॥

लावी शह शाइस्तेखाना । अवचित घालुनि छापा ॥
स्वस्थानीं तो जाय पळोनी । भिऊनि श्रीशिव भूपा ॥
तेणें दिल्लिपती । कोपे हरिसा चित्तीं ॥ ध्रु० ॥

बहु कपटें औरंगजेब त्या । नेउनि बंदीं ठेवी ॥
परि तो तेथुनि मुक्त होउनी । निजबल यवनां दावी ॥
मिळवी राज्यपदा । हरी जनदुःखापदा ॥ ध्रु० ॥ ६ ॥

हें कथानक ह्या 'श्रीशिवछत्रपतिविजय' नाटकांत येईल.

**नटी**–तर मग खचितच,

॥ पद ॥ ("कोनगली गये शाम" ही चाल.)

स्तुत्य यत्न आपुला । असे हा ॥ स्तुत्य० ॥

विषयी, उदासी, आळशी जे नर। सद्बोधची त्यांला ॥ असे० ॥
परि यवनांचें नांव ऐकुनी। वाटे भीति मनाला॥ ७॥ असे० ॥
( आंतून ) हा मित्रे—

॥ श्लोक ॥

न्हाणीन भूमि रुधिरें रिपुरुंडमाला।
अर्पूनियां करिन तुष्ट नगेंद्रबाला ॥
होतां स्वराज्य बघुनी निजलोचनांनीं।
ठेवीन भूमिवर मी मग ही भवानी ॥ ८ ॥

**नटी**-( सभय ) प्राणनाथ! मेघासारखी ही कोणाची वरें भयंकर गर्जना? ( पाहून ) अगबाई! चौताळलेल्या सिंहासारखा हा इकडेच येत आहे! पाहिलीतका याची मुद्रा-किती भयंकर दिसते आहे ती?

**सूत्र०**-हो! हो!! दक्षयज्ञाचा नाश करणारी उग्र शिव मूर्तिच! हा महावीर-मोठ्या आवेशांत आला असून, अगदीं जवळ आला! चल चल तर मग आतां. ( जातात. )

---

# प्रवेश १ ला.

## स्थल-राजगड ( विचारगृह. )

**शिवाजी**-( आवेशानें आत्मगत 'न्हाणीन भूमि' हा पूर्वोक्त श्लोक ह्मणतो व )

॥ श्लोक ॥

नीचा औरंगजेबा, अतितर कुटिला, दुर्जना हे कृतघ्ना, ।
दुष्टा, कापट्यमूर्ते, मजवरति अशा आणिसी काय विघ्नां ॥
नाहीं मी भीत नाहीं, लवभर तुजला, नाश माझा कराया
ज्या ज्या तूं योजिसी त्या तव कपटकृती सर्व जातील वायां ॥९॥

तो दुष्ट हरामखोर, पुण्यापाशीं तळ देऊन राहिला आहे काय?

चिंता नाहीं. अफझुलखानाची जी वाट, तीच जर त्याची न लावीन, तर मी शिवाजीच नाहीं. हा लांडगा, सिंहाच्या गुहेंत आणखी किती दिवस राहील? महिषासुराच्या रक्तपानानें श्रीभवानी जशी शांत झाली, तशी (उपसून) ही माझी भवानी, त्याच्या रक्तपानानें शांत करीन, तेव्हांच मी शांत होईन. विजापूरकरांच्या सर्व खट-पटी जशा फुकट गेल्या, तशाच ह्याच्याही जातील. असे शेंकडों शाईस्तेखान जरी चाल करून आले, तरी हा एकटा शिवाजी त्यांना त्रस्त आहे.

**हुजऱ्या**–(प्रवेश करून अदबीनें) वहिर्जी आल्याती सरकार.

**शिवाजी**–कोण वहिर्जी! येऊं दे आंत.

**हुज०**–जी महाराज. (जातो; व वहिर्जी येतो.)

**वहिर्जी**–(मुजरा करून अदबीनें बाजूस उभा रहातो.)

**शिवाजी**–ये; वहिर्जी, असा जवळ ये; इतका दूर कां?

**वहिर्जी**–(अमळ जवळ येऊन) पायापच हाये महाराजांच्या. (शिवाजीची क्रूर व विचारी मुद्रा बघून मनांत) महाराजांचा चेहरा, तापलेल्या लोखंडावानी अक्शी लाल भडक दिसतुया, अन मनत्री कंच्या खवाल इचारामंदी गुतलया!

**शिवाजी**–त्या विजापूरकरांची खटपट थंड झाली न झाली तोंच, बघतोसना, औरंगजेबानें कशी कावेबाजीची धामधुम मांडली आहे ती?

**वहिर्जी**–त्ये पुसुच नगा, सरकार! इजापुरकरापक्षी त्यो मोगल, लई मसलती अन कावबाज दिसतुया.

**शिवाजी**–कावेबाज ह्मणजे? विजापूरकर हे त्याच्या पुढें कांहींच नाहींत! त्याच्या सारखा कपटी–दुष्ट–व हिंदुधर्मद्वेष्टा बादशाहा–नव-

खंड पृथ्वींत मिळणार नाहीं. त्याचीं अघोर व निंद्य कारस्थानें ऐकून व वघून, ज्याच्या मनाचा संताप होऊन त्वेष येणार नाहीं, असा एकही माणूस ह्या दुनयेंत मिळणार नाहीं. मोठा राज्यलोभी ! प्रत्यक्ष बापाला ज्यानें बंदींत ठेविलें; सख्या भावांचा ज्यानें वध करविला; त्या नीचाला–राक्षस न ह्मणावें तर काय ह्मणावें ? इतकेंच करून थांवला नाहीं. मुसलमानी धर्म, सगळ्या हिंदुस्थानभर व्हावा ह्मणून, त्याचा सतत प्रयत्न चाललाच आहे. त्यांत, त्या नराधमानें जिकडे तिकडे किती जुलूम मांडला आहे ? खरोखर वहिर्जी, आपल्या धर्माची पायमल्ली व हा असा छळ वघून, दुःखसंतापानें माझ्या आंगाची कशी–आग होऊन राहिली आहे. सूड उगविण्यासाठीं आवेशानें माझें मन–इतकें कांहीं खवळून राहिलें आहे कीं, रात्रंदिवस मला–कांहींएक सुचत नाहीं.

**वहिर्जी**–महाराज ह्मनल्यात त्ये समद खर हाये. मोगलाचे धारकरी, धरमगुरु, अन काजी, इक्ते पुंड झाल्याती किं, हिंग हिंदु ह्मनजे त्येना केरकचऱ्यावानी वाटल्याती केरकचऱ्यावानी. देसामंदी जत तत, त्येनी महाराज अक्शी लई जुलूम मांडलया ! धरमाइशीं तर पुसुच नगा–आक्शी वाटुळ ! वगितला हिंदु, किं धर त्याला, काप शेंडी, तोड जानव, चाट गंध, थुक तोंडामंदी, कर सुंता; अस कररून–शेकडो हिंदु धडाड मुसलमान करल्याती ! शेकडो देव अन देवळ, मोमोडून–तोतोडून–आक्शी जमीन दोस्त करल्याती, अन तत तव्वाच मशिदी वांदल्याती ! गाईवर जो कसावाचा आक्शी जुलूम व्हतुया–त्यो वगून सरकार–माझ काळीज कस–चरार व्हतया वगा ! देसभर आक्शी धुंद मांडलीया नोडग्यानी !

**शिवाजी**–ही धुंद व हा जुलूम हीं साफ नाहींतशीं होतील, ते-

व्हांच आपल्या मुलुखांत सगळ्या ठिकाणीं शांतता होऊन सर्व गोष्टींचा जम बसेल. बरें पण बहिर्जी, त्या खानाच्या गोटांतील काय काय बातमी मिळविली आहेस, ती सांग बघूं अगोदर.

**बहिर्जी**–महाराज, त्या खानाची फवाज लई दांडगी हाये. पाऊन लाख त घ्वाडा हाये घ्वाडा संग. तिरंदाज, बरचिवाल, बरकंदाज, आडहत्यारी, हत्तीचा, उटाचा, अन घ्वाड्याचा तोफखानाबी आक्शी उमदा हाये. धारकरी अन बाजारबुनगबी मस्त हायती. लसकरचा तळ, दोन गांव लांब अन दिड गांव रुंद पडलया! बत्तीस कोट त खजिना आनलिया खजिना संग–जनु दुसर शेरच बसलिया पुन्याप!

**शिवाजी**–शाबास! गनिमाकडची तुला बरीच बातमी मिळाली आहे. (अमळ विचार करून.) तरी पण मी तुला असें पुसतों बहिर्जी, त्याच्या फौजेचा बंदोबस्त व सावधपणा हीं कशीं काय आहेत? खुद्द खान कशा बंदोबस्तानें राहिला आहे? ह्याचाही तूं गुप्तपणें तपास केलाच असशील.

**बहिर्जी**–तीबी खटपट करनार; पुन सरकार–इक्ल्यामंदी जुन्नरचा गड घेन्यासाटी खानाच मस्त धारकरी निघाल. जाता जाता तेनी अदुगर चाकनच्या गडावर मोरचा लावला सरकार! पंधरा रोज सारखा तोफांचा धडाड लावलया गडावर; पुन त्यो कसला सूर गडकरी फिरगोजी! मोगलांची आक्शी दादच लागू देईना!

**शिवाजी**–आपला फिरंगोजी नरसाळा, तसाच मोठा बाणेदार धारकरी आहे! मरेपर्यंत तो मागें हटायचा नाहीं. हें वर्तमान कळविण्यासाठींच तूं तो तपास करणें सोडून इथें आलास वाटतें?

**बहिर्जी**–(अदबीनें) व्हय सरकार. तोफच्या माऱ्यानबी त्यो मोगलाची आक्शी दाद लागू देयीना; तवा गनिमान गडाच्या तटा-

खाली, मोठमोठ सुरुंग पाडुनशी, उजव्या बाजूचा बुरूज पाडला! तरीबी त्या सूर मर्दान आपला धीर न्हाइ खाडला. राराहून त्यो गब्रू गनिमावर हल्ला करीतच व्हता. पुन सरकार! मोगलाच धारकरी पडल मस्त, अन गडालाबी पडल ध्वारल खिंडार–तवा मातुर त्यचा अक्शी नाविलाज झाला बगा! इ हार बगून सरकारच्या पायाप जाहिर करन्यासाटी तकुंड तसाच मागें परतलो.

**शिवाजी**–(अमळ खिन्न होऊन) असो! (विचार करून) चिंता नाहीं. लौकरच मिळेल त्याला ह्याचा मोबदला. बहिर्जी, बघ–गनिमाच्या गोटांतील एकंदर बातमी मिळेल, तर ह्या दहापांच रोजांच्या आंतच त्याला तेथून घालवून देऊं.

**बहिर्जी**–(अमळ विचार करून) ह्यो आपला पायाचा चाकुर त्ये काम करायला आक्शी तयार हाये. हर हुन्नर करुनशी त्याच्या गोटाचा खडान् खडा तपास करतुया बगा, सरकार!

**शिवाजी**–(हर्षानें) शाबास! ह्मणूनच मी तुला हें काम सांगितलें.

**बहिर्जी**–(हात जोडून) हा समदा सरकारच्या पायाचा परताप. तर मग महाराज, हुकूम व्हावा आता बंद्यासनी.

**शिवाजी**–जा. श्रीभवानी तुला यश देईल.

**बहिर्जी**–(मुजरा करून जातो.)

**शिवाजी**–(स्वताशीं) बहिर्जी तिकडची बातमी घेऊन येईपर्यंत आपण स्वस्थ बसूं नये. (अमळ विचार करून) हं; आपल्या मुलुखांत गनिमानें जशी पुंडाई मांडली आहे, तशीच त्याच्या मुलुखांत मांडावी; ह्मणजे तो जेरीस येईल. 'जशास तसें' झालेंच पाहिजे.

**हुजऱ्या**–(प्रवेश करून) महाराज, पालकर आल्याती.

**शिवाजी**–घेऊन ये त्यांना इथें.

**हुज०**–जी. (जातो व नेताजी प्रवेश करून मुजरा करतो.)

**शिवाजी**–या पालकर. तुह्माला उशीर होईलसें वाटलें होतें; पण नाहीं, अगदीं वक्तशीर आलांत.

**नेताजी**–मी मघाच आलुया.

**शिवाजी**–पालकर, तुमच्याशीं गुप्त ठेवण्यासारखें कांहींच नाहीं. खानाच्या गोटांतली कुल वातमी समजावी ह्मणून, आपल्या बहिर्जीशीं बोलत होतों.

**नेताजी**–या कामामंदी बहिर्जीचा आक्शी हात खंडा हाये. त्यो गब्रू, तकुंड खडान् खडा खबर तवाच घेऊनशी येईल बगा.

**शिवाजी**–सरनौबत, आपल्या मुलखांत त्या खानानें फारच धुंद मांडली आहे! पुणें व त्याच्या आजूबाजूचा बराच भाग त्यानें सर केला! चाकण व जुन्नरचे किल्ले काबीज करण्यासाठीं त्याची फौज रात्रंदिवस एकसारखी लढत आहे. चाकणचा किल्ला सर केल्याची बातमी बहिर्जीनें मला नुकतीच सांगितली! गनिमाची फौज आपल्यापेक्षां दुप्पट आहे ह्मणून ऐकतों; तेव्हां, त्याच्याशीं उघड सामना करितां येत नाहीं. तरी पण, नाउमेद होतां कामाचें नाहीं. आतां, आपल्यांतील निवडक निवडक बारगीर व शिलेदार, ह्यांच्या पांच पन्नास टोळ्या करून, त्या मोंगलाईत जागजागीं पुंडाई व लुटालूट करण्यासाठीं पाठवाव्या. असें केल्यानें अर्थात् त्याला आपल्या मुलखाचा बचाव करावा लागेल व इकडचा जोरही तितका कमी होईल. इतक्यांत संधि साधून, बघतां येईल खान पुण्यापाशीं किती दिवस रहातो तें?

**नेताजी**–हा महाराजाचा ब्येत आक्शी बराबर हाये, बगा. खा-

नान पुन्याप तळ दिल्याची खबर ऐकल्यापुन, माझ समद धारकरी-कस कस-आक्शी तय्यार हायती. महाराजांच्या हुकमाची मातुर वाट बगत्याती.

**शिवाजी**-तर मग आतां, तुमच्यांतील तीन हजार शिलेदार आणि पांच हजार बारगीर, ह्यांच्या लहान लहान टोळ्या करा. त्यांनीं मोंगलाईंत जाऊन, जागजागीं इतकी धुंडाई व लुटालूट चालवावी कीं, खानालाही वाटेल कीं, मऱ्हाठेही मोठे धूर्त व पाणीदार आहेत.

**नेताजी**-( आवेशानें ) भवानीच्या किरपेन अन महाराजांच्या पायाच्या परतापान त्या नोब्यासनी मऱ्हाटशाई अशी अशी दावतुया किं, हिंग सपनामंदीबी मऱ्हाट त्येच्या उरावर तलवार अन भाल उभसुनशी-कस कस-आक्शी उभ हायती.

**शिवाजी**-( हर्षानें ) सरनौबत, तुमच्यांत तशीच मर्दुमकी वागत आहे.

**नेताजी**-महाराजांनी मातुर हकड गनिमाची मसलतीन अशी लांडगतोड करावी किं, आक्शी ब्येजार ब्येजार होऊन, गनिमान हूं-तवाच माग परताव.

**शिवाजी**-त्याविषयीं तुह्मी अगदीं बेफिकीर असा पालकर. मोंगलाईत जागजागीं तुमची लुटालूट व इकडे गनिमावर आमचा अचूक बेमालूम छापा-ह्यांचा कसा अगदीं बिनूतोड जम बसवितों-बघा तर खरा.

**नेताजी**-तर मग, मी लागतुया आपल्या कामगिरीला.

**शिवाजी**-हो, हो; बेफिकीर. मी पण बहिर्जी येईपर्यंत करतों इकडे सगळी कडेकोट तयारी. जा; पालकर, या फत्ते करून.

**नेताजी**-जी. ( जातात. )

---

संग्रहालय

## प्रवेश २ रा.

### स्थल–शाईस्तेखानाचा गोट.

**शाईस्तेखां**–देखो जमालखां, आजतक मैं यूं जानता था के, इन् मन्हेटोंमें गाजी और जवामर्द षक्स नहीं होंगे; लेकिन् वह फिरंगोजी नरसाला, वडा दिलेर और जंगी षस्क देखनेमें आया! उस्की वहादुरी और जवामर्दी देख्कर यह माल्रम् होता है के, हमूरा शेवाजीके ऐसे वहादुर जवामर्द वहोत् होंगे. वेपक्, शेवाजी वडा काविल् और जंगी षक्स माल्रम् होता है!

[ वघ जमालखां, ह्या मराठ्यांत शूर वीर नसतील असें इतके दिवस मला वाटलें होते. पण नाहीं; तो फिरंगोजी नरसाळा, मोठा साहसी व महा शूर दिसून आला! त्याची वहाद्दरी व शौर्य वघून असें वाटतें कीं, शिवाजीच्या पदरीं असे वहाद्दर शूर मर्द पुष्काळ असतील. खचीत शिवाजी मोठा हुशार व शूर मराठा आहे! ]

**जमालखां**–( उठून आदवीनें ) हुजूरका फरमाना वजा है. लेकिन्, रूवरू खडे होके जंग मचानेवाले जवामर्द, उन् मन्हेटोंमें वहोत् कम निकलेंगे. छुपछीपके हम्ला करनेमें वे लोग वडे मर्दकवी हैं. आजतक् शेवाजीने हर किसीकेभी साथ जंग किया नहीं. हरवक्त हम्लाही करता है. देखिये सरकार, शेवाजी जो वहादुर और जवामर्द है, तो आप तशरीफ लाये हैं, यह सुन्कर, पहाडोंमें मानिंद चुहोंके छिपाहुवा किस्लिये वैठा है? वहादुर सिपाहीका यह काम नहीं है. कुछ् पर्वा नहीं जान् जावे तोभी, लेकिन् बेषक् दुष्मनोंका मुकाविला करना येही काम् जवांमर्दोंका है.

[ आपलें सांगणें योग्यच आहे. पण, समक्ष लढाई करणारे शूर त्या मराठ्यांत फारच थोडे निघतील. शिवाजी आजपर्यंत कोणाशींच उघडपणे लढलेला नाहीं. नेहमी तो छापेच घालीत असतो. पहावें सरकार, जर तो वहाद्दर व शूर आहे, तर मग आ-

पण आल्याचें वर्तमान ऐकून, उंदरांसारखा डोंगरांत जाऊन कां लपला आहे? बहाद्दर शिपायाचें हें काम नाहीं. जीव गेला तरी बेहत्तर, पण शत्रूशीं उघड उघड सामना करणें ह्यासच जवामर्दी म्हणतात. ]

**शा० खां**–बेषक् शेवाजी अपनेसाथ मुकाबिल् आकर लडनेवाला नहीं. मगर, उस्के पहाडी किले, बडे उंचे और मुस्तकिम हैं! देखो! चाकनका छोटासा पहाडी किला, लेकिन् बहोत् दिक्कतसे वो अपने कवजेमें आया. ऐसेही उस्के बहोत्से पहाडी किले हैं, वे हात आने बडा मुष्किल हैं!

[ निःसंशय शिवाजी आपल्याशीं उघडपणें लढायचा नाहीं. पण, त्याचे डोंगरी किल्ले, फार उंच व मोठे मजबूत आहेत! पहा! चाकणाचाच तो लहानसा किल्ला—मोठ्या कष्टानें आपल्या हातीं लागला. असे त्याचे पुष्कळ डोंगरी किल्ले आहेत; ते हातीं येणें फार मुष्किल आहे! ]

**जमालखां**–तोभी पीछे हट्नेका कुछ् काम नहीं. बारूद गोला और लश्कर अप्नेपास कुछ् कम् नहीं हैं; और अप्ने जंगी सिपाहियोंके आगे दालरोटी खानेवाले कमकूवत् मऱ्हेटोंकी क्या ताकत् है के वे फतह करेंगे?

[ तरी पण मागें हटायचें कांहीं कारण नाहीं. दारूगोळा व लश्कर आपल्यापाशीं कमी नाहीं. आणखी आपल्या शूर शिपायांसमोर डाळभाकर खाणाऱ्या निर्बळ मराठ्यांची काय शक्ति आहे कीं, ते जय मिळवितील? ]

**शा० खां**–बेषक् तुह्मारा फरमाना दुरुस्त है. खैर. अब् यहां कयाम् करना मुनासिब् नहीं; शेवाजीके कवजेमें जित्ना मुल्क है, वो फतह करके, और उस्पर अप्ना अमल बिठाके षहर देहलीमें हरसूरत् उस्को पावजंजीर करके हुजूरवालामें पेश् करें. इत्ना किये वगैरे मुल्क दक्खन् अप्ने हात आनेका नहीं.

[ निःसंशय, तुमचें म्हणणें खरें आहे. असो; आतां इथें स्वस्थ बसणें टीक नाहीं. शिवाजीच्या ताब्यांत जितका मुलुख आहे, तितका सर्व सर करून, त्यावर आपला अमल

बसवायचा व हरयुक्तीनें त्याला पकडून, हातापायांत बिड्या घालून औरंगजेब बादशाहाजवळ नेऊन हजर करायचें. असें केल्याशिवाय दक्षिण देश आपल्या हातीं लागायचा नाहीं. ]

**बहिलोलखां**–जनाबेआली, जिस् पहाडी किलेमें वो काफीर रूपोष हुवा है, उस्का तालाश करनेसे यूं मालूम् हुवाके, वो मकान् बहोत् सख्त है; कबजेमें आना बडा दुष्वार है !

[ महाराज, ज्या डोंगरी किल्ल्यांत तो नीच लपून बसला आहे, त्याचा तपास केल्यावरून असें समजतें कीं, तें ठिकाण फारच मजबूत आहे. तें हातीं लागणें फार कठीण आहे । ]

**जमालखां**–जनाब्, जिस् पहाडी किलेमें वे नामर्द भगोडे छिपेहुये हैं, वो किला चारोंतरफसे घेरना; और दालआटा बंद करना. यूं करनेसे काहांतक वे उस् मकान्में रहेंगे ? फौरन् अप्ने कब्जेमें आवेंगे.

[ महाराज, ज्या डोंगरी किल्ल्यांत ते पळपटे भ्याड लपून बसले आहेत, तो किल्ला चौफेर घेरावा व त्यांचा खुराक बंद करावा. असें केल्यानें आणखी किती दिवस ते तिथें रहातील ! लौकरच आपल्या ताब्यांत येतील. ]

**शा० खां**–इन्शाल्ला: ! येही सला मंजूर है. क्यों ? काजीसाहेब, इस गुफ्त्गोमें आप्की क्या राय है ?

[ ईश्वर करील तर । हीच मसलत योग्य आहे. कां ? काजी साहेब, आपलें काय म्हणणें आहे ? ]

**काजी**–( दाढीवर हात फिरवून ) क्या बात है ? आप्का फरमाना माकूल है. बहर सूरत कत्ल करना काफीरका वाजीब है. वास्ते खुदाके लडो; और तमाम् काफिरोंको कत्ल करो के हो जावे दीन् इलाहीका. उन्होंने जित्नी जेयादती तुम्पर कीहै, वैसी तुम्भी उन्पर करो.

[ काय गोष्ट सांगावी ? आपलें सांगणें वाजवी आहे. कसेंही करून दुष्टांची कत्तल करणे योग्य आहे. ईश्वरासाठीं लढा; व सर्व अधर्मांचा वध करा, म्हणजे ईश्वरीधर्म सर्वत्र होईल. त्यांनीं तुम्हांवर जितका जुलूम केला आहे, तितका तुम्हीही त्यांच्यावर करा. ]

**सर्व**–मरहवा ! हजरत् ! ! इसबमुजब् करनेसे खुदा राजी है. शुकर् परवरदिगारका ( इतक्यांत आंतून शब्द होतो. )

[ फार चांगलें ! भले वृद्ध ! ह्याप्रमाणें केल्यानें परमेश्वर प्रसन्न आहे. परमेश्वराची मेहरबानी ! ]

## ॥ दोहा ॥

**मत् कर किसीपर जबरदस्ती। किसीका दिल् दुखाना नहीं**
**अल्लाहने तुझको पैदा किया। उसीको मुह बताना है ॥**

[ कोणावर जुलूम करूं नको, कोणाचें मन दुखवूं नको. कारण, ज्या ईश्वरानें तुला उत्पन्न केलें आहे, त्याला शेवटीं तोंड दाखवायाचें आहे. ]

**शा० खां**–( ऐकून ) यह कोई फकीर आया है. यूं मालूम् होता है ! देखो तो वो कौन षक्स है ? सुभान्अल्ला: ! जवान् इसकी क्या शीरीन् है ?

[ हा कोणी फकीर आला आहेसें वाटतें ! पहा बरें तो कोण आहे तें ! ईश्वर करो व तसें असो ! ह्याची वाणी किती मधुर आहे ? ]

**जमालखां**–जी हां. बसरोचष्म्, अभी तालाश् करता हूं. चोपदार, तालाश् तो करो यह क्या कलाम् है ?

[ जी होय. महाराज ! आतां तपास करतों. छडीदार, बाहेर कोण आला आहे त्याचा तपास कर पाहूं. ]

**चो०**–बहोत् खूब्. ( जाऊन परत येतो ) वो कोई फकीर है.

[ फार उत्तम. तो कोणी फकीर आहे. ]

**शा० खां**–बेहेत्तर, ले आवो उन्को इधर.

[ चिंता नाहीं. घेऊन ये त्याला इथें. ]

**चो०**–जी हां. (जातो व त्याला घेऊन येतो.)

**फकीर**–

॥ दोहा ॥

**आये थे इस् बागमें। दाग हिजरां ले चले ॥**
**खाक सिरपर दाग दिलपर। सीना बिरियां ले चले ॥२॥**

[ ह्या विश्वरूप बागेंत आलों, पण मनावर कलंकाचा डाग व डोक्यावर माती, व हृदयावर डाग व तें भाजलेलें बनवून जात आहें. ]

**शा० खां**–( उठून ) ऐ साहेब, आना आपूका ऐन मुबारिक् हो.

[ अहो महाराज, आपलें येणें शुभ असो. ]

**फकीर**–रसुलिल्लाः! आपका मुबारिक् वाद है; और काफीरका कत्ल करनेवाला खुदाही मालीक है.

[ ईश्वर करो! आपला सदा विजय असो. दुष्टांचा नाश करणारा परमेश्वर समर्थच आहे. ]

**शा० खां**–( लवून ) सच् है. बैठीये.

[ खरें आहे. बसावें. ]

**फकीर**–( बसतो. )

**शा० खां**–ऐ बंदे खुदाके, आपूका आना कहांसे हुवा, और आपूकी क्या मर्जी है? दिल् खोलकर इस् बंदेको फरमाईये.

[ अहो ईश्वराचे सेवक, आपण कोठून आलांत व आपली काय इच्छा आहे? मोकळ्या मनानें ह्या सेवकाला आज्ञा करावी. ]

**फकीर**–मुझ बंदेकी बूदोबाष् हिंदकी है; और अव्वलसेही मैने यह फकीरी इख्तियार किई है. तमाम् दिन बंदगी खुदाकी नेक इमान्से बजालाना, और जो कुछ मयस्सर हो, सो खाना. इस् दुनयाफानीमें साथ अपूने क्या आयेगा? सबसे प्यारा यह बदन, सोभी खाक होनेवाला है–देखीये,

॥ दोहा ॥

खाकका पुतला बना । खाककी तसबीर है ।
खाकमें मिलजायेंगें । खाक दामनगीर है ॥

खैर. अब दिल्में येही है के, कोई आप्सरीका मुनीम् मिले, तो मक्के शेरीफको जाके, पाक रसूले खुदाकी बंदगी करना, और पेगंबरे खुदाकी कब्रको देखकर, तमाम् फकीरोंको सखावत् कर, आखिरतक् इस् जहांनमें हमेश निमाज बंदगी करते करतेही मरजाना.

[ ह्या बंद्याची जन्मभूमि हिंदुस्थान. बाळपणापासूनच मी ही फकिरी घेतली आहे, सर्व दिवस पवित्र मनानें व दृढ भक्तीनें ईश्वराची सेवा करावी व जें मिळेल तें खावें. ह्या नाशिवंत दुनयेंत आपल्या बरोबर काय येणार आहे? सर्वांहून प्रिय असें जें हें शरीर, तेंही शेवटीं माती होणार. पहा, "हा पुतळा मातीचाच बनला आहे, मातीचेंच हें चित्र आहे; शेवटीं हें मातींतच मिळून जाईल व ह्यानें मातीचाच छेडा धरिला आहे." असो; आतां मनांत इतकेंच आहे कीं, आपल्या सारखा कोणी दाता मिळाल्यास पवित्र मक्केच्या यात्रेस जावें व पवित्र पेगंबर साहेबांची व ईश्वराची सेवा करावी. पेगंबर साहेबांची कबर बघून व तेथील सर्व साधूसंतांस दानधर्म करून शेवटपर्यंत ह्या अपवित्र दुनयेंत राहून सदा ईश्वराची सेवा करून मरावें. ]

**शा० खां**–सुभान्अल्ला: ! इस दुनयादारीमें आप्का आना बहोत् कारेसवाब् है. शाह औरंगजेब, अप्ने मजहब महंमदीके बडे शाहिन्शाह मोअज्जम हैं. हुजूर पुरनूरने अप्ने तमाम् सरदारोंको इरशाद् फर्माया है के, दीन् आहमद्दीके षोरायेआफाक् होनेकेलिये चाहे फकीर हो, या दुनियादार हो, उन्को हरतऱ्हासे मदत करना. कुल् हिंदुस्तान् तावेदार मुती यहले इसलाम् और कलामे शरीफके फरमाबरदार कब् होयेंगे यह आरजू शाह सलामत् बजानो दिल् चाहतें हैं.

[ ईश्वर तसें करो । ह्या संसारांत आपलें येणें अगदीं योग्य आहे. शाह औरंगजेब हे आपल्या मुसलमानी धर्माचे मोटे बादशाह आहेत, व स्वधर्माचे पुरे अभिमानी आहेत. त्या तेजस्वी बादशाहानें आपल्या सगळ्या सरदारांस सक्त आज्ञाच दिली आहे कीं, महमदी

धर्म सर्वत्र व्हावा म्हणून सारखा प्रयत्न करा; फकीर अथवा गृहस्थ जरी असला, तरी त्याला सर्वस्वी मदत करा. शाहांची मनापासून हीच इच्छा आहे कीं, सर्व हिंदुस्थान मुसलमानांचें अंकित होऊन कुराणाचें दास केव्हां होईल ? ]

**फकीर**–आजतक् जित्ने वादशाह यहले इस्लाम् होगये हैं, उन्होंमें औरंगजेवके जैसा यहले दीन् महंमुदीका वफादार कोई नहीं हुवा. तमाम् अवामुन्नास यहले इस्लाम् इख्तियार करनेकेलिये शाहमौसूफ निहायत् वदिलोजान कोशिश कर रहे हैं. लेकिन्, इस् दक्खन्में अमल यहले महंमुदीका जमाव होना निहायत् मुष्किल् है ! क्यौंके, शेवाजी करके कोई हिंदूओंका काफीर इस् वात्में खललअंदाजी कर रहा है.

[ आजपर्यंत जितके मुसलमानी वादशाहा झाले, त्यांत औरंगजेबासारखा मुसलमानी धर्माचा अभिमानी व दृढ निश्चयी वादशाहा कोणीच झाला नाहीं. सर्वांनीं मुसलमान व्हावें म्हणून, शाहा खुद्द मनापासून अतिशय प्रयत्न करीत आहेत. पण ह्या दक्षिणदेशांत मुसलमानी धर्माचा प्रसार होणें फारच कठिण आहे ! कारण, शिवाजी नांवाचा कोणी नीच हिंदू, ह्या कामांत फार विघ्नें आणीत आहे. ]

**शा० खां**–उस् काफीरको काविज् करनेकेलिये वादशाहाने हम्को यहां भेजा है.

[ त्या नीचाला पकडण्यासाठीं वादशाहानें आम्हांला इथे पाठविलें आहे. ]

**फकीर**–या रब्बुल् आल्मीन् ! वो काफीर जल्द नेस्तोनाबूद् हो जावे, तो वहोत् खूब् होगा; और कुल् दक्खन् मजवे इस्लामही हो जायगी ! खैर; अब् मैं रुखसत् मांगता हूं; क्यौंके, मेरा नमाजका वक्त करीब् पोहोंचा है.

[ हे जगदीश्वर ! तो अधम लौकर नाहींसा होईल, तर फार चांगलें होईल; व सर्व दक्षिणदेश मुसलमान होईल. असो; आतां मी निरोप घेतों. कारण, माझी निमाज पढण्याची वेळ होत आली. ]

**शा० खां**–वेहेत्तर; यहांही नमाज अदा करलीजिये; और इस् फि-द्वीकेसाथ आज आप्का खानापीना होना चाहीये.

[ चिंता नाहीं; इथेंच निमाज पढावी; व ह्या दासाबरोबरच आज आपलें खाणें-पिणें व्हावें. ]

**फकीर**–( अमळ विचार करून ) मैं कभी किसीके हात्का खाता नहीं हूं. जो कुछ् खिचडी या आटा मिलता है, सो अप्नेही हातसे पकाकर खाता हूं. जिस् वातका किसीनें येतिकाद् किया होगा, उस्का फिराना दुरुस्त नहीं है. कुछ् मुजाय्का नहीं; आप्ने मेरी वहोत् अर्जूवर लायी है. मैं आप्का वहोत् यहसान्मंद हूं. खुदा सब्का भला करे. ( जाऊं लागतो. )

[ कधींच मी कोणाच्या हातचें खात नाहीं. खिचडी अथवा आटा जें कांहीं मिळतें, तें मीच आपल्या हातांनीं शिजवून खातों. ज्या गोष्टीचा कोणीं निश्चय केला असेल, तो फिरविणें योग्य नाहीं. कांहीं चिंता नाहीं, आपण माझा फार चांगला सत्कार केला. मी आपला फार उपकारी आहें. ईश्वर सर्वांचें चांगलें करो. ]

**शा० खां**–ऐ खुदाके वंदे, खैर; खुषी आप्की. मक्केके हज्केलिये कुछ् खर्चरहदारी देनेका मेरा इरादा है.

[ हे ईश्वराचे सेवक, ठीक; आपली मर्जी. मक्केच्या यात्रेच्या वाटखर्चासाठीं कांहीं खर्ची देण्याची माझी इच्छा आहे. ]

**फकीर**–वेहत्तर दीजिये.

[ चिंता नाहीं, द्यावी. ]

**शा० खां**–( शंभर मोहरा देतो.) लीजियेगा.

[ घ्याव्या. ]

**फकीर**–( घेतो व दोन्हीं हात तोंडाशीं नेऊन कांहीं बोलल्यासारखें करून ) अच्छा; खुदा आप्का भला करे. ( जातांना, )

॥ दोहा ॥

**न होना दुष्मन् किसीका । न होना बेइमान ॥**
**कर बंदगी खुदाकी । रख दिल्में ईमान ॥**

[ टीक, ईश्वर आपलें चांगलें करो. कोणाचा शत्रु होऊं नको; अप्रामाणिक होऊं नको; ईश्वराची भक्ति कर व अंतःकरणांत प्रामाणिकपणा असूं दे. ]

( जातो. )

( आंतून–निमाजका वक्त हुवा. )

[ ईश्वरभक्तीची वेळ झाली. ]

**काजी**–खांसाहेब, वांगी अजां दे रहा है.

[ खांसाहेब, मुल्लानें सूचना दिली. ]

**शा० खां**–अच्छा; देखो जमालखां, आठदस् दिन ठहरके उस् वदवख्त पक्स्से मुकाविला करना अच्छा है. चलो, अब् सभी निमाज पढें.

[ टीक; पहा जमालखां, आठदहा दिवसांनंतर त्या लवाडाशीं लढलेंच पाहिजे. चला आतां आपण ईश्वराची भक्ति करूं. ]

( जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

### स्थल–राजगडाजवळची चावडी.

**कोंडीबा**–कार दगडू, ह्योच नव्हका त्यो राजगड ?

**दगडू**–व्हय बावा, हिंग ह्योच. वगा, त्ये गडकरी वसल्याती नव्हका चावडीवर ?

**कोंडीबा**–( पाहून ) हिंग अस्स. चलकी मग लेका ह्मोर. ( पुढें जातात व गडकऱ्यांस ) रामराम गडकरी, रामराम.

**गडकरी**–रामराम.

**एक ग०**–का, पाटिलबाबा, कुनकड जाता ?

**कोंडीबा**—गडावर, म्हाराजाप.

**कुशा०**—इक्त का काम हाये म्हाराजाप ?

**कोंडीबा**—काम व्हय ? काम राव, लई वानिच हाये. का कराव गडकरी ! पुसूच नगा. नोड्यांनीं राव—जततत लईच जुलूम मांडल्या आपल्या मुलकामंदीं ! समद लोक—अक्शी व्यजार व्यजार झाल्याती बगा, गडकरी ! अन

॥ लावणी ॥

कस व्हइल आता गडकरी, झाल पुंड, लई मस्त, मस्त मोगल धारकरी ॥ हो जी० ॥ ध्रु० ॥ चाकन, जुनर घेतल्यापुन, केला फस्त, केला फस्त, देस लुटलुटुन हो जी० ॥ कस० ॥ बेफिकिर हिंडति जततत, खोंडागत, पोळागत झाल्याति लई मस्त हो जी० ॥ कस० ॥ चाचारून घ्वाड शेतामंदी, केलि घान, केलि घान पिकाचि संमदी हो जी० ॥ कस० ॥ पोरावानी आमचीं गुर, धधरून, बळ धधरुन, कापल्याति चचरा हो जी०॥ कस०॥ तेच मास घेउनशी हाती, झट त्वांडांत, बळ त्वांडांत, घालुन बाटवल्याती हो जी० ॥ कस० ॥ भवानी, बेयरी, मारवती, तोतोडुन, फोफोडुन, देवळ पाडल्याती हो जी०॥ कस०॥ आग लावुन गावचगाव, जाळुन खाक, केली राख-नुरला कुठवी ठाव हो जी० ॥ कस० ॥ गनिमाचा जुलुम बगुन, लोक भिउन, जीव घेउन आड जागिं बसति लपलपुन हो जी० ॥ कस० ॥ यळ आली उपासमाराची—का खाव, कुट न्हाव ? झालि राख घरदाराची हो जी० ॥ कस० ॥

**फोंड सावंत**—पाटील, अस्सो जुलूम त्या मुसड्यांनीं आपल्या लोकांर मांडलोसा ?

**कोंडीबा**—व्हय !

**फों०**—तर मगे तुमी भितात कित्याक ? पाटीलबावांनू, हेंसर बघा; ही मावळ्याची तरवार—न ह्यां हेटकऱ्याचां तुवाक, ( बंदुक )

कसां आसा जाणात ? खांदाक एकदा लागली–तर त्या मुसलमानांची आमकां काय विशाद दिसता ? शेरकां सारक्यो उडवून दितलों. पाटीलबावांनूं, चला आमच्या वांगडा ( बरोवर ), म्हाराजांक् न्हेऊन भेटवतंय. ( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

### स्थल–राजगड–शिवाजीमहाराजांचा वाडा. दरबार.

**शिवाजी**–आतां मात्र हर प्रयत्न करून गनीम आपल्या मुलखांतून पिटाळून लावायचा.

**मोरोपंत**–आमचा पण तोच विचार आहे. परंतु, त्या खानाची फौज पडली तोलदार–तेव्हां त्याच्याशीं मोठ्या युक्तीनेंच लढलें पाहिजे. पुनः असें ऐकतों कीं, त्याची तयारीही जय्यत आहे ! मला वाटतें, पहिल्यानें त्याच्या तळांतील कुल् बातमी व बंदोबस्त हीं कळतीं तर बरें होतें.

**शिवाजी**–त्यासाठीं आपला बहिर्जी गेलाच आहे. शिवाय आठ हजार निवडक फौजेनिशीं पालकरही मोंगलाईत धाडला आहे. आतां बहिर्जी येईपर्यंत माफक तोंड काढलीच पाहिजे. पुष्कळ फौज न मरतां व मनस्वी खर्च न होतां, शिताफीनें व हरिफीनेंच छाप ठेवून त्याची हार करायची.

**चिमणाजी**–मला वाटतें सल्ल्याचें बोलणें करण्यासाठीं अगोदर तिथें वकील धाडला असता तर बरें होतें.

**शिवाजी**–छीः छीः; भलतेंच ! ह्यानें तर आपली पुरी नाचक्की होणार. आणखी, तो खान म्हणजे कट्टा मोगल–बादशाहाचा अगदीं नातलग—त्यापाशीं सल्ल्याची गोष्टच काढतां येत नाहीं. जें होणें तें

होईल. कचदिल न होतां, हरिफीनें छापे घालूनच त्याच्या त्या फौजेची साफ लांडगेतोड करायची.

**प्रतापराव**–बिन्तोड असेंच करायचें. शिवाय महाराजांस भवानीचा साक्षात्कारही असाच झाला आहे कीं, " अफझुलखानासारखाच तूं त्या खानाचा पराभव करशील. " श्रीअंबाबाईचें इतकें अभयवचन आहे, तर मग महाराजांनीं खानावर बेफिकीर छापाच घालावा.

**सर्व**–असेंच करायचें.

**शिवाजी**–तेव्हांपासूनच माझा असा निश्चय झाला आहे. परंतु तुमचा सर्वांचा काय निश्चय झाला आहे, हें कळावें ह्मणून मी इतका वेळ स्तब्ध बसलों होतों. असो; शेवटीं तुमचे सर्वांचे विचार, माझ्या संकल्पाला अनुकूल असेच पडले !

**मोरोपंत**–शरीरें मात्र निरनिराळीं दिसतात इतकेंच; पण, सगळ्यांचीं मनें महाराजांच्या मनाशीं कशीं अगदीं एकजीव होऊन राहिलीं आहेत; तेव्हां तीं आपल्या संकल्पाबाहेर कशीं जातील ?

**हुजऱ्या**–( मुजरा करून ) महाराज–महाराज–

**शिवाजी**–कसली बातमी घेऊन आला आहेस इतक्या घाईनें ?

**हुजऱ्या**–( हात जोडून ) महाराज, आपल्या गडावर कुनी योक फकीर येत व्हता ! पुन आपल्या नायकान त्येला तवाच कैद केलाया.

**शिवाजी**–( चकित होऊन ) कोण ? फकीर–आणि तो आपल्या राजगडावर !

**सर्व**–मोगलांचा इथें शिरकाव–मोठेंच आश्चर्य ! !

**शिवाजी**–जा, त्याला लौकर घेऊन यायाला सांग इथें.

**हुजऱ्या**–जी; ( जातो. )

**शिवाजी**–हा कोणी तरी खानाकडचा हेर असावा.

**मोरो०**–मलाही असेंच वाटतें.

( नाईक फकीरास बांधून घेऊन येतो. )

( सर्व आपापल्या तरवारी उपसून तयार होतात. )

**शिवाजी**–( फकीरास ) सच् कहो; तुम् कौन हो ?

[ खरें सांगा; तुम्ही कोण आहांत ? ]

**फकीर**–( अदबीनें ) गरीब्परवर ? यह बंदा एक फकीर है.

[ अहो गरीबांचे पालक ! हा दास एक साधु आहे. ]

**शिवाजी**–अच्छा; फिर किस् खमूलत्से तुम् यहां आये हो ?

[ ठीक; पण कोणत्या हेतूनें तुम्ही इथें आलां आहांत ? ]

**फकीर**–और कुछ् खमूलत् नहीं. हुजूर बडे खैरात् करनेवाले हैं–यह सुन्कर यहां आया हूं. खुदा आप्को हमेशा आबाद् रखें.

[ आणखी कांहीं हेतु नाहीं. महाराज मोटे दानशूर आहेत असें ऐकून मी इथें आलों आहें. ईश्वर आपणाला सदा सुखी ठेवो.]

**शिवाजी**–( अमळ विचार करून ) येसाजी,

**येसाजी**–( अदबीनें ) जी, सरकार.

**शिवाजी**–बारकाईनें तपास करा बघूं. हा खरोखर फकीरच आहे कीं काय, तें आतां समजेल.

**येसाजी**–जी; ( त्याचा झाडा घेतो; त्यापाशीं गुप्त ठेवलेलीं हत्यारें सांपडतात ! तीं शिवाजी पुढें ठेवून ) लेकाचा म्हनतुया मी गरीब फकीर हाये फकीर–आन इ हत्यार बगा सरकार गुपत रीतीन कशी आपल्याप ठेवल्याती ? ( मिशीवर हात फिरवून व डोळे फाडून त्या फकीरास ) लांडगा, वाघाच्या दरीत शिकार बगतुया व्हय ? हिंग सरकार हुकूम करत्याल, तर गाडिच्याला हुँ–करतुया झटक्याबरोबर जागच्या जागीं ठार–न.

**सर्व**–हं काय बघता ! करा नोज्याची कत्तल.

**शिवाजी**–थांबा अमळ. आतां त्याच्या कपाळीं तेंच आहे. (फकीरास) फकीर होके किस्लिये ये हथिय्यार साथ रखे थे ?

[ फकीर असून कशासाठीं हीं शस्त्रें जवळ ठेविलीं होतीं ? ]

**फकीर** ( कांहीं न बोलतां मान खालीं घालून उभा राहातो. )

**मोरो०**–तो आतां काय उत्तर देतो ? गुलामाचें एकंदर ढोंग बाहेर पडलें.

**शिवाजी**–तर मग आतां उशीर नको. येसाजी, करा गुलामाचा नेऊन एकदम कडेलोट.

**येसाजी**–( ऐटीनें लवून ) वाडुळ महाराजाच्या याच हुकमाची वाट बगतुया. ( नायकास ) जानराव, हिंग आता का बगता ? करा नोज्याच्या मुसक्या ताठ–घाला जमिनीवर सपसल पालता–अन हुँ–उपटा लेकाची बोकडागत वाढलेली दाढी.

**फकीर**–या खुदा ! मेरेपर यह क्या गजब !

[ हे देवा ! माझ्यावर हा काय जुलूम ! ]

॥ **दोहा** ॥

**न होना दुष्मन् किसीका । न होना बेइमान ॥**

**कर बंदगी खुदाकी । रख दिल्में ईमान ॥**

**शिवाजी** ( ऐकून त्याच्या तोंडाकडे पाहातो. )

**येसाजी**–चल लेका. तुला दावतुया आता झट खुदा.

**शिवाजी**–येसाजी, थांबा अमळ; त्याला असा जवळ घेऊन या.

**येसा०**–जी, ( दाढीला धरून शिवाजीजवळ घेऊन येतो, इतक्यांत लावलेली दाढी गळून पडते ) अर गुलामाच्या ! भव्हरुप्यावानी दाढीबी लावली व्हती नव्हका ? ( ती फेंकून देतो. )

**शिवाजी**–कंक, सोडा त्याला.

**येसाजी**–( सोडून मनाशीं ) अर इच्या ! इक्त्यामंदीच महाराजाच मन कस इतुळल ?

**इतर सर्व** ( चकित होऊन एकमेकांकडे पाहतात. )

**शिवाजी**–कां ? विचारांत कां पडलांत ? नीट बघा हा कोण आहे तो ?

**येसाजी**–( निरखून पाहून ) हिंग अस्स; पटली वळक ! सरकार, वहिर्जी नव्हका ह्यो आपला ? ( पुन: पाहून ) हिंग त्योच गब्रु !

**सर्व**–( पाहून ) होय; तोच !

**येसाजी**–इक्ता यळ पावतर गड्यान समद्यांसनी चकवल वगा ! लई नकल्या गडी राव !

**प्रता०**–ह्मणूनच गनिमाकडची छडानूछडा बातमी घेऊन येत असतो.

**मोरो०**–खरें आहे, बहिर्जी हा आपल्यांत एक चित्रगुप्तच आहे, ह्मणायचा.

**येसाजी**–पंत बोलल्याती त्य हिंग अक्शी बराबर हाये.

**शिवाजी**–असो; बहिर्जी, आह्मी सर्व तुझीच वाट बघत होतों. बरें, सांग बघूं तिथची अंतस्थ काय काय बातमी मिळविली आहेस ती ?

**बहिर्जी**–फकिरीच्या स्वांगान दोन रोज हिंडत व्हतो खानाच्या गोटामंदी. खुद खानाच्या ऱ्हावटीमंदी जाऊन, त्यासंग बोलून, मकेच्या जत्रच्या खर्चासाठी ह्मोरावी त्यापास घेउनशी आलुया वगा ! ( त्या शिवाजीच्या पायांशीं ठेवितो. )

**शिवाजी**–( पाहून ) वा: रे वा: ! तूं आपल्या फकिरीची बतावणी अगदीं बेमालूम केलीस ! ठेव ह्या तुझ्याच जवळ.

**बहिर्जी**–( त्या घेऊन ) खानाच्या गोटाची खडानूखडा खबर काढल्यावर, आपल्याइशी त्यान अक्शी बेफिकीर ऱ्हाव ह्मंगुन म्यां लई

इगतीच बोलन केल. चाकनच्या गडावर अन जुनरच्या किल्यावर तेची फते झाल्यापुन नोड, अक्शी ढोलावानी फुगल्याती–ढोलावानी. म्हराट तेना कोरज्यागत वाटल्याती. गोटभर वेसावधगिरी अन वेफिकिरी लई दिसतिया. जो त्यो सरदार आपापल्या चैनीमंदी अक्शी चकचूर.

**शिवाजी**–बरें पण, वजनदार असा कोणी रजपूत सरदार आहे का त्यांत?

**बहिर्जी**–नाहीं महाराज, संमदी बांडशाई.

**शिवाजी**–(अमळ विचार करून) असो; खुद्द खानाचा बंदोबस्त कसा काय आहे बहिर्जी? व आपल्याविशीं त्याचा पुढें काय विचार आहे?

**बहिर्जी**–चारीकुंड फवजेचा गराडा असून, मधल्या आंगाला खानाचा डेरा हाये. अक्शी आरवांचा खडा पाहरा ठेवलया तत. तरी पुन महाराज, त्या डेऱ्यासनी वाड किती हाइती; वाटा कशा ठेवल्याती; खान कवा अन कुनिकड निजतुया; त्या यळाला किती पाहरकरी असल्याती; अन कसा गस्त ठेवल्याती; तेचाबी अक्शी खडान्‌खडा तपास केलया. आपल्या इशी त्यो वेदरकार दिसतुया; पुन पाचार रोजान या गडाभवती त्यो घेरा घालनार हाये सरकार!

**शिवाजी**–चिंता नाहीं. घालूं दे घेरा. ह्या राजगडाभोंवतीं त्यानें आणखी शंभर वेढे जरी घातले, तरी त्याचें मला मुळींच भय वाटत नाहीं. बरें, पण बहिर्जी, खानाच्या शिपायांचा व सरदारांचा पोषाख कशा तऱ्हेचा आहे?

**बहिर्जी**–अक्शी मोगलाई थाटाचा.

**शिवाजी**–ठीक. (मंडळीस) बहिर्जीनें सांगितलेली हकीकत सर्वांनीं ऐकलीच आहे. ह्यावरून खानाच्या गोटांत बराच ढिलेपणा आहे.

हीच वेळ छापा घालण्याला सुरेख आहे. कां—पंत, गुजर, कंक, मालुसरे, तुमची काय सल्ला आहे?

**मोरो०**—वहिर्जीनें कळविलेल्या हकीकतीवरून महाराजांची मसलत अगदीं माफक आहे.

**इतर सर्व**—खर हाये. अक्शी विनूतोड छापाच घालायचा गनिमावर.

**शिवाजी**—तर मग लागा सर्व आपली कडेकोट तयारी करायला.

**सर्व**—जसा महाराजांचा हुकूम.

**शिवाजी**—वहिर्जी,

**बहिर्जी**—जी महाराज,

**शिवाजी**—(त्याच्या कानांत कांहीं सांगतो) वघ, काम कसें अगदीं वेमालूम झालें पाहिजे.

**वहिर्जी**—का भवानी करील त्ये खर.

**शिवा०**—ठीक.

(जातात.)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

---

## प्रवेश ९ वा.

### स्थल—खानाचा गोट. एक चावडी.

**गारुडी**—(पुंगी वाजवीत प्रवेश करून) देख वेटा हांडिवाग, चलाखीमें और हुन्नरमें कसूर मत् करना.

[पहा वेटा हांडिवाग! चलाखींत व युक्तींत आळस करूं नको.]

**हांडिबाग**—आप् वेफिकर रहिये वस्तादूजी. चलाखीसे सबोंकी ऐसी तो नजरवंदी करूंगा और ऐसा इल्म बतानुंगा के, वे खुष्खुष् होकर इस् वंदेकी हमेषा याद करते रहेंगे.

[ आपण बेफिकीर असावें गुरुजी. चलाखीनें सर्वांची अशी नजर बांधीन व अशी विद्या दाखवीन कीं, ते खुषखुष होऊन ह्या सेवकाची नेहमीं यादच करतील. ]

**गारु०**–दुरुस्त. वैसाही होना चाहिये. बेटा, चलो. ( पुढें जातात व थांबतात ) तल्में जाना बडा मुष्किल् है ! निगाहवानी तो सख्त है. ( विचार करून ) खैर; जाना तो सई. ( जातो व गस्तवाल्यास सलाम करितो. )

[ योग्य, असेंच केलें पाहिजे. मुला, चल. तळांत जाणें फारच अवघड आहे। खडा पहारा आहे. असो; जाऊं तर खरें. ]

**शेखचांद**–( मान हालवून ) तुम् कौन हो ?

[ तुम्ही कोण आहांत ?]

**गारुडी**–बंदा एक जादुगर है, जनाब्.

[ सेवक एक गारोडी आहे, महाराज. ]

**शे०चां०**–फेर, किम्लिये यहां आये हो ? जादुगरका इधर क्या काम् है ?

[ मग इथें कशाला आलां आहांत ? गारोड्यांचें इथें काय काम आहे ? ]

**गारुडी**–आप्की बात तो दुरुस्तही है जनाब. मगर सुन्ताहूं के, नबाबसाहेबको जादूका बडा शौक है.

[ आपलें बोलणें योग्यच आहे महाराज. पण, ऐकतों कीं नबाबसाहेबांस जादूचा फार शोक आहे. ]

**शे० चां०**–क्या तुम् नवाबसाहेबको अप्नी जादुगरी बताने चाहते हो ?

[ नबाबसाहेबांला तुम्ही आपली जादुगिरी दाखवूं इच्छितां काय ?]

**गारुडी**–जी हां–जनाब्.

[जी होय, महाराज. ]

**शे० चां०**–अच्छा; बयान् करो तुम क्या क्या जादुगरी जान्तेहो ?

[ ठीक; सांगा तुम्ही काय काय जादू जाणतां तें ? ]

**गारुडी**–वेटा हांडिवाग, बयान् कर.

[मुला हांडिवागा, सांग.]

**हांडिवाग**–जी हां. सुनिये जनाव्; मैं पल्में चुहां, चुहेकी बिल्ली, बिल्लीका कुत्ता, कुत्तेका गद्धा, गद्धेका कव्वा, कव्वेका कबूतर, कबूतरका आद्मी, आद्मीका दुंब्वा, दुंब्वेका राकश, राकशका खमीस, खमीसकी ऐसी खब्सूरत परी बनुंगा–और सात अस्मानमें उड जाऊंगा–और अस्मानसे पतालमें जाऊंगा जनाब!

[जी होय. ऐका महाराज, पळांत उंदीर, उंदराची मांजर, मांजराचा कुत्रा, कुत्र्याचा गाढव, गाढवाचा कावळा, कावळ्याचें कबूतर, कबूतराचें माणूस, माणसाचा मेंढा, मेंढ्याचा राक्षस, राक्षसाचा खमीस, खमीसाची अशी सुरेख परी बनेन व सात असमानांत उडून जाईन व तेथून पाताळांत जाईन; महाराज!]

**शे० चां०**–तू तो वडा हुशियार है.

[तूं तर फार हुशार आहेस.]

**हांडिवाग**–क्यौं नहीं! हमारे वस्ताद्जीही हुशियार हैं तो हम् क्यौं न होंगे?

[कां नाहीं! आमचे गुरुजीच हुशार आहेत, मग आम्ही कां नाहीं असणार?]

(शिपायाच्या आग्रहानें कांहीं चमत्कार करून दाखवितात.)

**शे० चां०**–खैर, वहोत् संभाल्के जावो.

[असो. फार सांभाळून जा.]

**गारुडी**–जी हां, जनाव्.

[जी होय, महाराज.] [जातात].

---

## प्रवेश ६ वा.

### स्थल–खानाचा गोट–डेरा.

**शा० खां** (हुक्का ओढीत बसला आहे.)

**जमालखां**–(उठून अदबीनें) बेषक्, वो जादुगर बडा हुशियार

था ! खैर; गनीमकी कुछ् धूम्धाम् देखनेमें नहीं आती. आजतक् वो कमजात् डरके मारे पहाडोंमें रूपोष् हो बैठा है.

[ खचीत, तो गारोडी फार हुशार होता ! असो; शत्रूची कांहींच चळवळ पहाण्यांत येत नाहीं. अझून तो नीच भिऊन डोंगरांतच लपून वसला आहे. ]

**शा० खां**–बादशाही लष्करके रूबरू लडनेकी उस् फैलसुफ्की क्या ताकत् है ? खैर. कल जुमे्का दिन है. परसोंके दिन पचास हजार फौज लेके, जिस् किले संगीनपर वो काफीर छीपा हुआ बैठा है, उस्को घेरना; और चारोंतरफ्से किलेकी दिवालपर बारूद-गोला चलाना. क्यौंके, बहोत् दिन इस्मुजब् ठैरकर बेकार बैठना अच्छा नहीं है. और हुजूरकी तरफ्से बंदेको इनायत्नामा लिखा हुआ आया है के, " शेवाजीको काविज् किया या नहीं; और उस्केलिये क्या कोशिश कर रहे हो; सो कुल् कैफियत् लिख्के फौरन भेज दो."

[ बादशाही लष्कराशीं लढण्याची त्या गप्पीदासांत काय शक्ति आहे ? ठीक; उद्यां शु-क्रवार आहे; परवां पन्नास हजार सैन्य घेऊन, ज्या मजबूत किल्ल्यावर तो दुष्ट लपून व-सला आहे, त्याला गराडा घालून; व चारी बाजूंनीं त्यावर दारूगोळा चालवायचा. कारण, यापुढें आतां फार दिवस असें स्वस्थ बसणें चांगलें नाहीं. आणखी बादशाहाकडून तुर्तेच आज्ञापत्र आलें आहे कीं, "शिवाजीला बंदिवान केलें किंवा नाहीं, व त्यासाठीं काय काय उपाय केले आहेत; हें सर्व लौकर लिहून पाठवावें."]

**जमालखां**–बहोत् खूब्. परसोके दिन पचास हजार लष्कर लेके, मैं, गाजी मुरादखां और गाजी सरफ्राज्खां जाके, उस् किलेको चारों-तरफ्से घेरके, रात दिन उस्पर तुफंग–अंदाजी करूंगा; और गनीमका कोईभी आदमी किलेसे बाहर या बाहरसे अंदर जाने न पावे ऐसा करूंगा.

[ फार चांगलें. परवां पन्नास हजार फौज घेऊन मी, शूर मुरादखां व शूर सरफ्राजखां जाऊन तो किल्ला चौफेर घेरून, रात्रंदिवस त्यावर तोफांचा भडिमार करायचा व शत्रूचें

कोणीही माणूस किल्ल्यांतून बाहेर व बाहेरून आंत जाणार नाहीं असा कडेकोट बंदोबस्त करायचा. ]

**शा० खां**–इन्शाल्ला: ! बेषक् ऐसाही करना दुरुस्त है. अच्छा; अब् मैं इस् मजमून्का खत् बमुताले हुजूर पुरनूरके इरसाल् करताहूं.

[ ईश्वर करील तर ! खचीत असेंच करणें योग्य आहे. ठीक; आतां मी ह्या मतल-बाचेंच विनंतीपत्र आपल्या प्रतापी महाराजांस लिहून धाडतों. ]

**जमालखां**–अच्छा, इरसाल कीजिये. बंदा परसो अल्स्सुबां यहांसे कूच करेगा.

[ चांगलें, पाठवावें. सेवक परवां पहांटेस येथून कूच करील. ]

**शा० खां**–( हुक्का ओढीत ) बेहेत्तर, कूच कीजिये.

[ चिंता नाहीं, कूच करावें. ]

**छडीदार**–( येऊन ) हुजूर, तुआम तयार है. नोष फर्माईये.

[ महाराज, खाणें तयार आहे. आज्ञा व्हावी. ]

**शा० खां**–खैर. चलिये.

[ ठीक; चलावें. ]

**छडीदार**–मेहेफिल बरखास्त.

[ कचेरी विसर्जन. ]

---

## प्रवेश ७ वा.

### स्थल–खानाचा गोट–डेरा.

**शिवाजी**–( वेषांतर केलेला. ) इथवर तर आपण अगदीं बेफिकीर व बेमालूम येऊन पोंचलों. तळांत जिकडे तिकडे चाललेले नाच तमाशेही आपण पाहिले. अझूनपर्यंत आपल्याविषीं कोणाच्याच मनांत संशय नाहीं. रात्रीनें पण आपला पुरा अमल बसविला आहे. निद्रादेवीनें तर आज आपणांवर मोठीच कृपा केली आहे. तळभर

कसें अगदीं सामसुम झालें आहे! (पाहून) मला वाटतें हाच खानाचा डेरा.

**बहिर्जी**–व्हय सरकार. पुन आदुगर देवडीवर जाउनशी बगतुया कि हिंग गस्तवाले जागल्याती का निजल्याती.

**शिवाजी**–ठीक आहे. जा, लौकर बघून ये.

**बहिर्जी**–(जाऊन झट परत येतो.) वा:! अंबाबाईची अक्शी कुरपा हाये आपनावर! समदे देवडीवाले कुंभकरनावानी अक्शी ढारढुर घोरल्याती. त्येंचीं संमदीं हत्यारं म्यां गोळा करुनशी आनलीं बगा सरकार.

**शिवाजी**–शाबास! ठीक केलेंस. पण आतां उशीर नको.

**बहिर्जी**–बापूसाव, आपुन देवडीवर वाघागत दवा धरुनशी बसाव अन गस्तवाले जाग झालरे झाल किं हिंग गाडिच्याला करा जागच्या जागीं ठार. मी, महाराज अन चिमनाजी, जातुया झट खानाच्या डेऱ्यामंदीं.

**बापू०**–ठीक आहे. (जातो.)

**शिवाजी**–(डेऱ्याकडे पाहून) खानाचा डेरा तर फारच उमदा आहे!

**बहिर्जी**–सात बाड हायती याला.

**शिवाजी**–असूं दे. तीं फाडून आंत जाऊं.

**बहिर्जी**–वर हाये. [डेऱ्याचीं सातही वाडें कट्यारींनीं फाडून आंत शिरतात.]

**शिवाजी**–(चौफेर पाहून.) खानाचा डेरा खराच उमदा आहे! आंत जागजागीं चौकीपहारेवालेही वरेच आहेत. (पाहून) दासदासी पण पुष्कळ आहेत. पण हीं सर्व अगदीं गाढ निजलीं आ-

शाइ स्तेखानावर छापा.



हेत. हें फारच उत्तम झालें आहे! पण जागजागीं दिवे जळतात; तेव्हां इच्छित काम साधणें अमळ कठिण आहे. (पुनः पाहून) वाहवा! खान मोठ्या ऐषआरामानें छपरपलंगावर पडून निद्रासुख घेत आहे. (तलवार परजून) हे हरामखोरा, ही तलवार तुला लौकरच महानिद्रासुख देईल. (हळूच खानाजवळ जाऊन) जागा करूनच गुलामाला छाटावा. (इतक्यांत पहाऱ्यावरील दास दासी जागीं होतात व शिवाजीस पाहून—भयानें—)

**दास** व **दासी**—(भयानें) या अल्लाः! या खुदा! तोवा—यह क्या गज़ब? ये कौन इस् वक्त यहां?

[हे ईश्वरा! हे देवा! हाय हाय! हा काय अनर्थ? हे कोण ह्या वेळीं इथें?]

**शिवाजी वगैरे** (सेवकांवर वार करतात. मोठा गलवला होतो.)

**दास** व **दासी**—या खुदा! तोवा! दगा—दगा—दौडो—दौडो—दौडो—जल्द! गनीम खांसाहेवके खेमीगाहमें घूसे हैं! या अल्लाः! यह क्या गज़ब!! (पळतात.)

[हे देवा! हाय! हाय!! दगा—दगा! धांवा—धांवा—धांवा लौकर! शत्रू खानसाहेबांच्या डेऱ्यांत शिरले आहेत! हे ईश्वरा! हा काय अनर्थ?]

**शा० खां**—(जागा होतो व चकित होऊन भयानें) या अल्लाः! या खुदा! गज़ब खुदाका! आखिर गनीम यहांतक् आन पोहोंचे? तोबा! अब् क्या होगा? जमालखां—सरफ़ाजखां—दलेलखां! दौडो जल्द—हम् मरे जातें हैं! या अल्लाः!! मेरी शमशेर कहां है? (इतक्यांत वार करण्यासाठीं शिवाजी त्याच्यावर चालून येतो, त्यास पाहून खान) तोबा! दुष्मन् दौडके नजदीक आया! (पळून दासींत शिरून लपतो. दासी दिवा मालवितात.)

[हे ईश्वरा! हे देवा! ईश्वरी कोप!! शेवटीं शत्रू इथवर येऊन पोंचले! हाय हाय!

आतां काय होईल? जमालखां, सरफ़ाजखां, दलेलखां–धांवा लौकर. मी मारला जात आहें! हे ईश्वरा! माझी तलवार कुठें आहे?–हाय हाय! शत्रु धांवून अगदीं जवळ आला!]

**शिवाजी**–(आवेशानें) ऐ बदबख्त–कमजात! डरकेमारे औरतोंमें क्यों छीपता है? और चराग क्यों गुल कियी? क्या मैं तुझको छोडूंगा? इस्सें मर्द–गाजी नहीं कहेलाता. निकल उन्‌मेंसे; आ मैदानमें; अगर जवामर्द है, तो रूबरू मुकाविल् हो. यह तेरा उस्ताद, शमशेर दस्तमें लेके रूबरू तेरे मुस्तयेद है! चल–ऊठ; मुखन्नस–खडा रेह, निकल–आ मैदानमें; देखूं तेरी जवामर्दी किस् तौरपर है? अभी मालूम् होगी.

[हे दुर्दैव्या–नीचा! भयानें बायकांत जाऊन कां लपतोस? व दिवा कां मालविलास? काय, मी तुला असाच जाऊं देईन! अशानें मनुष्य शूरांत गणला जात नाहीं. निघ त्यांतून. ये असा मैदानांत; जर तूं खरा शूर आहेस, तर ये असा माझ्यासमोर. तलवार उपसून हा तुझा गुरु तुझ्या समोर उभा आहे. चल; ऊठ; शंढा–उभा रहा. निघ तेथून. ये असा मैदानांत. बघूं दे तुझा पराक्रम कसा आहे तो? आतां दिसून येईल.]

**बहिर्जी**–देखो, सिपासालार, चराग गुल कियी! कुछ् पर्‌वा नहीं. (चिमाजीस) झाडो अपूनी चकमक और करो रोषन् अपूनी बत्ती.

[बगा, सेनापतिसाव, दिवा मालवला हुयी! फिकिर न्हाई. झाडा कि आपली चकमक अन पेटवा झट आपली मशाल.]

**चिमाजी** (तसें करतो.)

**शा० खां** (मशालीचा उजेड होतांच खान बायकांतून निघून तलवार घेण्यास जातो इतक्यांत–)

**शिवाजी** (आवेशानें खानावर चालून जातो व त्यावर वार करतो. त्याच्या हाताचीं तीन बोटें तुटतात.)

**शा० खां**–(वेदनेनें) तोबा! या अल्लाः! या इलाही! दौडो–दौडो–दगा–दगा–मारा जाता हूं. (पुनः पळून बायकांत जाऊन लपतो.)

[ हाय हाय ! हे देवा ! हे ईश्वरा ! धांवा-धांवा-दगा-दगा-मेलों। मेलों । ]

**शिवाजी**-क्यों मुखन्नस-कमजोर-देख अब् मऱ्हेठोंकी कैसी ताकत है ? तूभी सारी ऊमरतक् न भूलेगा. निकल जा जल्द यहांसे. नहीं तो तू ओर तेरा तमाम लष्कर-कत्ल हो जायगा.

[ कां शं.:-कमजोर-बघ आतां मराठ्यांचा जोर कसा आहे तो ? मरेपर्यंत तूं विसरणार नाहींस. निघून जा तूं इथून लौकर. नाहीं तर तूं व तुझी सगळी फौज-साफ कापली जाईल. ]

**बापूजी**-( घाई घाईनें आंत येतो. ) हुजूर, अभी यहांसे फौरन् निकल्ना चाहिये. दुष्मन्के सिपाही यह शोरोगुल सुन्कर, दौडकर यहां आतें हैं ! मैंने गष्तवाले तमाम कत्ल किये. ( इतक्यांत आंतून दगा-दगा-दौडो, पकडो, मारो; गनीम-गनीम; दीन्-दीन् ) सुनीये-अभी यहां ठेरना अच्छा नहीं !

[ महाराज ! निघाच आतां झट इथून. ही गडबड ऐकून शत्रूचे शिपाई धांवत धांवत इथेंच येत आहेत. गस्तवाल्यांची मीं साफ कत्तल केली. ऐका-आतां इथे राहणें चांगलें नाहीं. ]

**शिवाजी**-अच्छा; चलो. ( जातांना-)दीन्-दीन्-बोलो दीन्; या अलीमदत्. मारो-पकडो-( असें ह्मणत जातात. )

[ ठीक. चला.-धर्म-धर्म-गाजवा धर्म-हे अली पेगंबर, तुझी मदत. मारा, पकडा.]

**जमालखां वगैरे**-( प्रवेश करून ) या अली-मदत् ! दीन्-दीन्-मारो-पकडो काफीरको जल्द-( असें ह्मणून खानाजवळ जातात. )

[ हे अली पैगंबर ! तुझी मदत. धर्म-धर्म-मारा, पकडा नीचांना लौकर. ]

**शा० खां**-( वेदना देत ) या अल्ला: ! या खुदा ! ! अब तो मरतें हैं ! दुष्मन्ने सख्त वार किया ! हातोंकीं सब उंगलीयां कट गई ! ! तोबा ! जान जाती है !

[ हे देवा ! हे ईश्वरा ! ! आतां मी मरतों. शत्रूनें भयंकर जखम केली. हाताचीं सगळीं बोटें कापलीं । हाय हाय । प्राण जाऊं पाहातात । ]

**जमालखां**–तोवा! यहांतक दुष्मन्ने हम्ला किया, तोभी कुछ् मालूम् नहीं हुआ! जखम तो कारी लगी! लेकिन्, खुदावंत! अव डरना नहीं. हिम्मतही पकडना. 'हिम्मत मर्दा तो मदत खुदा.'

[ हाय हाय! शत्रूने असा छापा घातला असतांही कांहींच समजलें नाहीं! घाव तर जिव्हारीं लागला आहे! तरी पण महाराजांनीं आतां भिऊं नये. हिंमत धरावी. हिम्मत धरणाऱ्या माणसास ईश्वर मदत करितो. ]

**शा० खां**–जमालखां! यह कैसा दगा हुआ? तुम इत्ने जवामर्द होकर हमारी यह खरावी? वो वद्मुआष अप्ने डेरेमें कैसा आन् पहोंचा? क्या तुम् सव नींदमें थे? क्या गष्तवालेभी सव मुवे थे? वेषक् अप्नेमेंही सव फन्फितूर मालूम् होता है. अफसोस! अफसोस!! अव हुजूरको क्या मूह् दिखलावें? हमारी सव वद्नामी होगई! ( हातास वेदना होतात. ) तोवा! जान निकल जाती है!

[ जमालखां! हा दगा कसा झाला? तुम्ही इतके वीर असतां माझी ही अशी दुर्दशा? तो लुच्चा आपल्या डेऱ्यांत कसा आला? काय तुम्ही सर्व निजलां होतां? गस्तवालेही सर्व मेले होते काय? निःसंशय आपणांतच कांहीं ना कांहींतरी फूटफाट झालेली आहे. दुःख–महादुःख!! आतां मी वादशहास काय तोंड दाखवूं? माझी फारच अपकीर्ति झाली!– हाय हाय! जीव जातो आहे! ]

**जमालखां**–मैंने तो वमुजव् हुक्म आप्के सव चौकीपेहेरा दुरुस्त रख्खा था.

[ आपल्या आज्ञेप्रमाणें मीं तर चौकी पहारा वरावर ठेविला होता. ]

**शा० खां**–वगैर फन्फितूरीके यह नहीं हुआ. कुल् मुसलमान होकेभी ऐसी वेइमानी? कैसी फतः होगी? जमालखां! अव हम् यहां नहीं ठेर सक्तें. कल् कुल् फौज लेके, शहर औरंगावादको चलना. जहां फितूरी और दगावाजी नजर आई, वहां कियाम् करना अच्छा नहीं.

[ फितुरीवांचून असें नाहींच झालें. सर्व मुसलमान असून हा असा बेइमानीपणा ! कसा जय होणार ? जमालखां ! आतां मी इथें राहूं इच्छित नाहीं, उद्यां सर्व फौजेसह औरंगाबादेस चला. जिथें फितुरी व दगा दिसून आला, तिथें राहणें चांगले नाहीं. ]

**जमालखां**–( अमळ खिन्न मुद्रेनें ) खेर ! मर्जी आप्की ! खाविंद ! यह दगाबाजी देखकर मेरा सिनाफगार हो रहा है. आप्का इरशात् हो तो, उस् काफीरको कत्ल या कैद करके नहीं लाऊंगा, तब्तक् यह मूह् आप्को कभी न दिखावूंगा.

[ ठीक ! आपली मर्जी ! महाराज, हा दगा बघून, माझ्या आंगाचा कसा अगदीं तडका होऊन राहिला आहे. आपली आज्ञा होईल, तर त्या नीचाची कत्तल–किंवा त्याला कैद करून न आणीन, तर हें तोंड आपणांस मुळींच दाखविणार नाहीं. ]

**शा० खां**–यह शेखियां अब् रहेनेदो. हमारा अब् किसीपरभी एतकाद् नहीं रहा. इस्में हमारे नामकी बद्नामी हुई–और हुजूरका यतबारभी उड गया ! अब तुम् सब जावो, और तल उठानेका हुक्म करो.

[आतां ह्या वल्गना राहूं द्या. आतां माझा कोणावरही भरंवसा नाहीं. ह्यांत माझ्या नांवाला कलंक मात्र लागला ! बादशाहाचा विश्वासही उडाला ! आतां तुम्ही सर्व ज व तळ उठविण्याची आज्ञा करा.]

**जमालखां**–( खिन्न होऊन ) जैसा मालिक्का हुक्म.

[ जशी धन्याची आज्ञा. ]

जातात.

## पहिला अंक समाप्त

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

### स्थल–दिल्ली; दरबार.

(वजीर, सरदार, मानकरी वगैरे मंडळी दरबारांत बसली असतां औरंगजेब बादशाहा येतो. मोगलरिवाजाप्रमाणें त्यास सर्व मान देतात.)

**औरंगजेब**–ऐ हमारे सब् वजीर और सिरदारों! पाक खुदा और महंमद पैगंबरके फजलसे दिनबदिन अप्नी तरक्की होती जाती है. अप्ने बादशाहत्का नाम सुनके और जाहोजलाल देखके, चीन, इरान, तूरान, तुरकिस्तान, कशागर, वगैरे जघोंके शाहिनशाह डरके मारे खौफजद् हो रहें हैं. मुल्के हिंद तो अप्ने ताबेमेंही हैं. कुल् दुनयामें अप्नी बादशाहत् और इसलामी मजहब्की तरक्की हम् दिलोजानसे चाहतें हैं. पाक मुसलमानी मजहब् कुल् खल्कत्में फैलनेसे कोई अप्ना दुष्मन् न रहेगा; और सब् एक बादशाहत्के फर्माबरदार होजायेंगे.

[हे माझ्या सर्व प्रधान व सरदारांनों! पवित्र ईश्वर व महंमद पैगंबराच्या कृपेनें दिवसेंदिवस आपली उन्नतिच होत आहे. आपल्या राज्याचें नांव ऐकून, चीन, इराण, तुराण, तुर्कस्थान, कशागर इत्यादि देशांचे राजे, भयानें अगदीं गर्भगळित झाले आहेत. हिंदुस्थान देश तर आपल्या ताब्यांतच आहे. आपल्या राज्याची व आपल्या मुसलमानी धर्माची उन्नति सर्वत्र व्हावी, हें मी मनापासून इच्छितों. पवित्र मुसलमानी धर्म, सगळ्या दुनयेंत पसरल्यानें कोणी आपला शत्रु राहणार नाहीं. एकाच राज्याचे सर्व ताबेदार होतील.]

**जाफरखां**-( वजीर, उठून ) जहांपन्हा, किवले-आलम, और मुसलमीन मजहब्के निहायत् पर्‌वर कुनिंदा, हुजूर जैसे आलिम्, गाज़ी, काविल, और लतिफ्‌साज वादशाह, कुल्‌ मुगलोंके तवारीखमें अव्‌तक्‌भी देखनेमें नहीं आये हैं. हुजूरकी हुकुमत्, हुजूरकी गाजियत्, और रियासत् देखके, कुल्‌ हिंदुस्तान गलीचताईमें मसरूफ हैं. हुजूर पूरनूरने कुल्‌ हिंदुस्तान जिन्नतुल्मकात् होनेकेलिये और मुगल वादशाहत्‌का अमल बैठानेकेलिये, शवोरोज दिलोजान्‌से जो कुछ् कोशिश किया है, यह इत्‌नी उमीद है के, कुल्‌ हिंदुस्तान जल्द हुजूरके तावेफरमान् हो जायगा.

[ महाराज, दुनयेचे धनीसाहेव; व मुसलमानी धर्माचे संरक्षक; आपल्यासारखे शास्त्रज्ञ, शूर, हुशार व स्वजात्यभिमानी वादशाहा, मोगलांच्या इतिहासांत अझून एकही पाहण्यांत आलेला नाहीं. आपला अमल, आपला पराक्रम, व आपलें राज्य पाहून, सर्व हिंदुस्थान अगदीं आश्चर्यांत पडलें आहे! सर्व हिंदुस्थान देश प्रतिस्वर्ग करण्यासाटीं व मोगलाईचा अमल वसविण्यासाठीं आमच्या तेजस्वी महाराजांनीं जी सारखी खटपट चालविली आहे, ती इतकी उत्तम आहे कीं, खचित सर्व हिंदुस्थान लौकरच आपलें तावेदार होईल. ]

**औरंगजेव**-ऐ वजीर, नमकहलाल तेरा कहेना वजा है. इस् काम्‌केलिये जित्‌ना खजाना, जित्‌नी फौज और जित्‌नी तदविरें करनी होगी, उत्‌नी कोशिश करनेकेलिये हम् हरतऱ्होंसे सर्‌गरम् हैं. लेकिन् देखो वजीर, हमारे इलाकेके वहोतसे राजपूत सरदार, नवाव, और दक्खनका पहाडी मूष-कमजात् शेवाजी वगैरां-इस् काम्‌में सख्त मुखालिफ् हो रहें हैं. इस् मुल्‌के राजपूत लोग, वडे फिकर करनेवाले, तरकीरव्वा मजहब्, वडे सख्त, वडे ताकतवर और वडे गाजी हैं. उन्‌कों अप्‌ने कव्‌जेमें लानेकेलिये पेषतरके वादशाहोंने वहोत् कोशिश कियी. लेकिन् वे लोग अव्‌तक्‌भी अप्‌ना मजहवे कुफ्‌र त्रिल-

कुल नहीं छोडतें हैं. और लढके उन्को मुसलमीन वनानाभी वडा मुष्किल् है ! मरनेतक् वे लढेंगे. पीच्छे कभी नहीं हटेंगे.

[ हे स्वामिभक्त मंत्री, तुझें म्हणणें योग्यच आहे. ह्या कामास जितका पैसा, जितकें सैन्य, जितके उपाय, तितकें सर्व करण्यास मी अगदीं तयार आहें. परंतु, पहा प्रधानजी आपल्या इलाख्यांतील पुष्कळ रजपूत सरदार, सुभेदार व दक्षिणचा तो नीच पहाडी उंदीर शिवाजी वगैरे, ह्या कामांत कट्टे शत्रू झाले आहेत. ह्या देशचे रजपूत लोक तर मोठे दक्ष, मोठे धर्माभिमानी; विलक्षण काटक, फारच सशक्त व मोठे शूर आहेत. त्यांना आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं आपल्या वाडवडिलांनीं फारच प्रयत्न केले; पण अझूनही ते लोक आपला धर्माचा दुराभिमान बिलकुल सोडीत नाहींत. लढून त्यांना मुसलमान बनविणेंही फार कठिण आहे. मेरपर्यंत ते लढतील. कधीं मागें हटायचे नाहींत. ]

**जाफरखां**—जहांपन्हा ! वेषक् वे लोग वडे जोरावर हैं. मगर हुजूरकी कोशिश जारी रहनेसे, उन्का जोर कांहांतक् चलेगा ? और मुसलमीनोंकों छोडकर, कुल् हिंदुओंसे जजिया जोरसे लेनेकेलिये कुल् वादशाहत्में जो हुक्म हुआ है; उस्से थोडे दिनोंहीमें वहोत्से हिंदु मुसलमीन हो जायेंगे. दक्खनके उस् पहाडी मूषको पकडके, हुजूरके खिदमत्में लानेकेलिये अप्ने ग़ाजी शाईस्तेखां, एक लाख फौज, और उम्दा ख़जाना साथ लेके गये हैं. वेषक् थोडे वक्तमें वे उस् दगेवाज वेइमानको पकड लायेंगे.

[ महाराज ! खचितच, ते लोक मोठे शूर आहेत । परंतु, आपला प्रयत्न सारखा चालू आहे; तेव्हां त्यांचा जोर कुठवर चालणार ? मुसलमानांशिवाय सर्व हिंदूंपासून 'शीरपट्टी' कर सक्तीने घेण्याचा हुकूम सर्व राज्यांत झाला आहे; त्यानें थोड्याच दिवसांत बहुतेक हिंदु, लौकरच मुसलमान होतील. त्या दक्षिणच्या पहाडी उंदराला धरून आपल्या पायांपाशीं आणण्यासाठीं, आपले शूर शाईस्तेखां एक लाख सैन्य व विपुल खजीना घेऊन गेले आहेत. निःसंशय ते त्या दगेखोर लुचाला थोड्याच दिवसांत कैद करून आणतील. ]

**औरंगजेब**–लेकिन् वह कमजात, राजपूतोंसेभी वडा चलाक, वडा शरीर, वडा दुश्मीन और वडा हिम्मती है. वह एक तावेमें आनेसे, कुल् दक्खन हम् झट् मुसलमीन करेंगे. और व्हांकी आदिलशाही और कुतवशाही दिनवदिन कमजोर होके अपनेही कब्जेमें आवेंगी.

[ परंतु, तो नीच रजपुतांपेक्षांही मोठा चपल, महाकपटी, पक्का धूर्त व पुरा हिम्मती आहे. तो एक ताब्यांत आल्यास, सगळा दक्षिण देश मी तेव्हांच मुसलमान करीन; व तेथील अदिलशाही व कुतवशाही हीं पण कमजोर होऊन आपलीं अंकित होतील. ]

**जाफ०**–किबलेआलमूने उनूपें चढाई करके, उन्का वहोत्सा अंमल नेस्तोनावूद किया है.

[ विश्वाधीश महाराजांनीं त्यांच्यावर स्वारी करून, त्यांचा वराच अम्मल नाहींसा केला आहे. ]

**चोपदार**–( प्रवेश करून ) ख्याल फरमायीये जहांपन्हा; रुक्का लेकर एक सवार हुजूरके खिदमत्में आया है.

[ महाराजांचें इथें लक्ष लागो. एक स्वार पत्र घेऊन महाराजांच्या पायांपाशीं आला आहे. ]

**औरंग०**–अच्छा; अज़ाजीत है.

[ ठीक; आज्ञा आहे. ]

**चोप०**–जी हां. ( जातो व स्वारास घेऊन येतो. )

**स्वार०** ( आदवीनें मुजरा करतो व वजीरास पत्र देतो. )

**जाफ०** ( तें औरंगजेवाच्या पायांपाशीं ठेवितो. )

**और०**–वजीर, जाहिर करदो, इस्में क्या मजमून है.

[ प्रधानजी, वाचा, ह्याच्यांत काय मजकूर आहे तो. ]

**जाफ०**–जी हां. ( तें फोडून वाचतो– ) "बहुजूर, फेज़गंजूर, खुदावंदाने नियामत्, अब्रे किरामत्, जनाव, मालिके हिंदुस्तान,

जादे इनायत् हूं–वंदेनवाज; हुजूरका हुक्म लेके निकला, सो निहायत् खूषीसे बंदा दक्खनमें दाखल हुआ. मुत्तसिल मुकाममें पहोंचे. तमाम् लष्करको आराम दिया. थोडे दिन आराम कर, दुष्मन्के किलेपर चढाई करनेकी कोशिश कियी; वहोत्सा मुल्क अप्ने कव्जेमें किया. हमारा नाम सुन्कर दुष्मन् खौफ्केमारे पहाडी किलेमें छीप गया. जिस् जगहापर वह वेइमान शेवाजी मारेडरके गुम् हुआ था, उस्पर चढाई करनेकेलिये कुल् तय्यारी किई थी, लेकिन् अफसोस–इत्नेमें खुदा जाने–क्या फरेब हुआ! वह वदवख्त अप्ना लिवास तवदिल करके–रातको हमारे खेमीगाहमें घूसकर, मुझको नींदमें गाफिल पाजखमी कर भाग गया! यह दगावाजी कैसी हुई, उस्का मैंने वहोत् तालाश किया, लेकिन् उस्का विलकुल पता नहीं मिलता. मैंने कुल् फौज लेकर रवानगी औरंगावादकी तरफ किई. आगे–हुजूरका जैसा हुक्म होवे वैसा अमल किया जावे.”

आपका खाकसर,

**शाईस्तेखां.**

[ जी होय. “आपण महाराज धार्मिक–कुवेर, विश्वपति, कृपाघन, हिंदुस्थानचे महाराजाधिराज, शिरसाष्टांग; नराधीश, आपली आज्ञा घेऊन निघालों, तो मोठ्या खुशीनें दक्षिणेंत येऊन पोंचलों. येजिल्या जागीं पोंचल्यावर सर्व फौजेस विसावा दिला. थोडे दिवस विसावा घेऊन शत्रूच्या किल्ल्यांवर स्वारी केली, कांहीं किल्ले व बहुतेक देश हीं कावीज केलीं. आमचें नांव ऐकून शत्रु भयानें डोंगरी किल्ल्यांत लपून वसला. ज्या जागीं तो लपला होता, त्यावर हल्ला करण्याची आम्हीं अगदीं तयारी केली होती; इतक्यांत ईश्वरसाक्षी–कसा दगा झाला? तो कमनशीब वेषांतर करून, मध्य रात्रीस माझ्या तंवूंत शिरून व मला गाढ निजलेला वघून, मला जखमी करून पळून गेला! हा दगा कसा झाला ह्याचा मीं फार वारकाईनें शोध केला; परंतु त्याचा मुळीं पत्ताच लागत नाहीं. सर्व फौज घेऊन मी औरंगाबादेस आलों आहें. पुढें महाराज जसा हुकूम करतील तसें करीन. आपला चरणरज–शाईस्तेखां. ]

**औरंग०**–( संतापानें दांतओंठ चावून ) गज़ब! अलहमदु-लिल्लाः!! इस्तगफ़ुरअल्लाः!! कैसा कलमा सरिश्तेदारके तरफसे हुजूरमें आया? अफसोस–के, इतने वडे सीपासालाहरसे वह गालिब होगया? जिस्के सबबसे यह भागकर वापस औरंगाबादमें आन पहोंचे? ( पुनः दांतओंठ चावून हातपाय आपटून ) निहायत् शरमकी बात है!

[ अनर्थ! ईश्वर! ईश्वर! जुलूम ईश्वराचा!! सेनापतीकडून हें काय वातमीपत्र आलें आहे? अरेरे! अशा बलाढ्य सेनापतीपेक्षांही तो बलाढ्य झाला? त्याच्या भयानें खान पळून औरंगाबादेस परत आले? खरोखर— मोठ्या शर्मेची गोष्ट आहे!]

**जाफ०**–किवलेआलम! खतका मजमून तो यूंही जाहिर करता है.

[ विश्वाधीश! पत्रांतील मजकूर तर असेंच सुचवीत आहे. ]

**औरंग०**–( अधिक संतापानें ) आखर–भेडियोने शेंरको फतः क-
१ रलिया वैसी बात हो गई. देखो वजीर, वह बदमुआष बडा वेइमान सूरते इनसान, सीरते शैतान–जानकर, बहोत सीपाह, वमै ख़ज़ाना, उमूदा फौज हमरा खुद देकर, उस्पर रवाना किया; उस्के फौजमेंसे कोई षक्स, वेइमान न होवे, इस्लिये कोई राजपूत या हिंदू सरदारभी उस्के हमरा नहीं किया. तमाम् इसलामही होकर फेर ऐसा तूफान वरपा हुआ? मुसलमीन मज़हव्के आदमी जो वैसे वेइमान होंगे, तो अव् किसीपें यकीन रखा जाय! वस्स! अव्से हम् किसीपरभी यकीन नहीं रखेंगे. वादशाहत्में ऐसे वेवफा और कमहौसले सरदार या अमलदार होंगे, तो वादशाहत्, जल्द तवः हो जायगी. इत्तफाक, हौसला और जवामर्दी ये सुलतनत्का दुरुस्त पाया हैं. खांने कैसा–यह ख्याल नहीं किया?

२ [ शेवटीं—वकरीनें सिंहास जिंकलें अशी गोष्ट घडली. पहा वजीर! तो नीच मोठा ठग; दिसण्यांत माणूस, पण कृतीनें निवळ भूत–असें समजून, पुष्कळ फौज, दुप्पट

पैसा, व उत्तम सरदार–इतकें बरावर देऊन, त्यावर त्याला रवाना केलें, त्याच्या फौजेपैकीं कोणींही फितूर न व्हावें म्हणून, एकही रजपूत किंवा हिंदु सरदार बरोबर दिला नाहीं. सर्व मुलमान असतां, असा–दगा झाला ! मुसलमानी धर्माचेच लोक जर असे आपसांत अविश्वासी झाले, तर आतां विश्वास कोणावर ठेवावा ? बस ! यापुढें मी कोणावरही विश्वास ठेवणार नाहीं. राज्यांत असे अविश्वासी व कोत्या मनाचे सरदार किंवा अंमलदार असले, तर तें राज्य लौकरच नष्ट व्हायचें. ऐक्य, विश्वास व शौर्य, हीं राज्यरूप इमारतीचे भक्कम पाये आहेत. खानानें ह्याचा कसा नाहीं विचार केला ? ]

**जाफ०**–हुजूरका फर्मांना विलकुल बजा है. लेकिन् इस् रुक्केसे यूं मालूम् होता है के, उस्में खांका कुछ् कसूर नहीं है. जिस् बदबख्तने यह फिसाद किया होगा, उस् हरामजादेका तालाश कर, कत्लही करना चाहिये. मुसल्मीन हो–कुछ् फिकर नहीं. बादशाहत्में वैसे खुदगर्ज बिलकुल न रखने चाहियें.

[ महाराजांचें म्हणणें अगदीं योग्य आहे. पण, ह्या पत्रावरून इतकें समजतें कीं, ह्यांत खानाची मुळींच कसूर नाहीं. ज्या लुच्चानें हा दगा केला असेल, त्या हरामखोराची चौकशी करून, त्याला एकदम छाटून टाकावा; मग तो मुसलमान असला तरी चिंता नाहीं. राज्यांत असले स्वार्थी मुळीं ठेवूंच नयेत. ]

**चोपदार**–( प्रवेश करून ) जहांपन्हाकी सर्वोरोज फतः होवे. कोई दो फकीर आन पहोंचे हैं.

[ महाराजांचा सदा विजय असो. कोणी दोन फकीर आले आहेत. ]

**औरंग०**–अच्छा, आने दो अंदर उन् कलंदरोंकों.

[ ठीक, येऊं दे आंत त्या फकीरांना. ]

**चो०**–जी हां. ( जातो व त्यांना घेऊन येतो. )

**फकीर**–( विनयानें ) पाक मुसलमानी मजहबके ख्वाइषमंद और गरीबपरवर, आपका हमेशा इकबाल जियादा हो.

[ पवित्र मुसलमानी धर्मास मनापासून चाहाणारे व गरीबांचे पालक, आपल्या पराक्रमाची सदा वृद्धि असो. ]

**औरंग०**–ऐ फकीर साहेबांन्, आप्का आना मुबारिक हो. तशरीफ रखियें.

[ अहो फकीर हो, आपलें येणें शुभ असो. बसावें. ]

**फकीर**–( बसतात व त्यांपैकीं एक ) गरीबपरवर, पाक मुसलमानी मजहब्के फैलानेकेलिये, आप् दिलोजानसे कोशिश करतें हैं; लेकिन्, अफसोस ! क्या करैं ? ऐसी बादशाहत्में फकीरों और, मुसलमानोंपें काफरोंका सक्त जुल्म होता है ! बडा तआजुब है ! सच–सितम है ! सितम ! !

[ गरीबांचे पालक, पवित्र मुसलमानी धर्माच्या प्रसारार्थ आपण मनापासून झटत आहांत. परंतु, हाय हाय ! काय करावें ? अशा राज्यांत फकीरांवर व मुसलमानांवर नीचांचा इतका जुलूम ? मोठेंच आश्चर्य ! खचित–अनर्थ ! महा अनर्थ ! ! ]

**औरं०**–और ए क्या ? फकीरों और मुसलमानोंपर जुल्म ? ऐसा कौन अप्नी जान कुरवान् करनेवाला कंबख्त है के, मुसलमानी मजहब्के आदमीके तरफ–नजर उठाकर देखे ?

[ आणखी हें काय ? फकीरांवर व मुसलमानांवर जुलूम ! आपला नाश करून घेणारा असा कोण कमनशीब आहे कीं, मुसलमानी धर्माच्या माणसांकडे वांकड्या नजरेनें पाहील ? ]

**फकीर**–लेकिन् दक्खन्में शेवाजी करके एक काफिर–बडा बदमूआष और हिंदू मजहब्का ख्वाइषमंद षक्स हुआ है. उस्ने हाजीयोंपे सक्त जुल्म किया है. हम्ला करनेकेलिये जंगकी किश्तियां बनायीं हैं. बहोत्से हाजियोंके जहास उस्ने लूटे–और डुबा दियें ! अब्तक्भी वह नापाक सितमसेंवाज़ नहीं आता. जब्तक् आप् उस्का सक्त बंदोबस्त न करेंगे, तब्तक् उस् बुतपुरस्तका येही हाल रहेगा !

[ पण, दक्षिणेंत शिवाजी नांवाचा एक नीच–अधम व हिंदु धर्माभिमानी माणूस

आहे. यात्रेकऱ्यांवर त्यानें मोठा जुलूम मांडला आहे. छापे घालण्यासाठीं त्यानें लढाऊ गलबतें बनविलीं आहेत. मक्केस जाणाऱ्या यात्रेकऱ्यांचीं पुष्कळ गलबतें त्यानें लुटलीं व बुडविलीं ! अझूनही तो नीच जुलूम करीतच आहे. जोंपर्यंत आपण त्याचा योग्य बंदोबस्त करणार नाहीं, तोंपर्यंत त्या मूर्तिपूजकाचा असाच जुलूम चालू राहील. ]

**औरं॰**–( अधिक संतापून ) गजब ! इस्तगफुरअल्ला: ! उस् बदजातने हमारे पाक मजहब इसलाम्पैं इतना जुल्म मचाया है ? क्या–वह नापाक ऐसी गफलतमें इस् कदर वेषहूर हो गया है ? ऐ वदवख्त नापाक–यह औरंगजेब वादशाह, तुझे इस् दुनयासे वहोंत् जल्द नेस्तोनावूद करेगा. तेरे हातपाव जकडकर–चिमटेसे तेरी आखें निकालना–अगर तुझे मारनेकी कोशिश न करेंगे–तो हमारा नाम आलमूगीर नहीं. इस् चूहेने यहांतक घोरोगुल मचाया है ? खैर. कुछ् फिकर नहीं. वजीर–

[ अनर्थ ! हे भगवान् ! त्या नीचानें आपल्या पवित्र मुसलमानी धर्माचा असा छळ मांडला आहे ? तो अपवित्र गफलतीनें इतका भ्रमिष्ट झाला आहे काय ? तो डोंगरी उंदीर काय समजला आहे कीं, मुसलमानी धर्माचा कोणी अभिमानी नाहीं ? हे दुर्दैव्या–अधमा–हा औरंगजेब वादशहा–तुला लौकरच ह्या जगांतून अगदीं नाहींसा करील. तुझे हातपाय बांधून, चिमट्यानें तुझे डोळे न काढीन किंवा तुला न मारीन–तर मी विश्वजिंकणाराच नव्हें. ह्या उंदरानें इतकी धुंद मांडली आहे काय ? ठीक; कांहीं चिंता नाहीं. प्रधानजी,–]

**जाफ॰**–जहांपन्हा !

[ महाराज, ]

**औरंग॰**–इसी वक्त वहोत् जल्द गुजरात और औरंगावादके सुवेदारोंको सख्त हुक्म भेज दो के, जंगी लष्करी जहाज वराये जंगके तय्यार करवावो; और उस् नापाकके जहाजोंपर चढाई करके, उन् सबोंकों नेस्तोनावूद कर दो; और हाजियोंकी सब तऱ्हांसे परवरिश् करो; और जिस् जगां हिंदू मिलजावे–उस्को जबरदस्तीसे पकडकर अपने मजहब्में शरयक् करनेकी कोशिश करो. उन्के देवताओंके

मंदीर शिकस्ताकरके, उन्पर मस्जींदें तय्यार करवावो. उन्के मकानोंमें गाय कुरबानी करो; उस्का खून और गोष्त, जबरदस्तीसे उन्के मूहमें दो; जिस तऱ्हासे हो सके मजहबे हनूदके बरबाद करनेकेलिये कमर बांधो; जिस्सें कुल् हिंदुस्तान रसूलके जेरपाया होकर, हरवक्त उसको याद करे.

[ आतांचे आतां अत्यंत त्वरेनें गुजराथ व औरंगाबादच्या सुभेदारांस असा सक्त हुकूम पाठवा कीं, समुद्रांत लढाई करण्यासाठीं मोठमोठीं लढाऊ जहाजें तयार करवा; तीं त्या अधमाच्या जहाजांवर पाठवून त्याचीं तीं सर्व लढाऊ जहाजें अगदीं नाहींशीं करवा. मक्केस जाणाऱ्या यात्रेकऱ्यांचें चांगलें रक्षण करा. आणखी ज्या जागीं हिंदु मिळेल, त्याला जुलमानें धरून मुसलमान करा. त्यांचीं देवळें साफ जमीनदोस्त करून, तिथें आपल्या मस्जिदी बांधवा. त्यांच्या घरांत गाय कापा व तिचें रक्त व मांस जुलमानें त्यांच्या तोंडांत घाला; जेणेंकरून हिंदुधर्माचा नाश होईल, असे उपाय करण्यास अशा गच कमरा बांधा कीं, अवघा हिंदुस्थान देश—पैगंबराच्या चरणीं लीन होऊन, सर्वदा त्याचे स्मरण करील. ]

**जाफ०**—बहोत् अच्छा. हुजूरके हुक्मकी तामील करता हूं.

[ फारच उत्तम. महाराजांच्या हुकमाप्रमाणेंच करितों. ]

**औरं०**—वजीर, उस् नापाक खांको लिखो के, तूने बादशाहत्को बडा दाग लगाया; इस्लिये आजसे तेरा आना दरबारमें बंद् किया है.

[ प्रधानजी, त्या नीच खानाला लिहून कळवा कीं, राज्याला तूं अत्यंत कलंक लावलास; म्हणून आजपासून दरबारीं तुझें येणें बंद केलें आहे. ]

**जाफ०**—जैसा हुजूरका हुक्म.

[ जशी महाराजांची आज्ञा. ]

**औरं०**—ऐ पाक फकीरों ! अब् तुम जावो. तुम्हांरा कुल् बंदोबस्त होगा.

[ हे पवित्र फकीरहो ! आतां तुम्हीं निर्भय जावें. तुमचा सर्व बंदोबस्त होईल. ]

**फकीर**-( खुष होऊन ) खुदा आप्को हमेशा आबाद् रक्खें.
[ ईश्वर आपलें सदा रक्षण करो. ] ( जातात. )

**औरं०**-वजीर, अब शेवाजी हमारे कबजेमें आवे यूं तुझे सक्त कोशिश करनी चाहिये. क्योंके, साप्के बचेकी परवरिष करनेसे वह आइंदाको बडा ज़ेहरी होके, परवरिषकुनींदाकोभी तबः करता है, यूंही होगा.

[ प्रधानजी, आतां शिवाजीला आपल्या ताब्यांत आणण्यासाठीं तुम्हांला अतिशय मेहनत केली पाहिजे. कारण, सापाचें पोर लहान समजून त्याचें संगोपन केलें असतां, तेंच पुढें मोठें झाल्यावर पालनकरणाराचाच नाश करितें, तसेंच होईल. ]

**जाफ०**-हुज़ूरका फरमाना बजा है. अभी उस् कंबख्तको कभी न छोडना. उस्पर रेहम् करनेसे, वह शायद् बादशहत्को बहोत् नुकसान पहोंचावेगा. इस्लिये हुजूरसे इस् गुलामकी यह अर्ज हैके, उस्का सब् मुल्क जप्त करके, उस् नापाकको जेरपाकरके ऊमरभर कैदहिमें जरूर रखना चाहिये.

[ महाराजांचें भाषण योग्यच आहे, आतां त्या दुर्दैव्याला मुळींच नाहीं सोडायचें. त्यावर कृपादृष्टि केल्यानें कदाचित तो आपल्या राज्याचें अतिशय नुकसान करील; म्हणून महाराजांच्या पायांपाशीं माझी अशी विनंति आहे कीं, त्याचा सर्व देश जप्त करून, त्या नीचाच्या हातापायांत बिड्या घालून, त्याला मरेपर्यंत कैदेंतच ठेवायचें. ]

**औरंग०**-बेषक् यूंही करना चाहिये. लेकिन् शाईस्तेखांकी गफलत् और बेइमानकी चाल चलनेसे, हमारा किसीपरभी यकीन नहीं है; इसलिये उस्पै चढाई करनेकेलिये कौन्से नवाबको भेज़ना होगा ?

[ निःसंशय असेंच केलें पाहिजे. परंतु शाईस्तेखानाच्या चुकीमुळें व अविश्वासी वागणुकीमुळें माझा कोणावरच विश्वास नाहीं, ह्यासाठीं त्याच्यावर स्वारी करण्यासाठीं कोणता सुभेदार पाठवावा ? ]

**जाफ०**-जहांपन्हा, अगर एक शक्सके बेइमान और दगाबाज होनेसे

कुल् इन्सान वैसेही नहीं होंगे. इस् गुलामकी हुजूरसे दस्तवस्त अर्ज गुजारिश है के, हुजूरके जेरसायेमें जो जो नवाव और सरदार हैं, वे एकसा नहीं हैं. उन्मेंसे कईएक षक्स वडे ईमानदार, नेकनिय्यत् और ग़ाजी हैं. उस्की वहोत् दफे हुजूरको याद होगी के, दरवारमें उन्की तारीफ करके, उन्का तनखा वढाके वहोत्से इमानभी उन्कों वक्षें गयें हैं.

[ महाराज, कदाचित् एखादा माणूस वेइमानी व विश्वासघातकी झाला म्हणून, सर्वच तशीं होत नाहींत. महाराजांच्या पायांजवळ ह्या दासाची हीच विनंति आहे कीं, आपल्या चाकरींत जे जे सुभेदार आहेत, ते सर्व एकसारखे नाहींत. त्यांपैकीं कित्येक मोठे प्रामाणिक, विश्वासू, व शूर आहेत. महाराजांस ह्याचें बहुधा स्मरणही असेल कीं, दरबारांत त्यांची प्रशंसा होऊन, त्यांच्या तैनाती वाढवून महाराजांनींच त्यांना मोठमोठीं इनामेंही दिलीं आहेत. ]

**औरं०**–यह हमें मालूम हैं. लेकिन् तू जानता है के, उसी शाईस्तेखांने वहोत् दफे वहादुरी करके, अप्ना कित्ना नाम वढाया था ? मगर आखीरको उस्ने वह–ख़ाकमें मिला दिया !

[ हें मला ठाऊक आहे. परंतु तूं जाणतच आहेस कीं, त्या खानानें पुष्कळदां जय मिळवून किती नांव वाढविलें होतें ? पण शेवटीं त्यानें तें–मातींत मिळविलें ! ]

**जाफ०**–वंदेनवाज ! हुजूरके कदमोंमें मेरी यही गुजारिश है के, अप्ना मिरज़ाराजा जयसिंग, और उन्के साथ अप्ना वहादुर सरदार दलेलखां और साथ उमदा फौज देके उस्पर भेज देना चाहिये.

[ दासांचे पालक ! महाराजांच्या पायांशीं माझी अशी विनंति आहे कीं, मिरजाराजा जयसिंग, त्यांच्यावरोवर आपले शूर सरदार दलेलखान व वरावर चांगली हुशार फौज देऊन, त्यांना त्यावर पाठवावें. ]

**औरं०**–( चकित होऊन ) वजीर ! यह तूं क्या कहता है ? शाईस्तेखांकेसाथ कुल् मुसलमान फौज होकेभी फितूर और दगा हुआ,

तो उस् राजपूतको हमराह करनेसे न जाने वह बद्जात क्या फितूर करेगा ?

[ प्रधानजी, हें तूं काय म्हणतोस ? शाईस्तेखानाबरोबर सर्व मुसलमानी लष्कर असूनहीं फितुरी व दगा झाला; तर त्या रजपूताला तेथें रवाना केल्यानें न जाणो, तो नीच काय काय फितूर करील ! ]

**जाफ०**—हुजूरका फरमाना बजा है. लेकिन् राजपूतोंके बारेमें बहोत्ही तजरबा हैं. वे लोग बडे ग़ाजी, नेकनिय्यत, जिंदगीभर लढनेवाले, निमकहलाल, सखी, और दिल्के सच्चे हैं या नहीं, यह हुजूरको मालूमीही हैं. जयसिंगने आजतक हुजूरकी नौकरी इमानदारीसे बजाई है. राजपूतोंमें यह एक निहायत उमदा ख़सल है के, एकवक्त जिस् कामका वे दिल्हें इरादा करतें हैं, उस्के करनेमें कितनीभी सक्तीयें क्यौं न आन पडें, उन्की बिलकुल न पर्वा करके, उस् दिलि-इराद़्को पूराही करतें हैं.

[ महाराज म्हणतात तें खरें आहे. पण, रजपूतांच्या संबंधानें बहुत वेळां असा अनुभव आलेला आहे कीं, ते लोक मोठे शूर, प्रामाणिक, मरेपर्यंत लढणारे, स्वामिभक्त, सत्याभिमानी व खरे दिलदार आहेत, आणि हें महाराज जाणतच आहेत. जयसिंगानें महाराजांची नौकरी आजपर्यंत इमानदारीनेंच बजाविली आहे. रजपुतांत हा एक अति उत्कृष्ट गुण आहे कीं, एक वेळ आपल्या मनांत ज्या कामाचा ते निश्चय करतात, तें करितांना मध्यंतरीं किती जरी अडचणी आल्या, तरी त्यांची मुळींच पर्वा न करितां, इच्छित कार्य ते शेवटास नेतात.]

**औरं०**—खैर; जो तुझे यकीन है, तो उस्से बेषक भेज दो. लेकिन् उस्के हमरा दलेलखांकोभी भेज दो. ( दलेलखांस ) देखो दलेलखां, मिरज़ाराजा जातका राजपूत है, और शेवाजीभी हिंदू है. न जाने, भाईको भाई मिलजानेसे शाईस्तेखांके मुआफिक न हो. बहोत् हुशियारी और कोशिशसे उस् दगाबाजको पकडकर यहां ले आना.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

[ ठीक, जर तुमचा विश्वास आहे, तर पाठवा त्यांना. पण त्यांच्याबरोबर दलेलखानालाही पाठवा. पहा दलेलखान्, मिरजाराजा जातीचा रजपूत आहे व शिवाजी पण हिंदु आहे. न जाणो, वंधूला वंधु मिळाल्यानें शाईस्तेखानासारखें न व्हावें. फार हुशारीनें व युक्तीनें त्या दगेखोरास पकडून इथें घेऊन या. ]

**दलेलखां**–( उठून अदबीनें ) गरीवपरवर, हुजूरका हुक्म चष्मोंसे वजा लाऊंगा.

[ दीनरक्षक ! महाराजांची आज्ञा शिरसामान्य असून त्याप्रमाणेंच ती वजावीन. ]

**औरंग०**–नेकनामका यही काम है. वजीर,

[ प्रामाणिकाचें हेंच काम आहे. प्रधानजी, ]

**जाफ०**–जहांपन्हा ! ( महाराज. )

**औरं०**–मिरज़ाराजाकेसाथ अस्सी हज़ार फौज, वमै बारुदगोला, सवार और वेशुमार ख़ज़ाना देना. दलेलखांको कह दो के, वहभी अप्नेसाथ पांच हज़ार जंगी पठानोंकी फौज खूव तय्यारीसे रक्खे, और वेरूनी मिलाप दिखला के, अंदरूनी यह खियाल रख़ना के, वह राजपूत कौनसी चाल चलता है ? यह तमाम् हम्को वयान करना; और हमारा यूं इरादा है के, जयसिंगका लडका रामसिंग, उस्को उस्की वापके जगापे तैनात करके रख़ना. क्यौंके, इस्से दो वातें होंगी. एक तो यह के, मिरज़ा यूं मानेगा के, वादशाहाकी मेरे लडकेपर निहायत मेहरवानी है. दूसरा यह के, वह लडका उस्के वापके जामिनगिरीमें रहेगा.

[ मिरजा राजाबरोबर ऐशीं हज़ार सैन्य, दुप्पट दारूगोळा, स्वार, व विपुल खजीना द्यावा. दलेलखांसही सांगावें कीं, त्यानेही पांच हज़ार शूर पठाण खूप तय्यारीनें वरोवर घ्यावेत; वाहेरून ऐक्य दाखवून, आंतून असा तपास ठेवावा कीं, तो रजपूत कशा रीतीनें वागतो ? व हें सर्व मला कळवावें; आणखी माझा असा इरादा आहे कीं, त्याचा मुलगा रामसिंग, त्याला त्याच्या वापाच्या जागीं तैनात देऊन ठेवावें. कारण, ह्यापासून दोन

गोष्टी होतील. एक, मिरजा असें समजेल कीं, दरबारची आपल्यावर बहाल मर्जी आहे; दुसरें, तो मुलगा त्याच्या ऐवजीं आपल्या जामिनगिरींत राहील. ]

**जाफ०**–हुजूरके हुक्मकी मुआफिक कुल् बंदोबस्त करके उस् राजपूतको भेज देता हूं.

[ महाराजांच्या हुकमाप्रमाणें सर्व बंदोबस्त करून त्या रजपुताला पाठवितों. ]

**काजी**–मज़हबे येहलेइस्लाम्के ख़ाइषकरनेवाले बादशाह! हुजूरका नमाज पढनेका वक्त हुआ है.

[ मुसलमानीधर्माचे पूर्ण अभिमानी महाराज! आपली ईश्वरभक्तीची वेळ झाली. ]

**औरं०**–अच्छा; तो आजके दरबारकाभी काम बरख़ास्त हो चुका.

[ ठीक, तर मग आजच्या दरबारचेंही काम संपलें. ]

**छडीदार**–दरबार बरख़ास्त.

[ राजसभा विसर्जन. ]

## दुसरा अंक समाप्त.

---

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

### स्थल—राजगड—दरबार.

( सर्व मानकरी व लहान मोठे अधिकारी आपापल्या जागीं बसले आहेत इतक्यांत शिवाजी महाराज येतात; सर्व उठून त्यांस मान देतात. )

**शिवाजी**—अंबाबाईच्या कृपेनें व समर्थांच्या आशीर्वादानें बहुतेक कार्यभाग तर बिनधोक आटपला. सुरत, अहमदनगर व औरंगाबादच्या आजूबाजूचा बराच मुलूख सर केला. मक्केचा मार्गही अडवला. कोंकणांतून मुसलमानांचा पाय साफ बाहेर काढला. आपल्या आंगीं काय सामर्थ्य आहे, हें गनिमांना खूब दाखविलें. प्रसंग आलाच, तर पुढची जय्यत तय्यारी करून ठेवलीच आहे. आमची एकी झाली, धर्माचा, जातीचा व कुळाचा अभिमान आहे, तसाच कायम राहिला, आणि अंबे ! तुझी कृपा झाली, तर काय नाहीं होणार ?

**मोरोपंत**—( उठून अदबीनें ) महाराज, हा सर्व अंबाबाईचाच खेळ आहे. शिवाय, मोंगलांच्या जबड्यांतून आपला देश मुक्त व्हावा ह्मणून, हातावर शीर घेऊन रात्रंदिवस एकसारखा चालू असलेला महाराजांचा हा भगीरथ प्रयत्न; आपली कामगिरी बजावण्याकरितां जीवापाड श्रम करणारा सेवकसमुदाय; तशीच सर केलेल्या मुलखांची एकंदर योग्य व्यवस्था; योग्यतेप्रमाणें सर्वांची संभावना करण्याची महाराजांची हातोटी, ह्या सर्व गोष्टींमुळें, महाराजांवर सर्वांची पूर्ण भक्ति आहे.

**शिवाजी**–मोरोबा, ही जूट, ही भक्ति व हा अभिमान, हीं जर अशींच वाढत गेलीं, तर कांहीं दिवसांनीं ह्या दुष्ट मोंगलांचा साफ वीं-मोड होऊन–चौफेर आपली मऱ्हाठशाही होईल. आणखी असें झा-लेंच पाहिजे. कारण, गनिमांनीं आपल्या मुलखाची अगदीं पायमल्ली केली आहे ! त्यांतून–ह्या हरामजाद्या औरंगजेबानें तर जुलमाचा अ-गदीं कळस करून सोडला आहे !! हा जुलमी राक्षस–रात्रंदिवस माझ्या उरांत कसा–तीक्ष्ण भाल्यासारखा सलत आहे, ह्मणाल तर.

**मोरोपंत**–कसा नाहीं सलणार ? कौरववंशाच्या नाशाला जसा दुर्योधन, तसाच हा क्रूर कपटी औरंगजेव–मोंगल वंशाचा व ऐश्वर्याचा नाश करायला उत्पन्न झाला आहे. आजपर्यंत ह्यानें जीं जीं कृत्यें केलीं व आजही करीत आहे, त्यांतून एकही त्याच्या कल्याणाचें दिसत नाहीं. सर्व हिंदु प्रजा तर त्रासलीच आहे; शिवाय, त्याच्या कुटिल व घातकी वर्तनामुळें, त्याचे जातभाई, बहुतेक लहान मोठे कामदार, फार तर काय–पोटचीं पोरें देखील त्याजवर अगदीं नाखुष आहेत ! अशी ही आपसांतील यादवी, दिवसानुदिवस झपाट्यानें वाढतच आहे, ह्मणून ह्मणतात.

**शिवाजी**–आह्मांला तर हेंच पाहिजे आहे. असो; पण मोरोबा, तो खान इथून पळून गेल्यापासून, दिल्लीकडील कांहींच खबर समजली नाहीं. खानाच्या झालेल्या नाचक्कीमुळें, औरंगजेव चेवलेल्या जहरी नागासारखा चडफडत असेल. आपण तरी कुठें स्वस्थ बसून राहिलों आहोंत ? त्याच्या कृष्णकारस्थानांची खडान्‌खडा बातमी मिळविण्या-साठीं, आपल्या बहिर्जीची खटपट चालली आहेच. ( स्मरण झालेंसें करून ) हो ! बरी आठवण झाली. गेल्या रात्रीं, अंबाबाईनें स्वप्नांत दर्शन देऊन सांगितलें कीं, "शिवबा ! या वेळीं तुझ्यावर मोठा विकट

प्रसंग येणार आहे; आणि तो सामोपचारानेंच तुला पार पाडला पाहिजे. तरी पण तूं कांहीं चिंता करूं नको. मी तुला यांतून मुक्त करीन." इतकें बोलून, श्रीअंबाबाई गुप्त झाली! ह्या स्वप्नाचा हेतु काय असेल तो असो? (विचार करीत आहे इतक्यांत–)

**हुजऱ्या**–(मुजरा करून) बहिर्जी आल्याती, सरकार.

**शिवाजी**–कोण–बहिर्जी! येऊं दे त्याला.

**हुजऱ्या**–जी. (जातो.)

**बहिर्जी** (प्रवेश करून मुजरा करतो व अदबीनें बाजूस उभा रहातो.)

**शिवाजी**–बहिर्जी, कशी काय आहे गनिमाकडची खबर?

**बहिर्जी**–खबर–संग मांयदळ फवाज अन् मस्त खजिना घेउनशी जयसिंग रजपूत अन् पठान दलेलखान्, अस दोन दांडग सरदार–पुरंदर अन कांडाना ह्यांच्या मदल्या मेदानामंदीं येऊनशी उतरल्याती. ह्या यळची तय्यारीबी जय्यत दिसतीया सरकार!

**शिवाजी**–(चकित होऊन.) ऐकलेंत सर्वांनीं? श्री अंबाबाईचा साक्षात्कार खोटा व्हायाचाच नाहीं. बरें पण बहिर्जी, तो रजपूत सरदार कसारे आहे? आपल्याविशीं त्याचा कल कसा काय आहे, ह्याचा तूं तपास केला का कांहीं?

**बहिर्जी**–त्यो रजपूत सरदार साधा दिलाचा दिसतुया, सरकार. पुन आपल्याइशीं त्येचा इचार कसा हाये हे मातुर न्हाई उमगल. तळामंदीं सावधगिरी अन ब्येतबातवी अक्शी सक्त हाये. त्यो गव्रू, शाइस्तेखानागत गाफिल न्हाई, सरकार!

**शिवाजी**–(मिशांस पीळ देऊन) ठीक. पालकर! गनीम तर पुन्हा आपल्या मुलखांत येऊन थडकला! बहिर्जीच्या ह्मणण्यावरून,

त्याची तय्यारीही कडेकोट आहे. तेव्हां, आतां तुमचा कसा काय विचार ?

**नेताजी**–रजपूत सरदार हाये ह्मून, अदुगर सल्यान काम व्हत असल, तर वगा; न्हाई तर मग हायतीच समद धारकरी हातावर डोक्शी–अन भाल तरवारी उपसुनशी अक्शी तय्यार.

**तान्हाजी**–( मिशांस पीळ देऊन ) त्येचका इक्त भेय लागलीया सरकार ? आपल्याप हजार हुन्नर हायती. हिंग ए वगा–सरकार ! गनिमाच नाव ऐकल कि हिंग माझ दंड–तवाच तट फुगत्याती ! आंगामंदीं अवसर आल्यागत व्हतोया, अन् ड्वाळ कस, अक्शीं लाल गुंजवानी व्हत्याती. मोरोवा, पालकर, कंक, फसलकर, वाजीदादा, असल वानदार सूर टगटग धारकरी–जवा बगाव तवा ढाल समशेर उपसुनशी, कस–कस कावलेल्या वागागत अक्शी तय्यार हायती.

**शिवाजी**–शाबास ! माझ्या रणशूर तान्हाजी ! तुह्मी सर्व तसेच आहांत. पण, असें बघ तान्हाजी, आपल्या मऱ्हाठशाहीला नुक्ताच कुठें आरंभ झाला आहे. पुन्हा आलेला प्रसंग सामोपचारानें दूर करण्याविशीं श्रीअंबाबाईचीही आज्ञा झाली आहे. शिवाय, आपल्या बलाबलाचा नीट विचार करून, पुढील मोठ्या लाभाकडे लक्ष लावून, हा प्रसंग, सलोख्यानें पार पाडण्यांत आपलें हित आहे. तसें न झालें, तर मग आहेच आपली तय्यारी.

**मोरोपंत**–महाराज ह्मणतात तेंच योग्य आहे.

**हुजऱ्या**–(प्रवेश करून.) महाराज, कुनी योक रजपूत सवार ह्मोरवंद कागुद घेऊनशी आलया.

**शिवाजी**–कोण–रजपूत स्वार ? ( विचार करून ) बरें तर, त्याला तिथेंच उभा ठेव, व तूंच तो कागद घेऊन ये.

**हुजऱ्या**–जी. (जातो.)

**मोरोपंत**–हा स्वार जयसिंगाकडचा असावा.

**हुजऱ्या** (येऊन तें पत्र शिवाजीस देतो.)

**शिवाजी**–(पत्रास हात लावून) मोरोबा, वाचा पाहूं यांत काय आहे तें?

**मोरोपंत**–(वाचतो.) "बहादुर शिवाजी भोसले; तुम् शिसोदे राजपूत यह हम् जानतें हैं. तुम् हम् एकही हैं. तुम्ने मुलाकात्कू आना. सब् बातमें तुह्मारा भलाही करूं गा. **मिरज़ाराजा जयसिंग.**"

**शिवाजी**–(ऐकून) पत्र तर सलगीचेंच आहे. पण, त्यावर एकदम भरंवसा ठेवावा कसा? हा पडला औरंगजेबाचा सरदार. न ज़ाणों, घातही करायला तो नाहीं चुकायाचा.

**मोरोपंत**–तेंही खरें आहे.

**शिवाजी**–(अंमळ विचार करून) हं! आतां हीच तोड. अगोदर जयसिंगाला एक चांगलें गौरवून पत्र लिहावें व बहुमोल नजराणा देऊन रघुनाथपंतालाच तिथें पाठवावें; ह्मणजे गनिमाचा सर्व भेदही समजेल.

**मोरोपंत**–ही तर फारच उत्तम तोड.

**शिवाजी**–तर मग लिहा एक पत्र. रजपूत भाई आहे. द्या चढवून एकदम हरभऱ्याच्या झाडावर. आणखी त्या स्वारालाही चांगला पोषाख द्या.

**मोरोपंत**–ठीक आहे. हुकमाप्रमाणें करवितों.

**शिवाजी**–पण आतां, वकील तिथून जाऊन येईपर्यंत, सर्वांनीं आपापली अगदीं कडेकोट तय्यारी करावी. पहा! प्रसंग फारच विकट आला आहे! नाचक्की होतां कामा नये.

**मोरोपंत**–( आवेशानें ) नाचक्की ! मग कारकुनी ती कसली ? एका हातांत झगझगीत नग्न तलवार व दुसऱ्या हातावर शीर घेऊन,–रणमैदानांत जाण्यासाठीं सर्व वीर, महाराजांच्या हुकमाची वाट पहात आहेत.

**शिवाजी**–शावास तुमची मोरोबा ! तान्हाजीराव, ऐकलेंतना मोरोबांचें जोरदार भाषण ?

**तान्हाजी**–त्य का पुसाव महाराज ! आपल मोरोबा ह्मनजे अक्शी दुसर परसुरामच. लिवन्यामंदींबी तसच; बोल्यामंदींबी तसच अन् हिंग मर्दुमकी मंदीं त पुसुच नका–अक्शी हातखंडा.

**शिवाजी**–खरें आहे. ( जातात. )

---

## प्रवेश २ रा.

### स्थल–पुरंदरगडाजवळचें मैदान–तळ.

**दलेलखां**–( जयसिंगाकडे जात असतां आत्मगत ) शेवाजीका वकील आयाथा. उस्की जयसिंगकेसाथ क्या क्या गुफ्तगू हुई, सो बिलकुल् समझनेमें नहीं आई; यह अच्छा नहीं हुआ. क्या ? आखीर हिंदूको हिंदू मिला यूं तो नहीं हुआ ? क्या करें ? हुजूरनेंहि उस्को कुल् इख्तीयार दिया है, इस्लिये जियादा बोलने नहीं सक्ता ! तोभी, किसीना किसी तौरसे इस् बातकी तालाश करूंगा, और दगा पहचानेहीं तुरत् हुजूरको आगाः करके, उस् राजपूतको झट् कैद करूंगा. खैर. अब् उस्के डेरेमें जाकर देखनाके, उस्के दिल्में क्या है ? पीछे जो होगा, सो करूंगा. ( जयसिंगाजवळ जातो. )

[ शिवाजीचा वकील आला होता. जयसिंगाशीं त्याचें काय काय बोलणें झालें, तें मला मुळींच नाहीं समजलें; हें चांगलें झालें नाहीं. काय ? शेवटीं हिंदूस हिंदु मिळाला असें तर

नाहींना झालें ? काय करावें ? बादशाहानेंच त्याला कुल् अधिकार दिला आहे; तेव्हां मला अधिक बोलवत नाहीं ! तरी पण कसेंही करून या गोष्टीचा तपास करायचा. कांहीं दगा दिसलाच, तर तो तेव्हांच बादशहाला कळवून, या रजपुताला झट् कैद करायचें. असो. आतां त्याच्या डेऱ्यांत जावें. त्याच्या मनांत काय आहे, तें समजल्यावर, पुढें जें करायचें तें करूं.]

**जयसिंग**–आईये खांसाहेब.

[ यावें खानसाहेब.]

**दलेलखां**–( जयसिंगाच्या डाव्या बाजूस बसून ) आप्को इहां मुकाम किये बहुत् दिन हुए. अब् कहांतक् ऐसे बेफिकीर बैठेंगे ? इसूसें बेहेत्तर है के, अप्नी हदके नजदीक कोंढाना और पुरंदर ये दो संगीन किले हैं; उन्मेंसे पुरंदरपर मैं चढाई करताहूं. आप् कोंढानेपर चढाई करैं. वे दो किले अप्नें ताबेमे आनेसे शेवाजी जल्द अप्ने कब्-जेमें आवेगा.

[ येथें मुक्काम करून आपल्याला बरेच दिवस झाले. आतां कोठवर असे स्वस्थ बसणार ? त्यापेक्षां, आपल्या तळाजवळ कोंढाणा व पुरंदर असे दोन मजबूत किल्ले आहेत. त्यांतून पुरंदरावर मी चाल करतों, आपण कोंढाण्यावर चाल करावी. ते दोन्ही किल्ले आपल्या ताब्यांत आले कीं शिवाजी लौकरच आपल्या अंकित होईल.]

**जयसिंग**–आप् कहते हो सो सच् है. लेकिन् कल शेवाजीका वकील मेरेपास आया था; उस्केसाथ जो गुफ्तगू हुई, उस्परसे यूं मालूम् होता है के, उस्का अपनेसाथ लढनेका इरादा नहीं है. लढेबिन जो वह अप्नें ताबेमें होजाय, तो बेफायदा जंग उठाना क्या जरूरत् है ?

[ तुमचें म्हणणें ठीक आहे. पण काल शिवाजीचा वकील मजकडे आला होता. त्याच्याशीं जें भाषण झालें, त्यावरून समजतें कीं, त्याचा आपल्याशीं लढायचा इरादा नाहीं. लढाईशिवाय तो आपला अंकित होत आहे, तर मग उगीच लढाई करण्याचें काय काम आहे ?]

**द्लेलखां**–उस्का वकील आया होगा. या खुद आप्भी क्यौं न आवे; तोभी, उस् मूजीका इतवार न करना चाहीये. क्यौंके, ऊपरसे अप्नेसाथ सलाकी गुफ्तगू करते. करते, अंदरूनी न मालूम् वो क्या करता होगा ?

[ आला असेल त्याचा वकील. किंवा तो स्वतःही जरी आला, तरी त्या लबाडाचा भरंवसा नाहीं. वरवर आपल्याशीं सामोपचाराच्या गोष्टी बोलतां बोलतां, न जाणों आंतून तो काय करीत असेल ? ]

**जयसिंग**-मैं कुछ् अफ्जुलखां या शाईस्तेखांके मुआफिक् गाफिल नहीं हूं. मेरे सक्त बंदोबस्तके आगे उस्का दगा न चलेगा यह् मैं यकीन् करताहूं. जो दगा करनेका उस्का इरादा होगा, तो क्या–उस्का तालाश हम्से न होगा? अब् जो तुम् कहते हो के, "उस्के किले काबिज करना." दुरुस्त है. लेकिन् गौर करो के, वे कब्जेमें आयें तो बेहेत्तर, नहीं तो अप्नें अब्रूको दाग लगाना पडेगा. अगर जंगही करना हो, तो अव्वल् उस्का मुल्क अप्ने ताबेमें करके, फेर किलोंका सक्त बंदोबस्त करना होगा.

[ मी कांहीं अफजुलखां किंवा शाईस्तेखांसारखा गाफिल नाहीं. माझ्या कडेकोट बंदोवस्तापुढें, त्याचा दगा चालायचा नाहीं अशी मला खात्री आहे. दगा करायचाच जर त्याचा बेत असला, तर काय–त्याचा सुगावा लागणार नाहीं म्हणतां ? आतां तुम्ही म्हणतां कीं, त्याचे ते किल्ले सर करावे. ठीक आहे. पण, विचार करा कीं, ते सर झाले तर उत्तमच; नाहीं तर व्यर्थ आपली अपकीर्ति मात्र होईल. लढाईच करायची आहे, तर अगोदर त्याचा मुलूख आपल्या ताब्यांत घेऊन, नंतर किल्ल्यांचा नीट बंदोवस्त करावा. ]

**द्लेलखां**–( रागानें ) यह् आप्की सला मुझे बिलकुल् पसंद नहीं. चाहे तो आप् यूं ही करें. मैं तो अपनी फौज लेकर, इसी वक्त पुरंदरपर चढाई करतां हूं. ( उठतो. )

[ हा आपला बेत मला मुळींच पसंत नाहीं. पाहिजे तर आपण असें करा. मी आपली फौज घेऊन आतांचेआतां पुरंदरावर चाल करणार. ]

**जयसिंग**–इस् हटसे तुम् बेफायदा अपनी फौज और जंगके सामानकी बरबादी करने चहाते हो. इस्से हुजूरका मैंभी गुन्हेगार ठेरूंगा.

[या हट्टानें तुम्ही आपल्या फौजेचा व लढाऊ सामानाचा उगीच नाश करीत आहां. यानें मीही बादशहाचा दोषी होईन.]

**दलेलखां**–कुछ् पर्वा नहीं. मैं उस्का जबाबदार हूं. (जातो.)

[चिंता नाहीं. मी त्याचा जबाबदार आहें.]

**जयसिंग**–खैर; देखो भवानसिंग, उस् खांकेलिये क्या किया जाय? उस् गव्हांरको बिलकुल् खियाल नहीं. क्या करैं? बादशाहाकी नाराजी होगी–नहीं तो उस् बेहूदाको अभी दूर कर दूं.

[असो; बघ भवानसिंग, त्या खानाला काय करावें? त्या मूर्खाला कांहींच विचार नाहीं. काय करावें? बादशहाची इतराजी होईल–नाहीं तर, त्या उन्मत्ताला आतांच दूर केलें असतें.]

**भवानसिंग**–चाहे उत्ना आप् करैं; लेकिन् आग और तेलका कभी मिलाफ नहीं होता; वैसा उन् मुसलमानोंका और अपना एकदिल् कभी न होनेवाला है. (इतक्यांत दलेलखान लढाईस जाण्यासाठीं आपल्या सैन्यास तयार होण्याचा डंका वाजवितो.) सुनीये महाराज, बेवकूफनें अखीर जंगही करनेकी नौबत बजवाई.

[आपण हवें तें करा; पण, आगीचा व तेलाचा जसा कधींच मिलाफ होत नाहीं, तसें त्या मुसलमानांशीं आपलें एकदिल कधींच नाहीं व्हायचें. ( ) ऐकावें महाराज मूर्खानें शेवटीं लढाईचा डंका वाजवविला.]

**जयसिंग**–अच्छा; जाने दो उस्को. बेवकूफकेसाथ बेवकूफ बन्ना अच्छा नहीं. जो कुछ् करना, सो सोचकरहि करना. अब् तुम् ज्याके देखो के, उस्केसाथ कौन कौन जाता है?

[बरें; जाऊं द्या त्याला. मूर्खाबरोबर मूर्ख होणें चांगलें नाहीं. जें करणें तें विचारानेंच करावें. आतां तुम्हीं जा, व त्याच्याबरोबर कोण कोण जातो तें पहा.]

**भवानसिंग**–बहोत् अच्छा.
[ फार चांगलें. ] ( जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

### स्थल–राजगड शिवाजीमहाराजांचा वाडा–एकांतस्थल.

**शिवाजी**–पंडितराव, तुमच्या सांगण्यावरून जयसिंगाच्या मनांत आपल्याविशीं दगा नाहीं हें चांगलेंच आहे. पण, तो दलेलखां मात्र मोठा हरामजादा आहे. त्यानें पुरंदरावर लगट केल्याचें ऐकतों.

**रघुनाथपंत**–परंतु महाराज, खुद्द जयसिंग जर आपल्याला अनुकूल आहे, तर मग त्या खानाची इतकी परवा कशाला पाहिजे.

**शिवाजी**–तर मग आतां मिरजाराजाची भेट घ्यावी ह्मणतां ?

**रघुनाथपंत**–जशी महाराजांची मर्जी. (इतक्यांत बहिर्जी येतो.)

**शिवाजी**–बहिर्जी, कायरे ? गनिमाची आणखी कांहीं धामधूम आहे काय ?

**बहिर्जी**–व्हय सरकार.

**शिवाजी**–काय ती सांग पाहूं ?

**बहिर्जी**–महाराज, दलेलखान् पठानान तोलदार फवाजेनिशीं पुरंदरावर लगट केलिया !

**शिवाजी**–ठाऊक आहे. मग पुढें ?

**बहिर्जी**–आपल मुरारवा, त्यासंग अक्शी निदान करुनशी झुंजल. खान इक्ता तोलदार अन मर्दाना पठान; पुन आपल्या सूर मुरारवान त्याच पाशे पठान हुँ–तव्वाच ठार केल; अन् बाकीची फवाजवी वेसुमार मारलीया. पुन खानाची फवाज पडली मांयदळ ! चारी-कुंड तिन गडावर सारखा मारा चालवला; तव्वा मातुर मुरारवाचा

अक्शी बेइलाज झाला, सरकार! तरि पुन त्या मर्दान धीर न्हाई सा-डला. भुकन कावलेला वाग जसा हरनाच्या कळपावर तुटून पडतुया, हिंग तस्सा त्यो गब्रू–'हरहर महांदेव' म्हगुनशी दलेलखानावर तुटून पडला! निवडुंगावानी शे दोनूशे पठान–हुँ तव्वाच जमीनदोस्त केल त्या मर्दान.

**शिवाजी**–शाबास मुरारबाची! खूप गाजविली.

**बहिर्जी**–त्य पुसूच नगा सरकार! मुरारबाची मर्दुमकी बगून, त्या खानान त्वांडांत ब्वाटं घातली बगा!

**शिवाजी**–कां नाहीं घालणार? आपला मुरारबा तसाच रण-शूर आहे.

**बहिर्जी**–खर हाय सरकार. पुन का करतुया? टोळधाडीवानी मोगल त्यावर चारीकुंड अक्शी तुटून पडल! तलवारींची सारखी च-कमक झडत व्हती बगा! त्यामंदीं शेकडो धारकरी ठार झाल! अन शेवटी–खानाचा तीर लागुनशी आपल सूर मुरारबा पडल!!!

**शिवाजी**–अरेरे! फारच वाईट झालें बहिर्जी!! बरें पण बाकी-च्यांची काय वाट?

**बहिर्जी**–मुरारबा पडताच समद मावळ हुल करुनशी झट् गडावर गेल, अन् अजून पावतर त्ये खानासंग मोठ्या दमान लढत्याती!

**शिवाजी**–गड अजून खानाच्या हातीं नाहीं लागला तर? शाबास आहे आपल्या बहाद्दर मावळ्यांची!

**बहिर्जी**–आपल मावळ का कमी हायती सरकार? झाडाल बांधल त हिंग झाडवी तव्वाच झट् उपटुनशी घेऊन जात्याल.

**शिवाजी**–खरं आहे. (रघुनाथपंतास) पंडितराव, ऐकलाना हा सर्व प्रकार?

**रघुनाथपंत**–होय महाराज. परंतु, जयसिंग महाराजांच्या बोलण्याचा रोंख अशा प्रकारचा मुळींच नव्हता. ही सगळी खटपट त्या खानाची असेल.

**शिवाजी**–एकटा खान काय करतो ? यांत मिरजाराजाचीही सल्ला असलीच पाहिजे.

**रघुनाथपंत**–चालू प्रकारावरून तसें अनुमान होत आहे. पण त्यानें श्रीकर्पूरगौरीची व श्रीएकलिंगाची कडकडीत शपथ घेऊन सांगितलें कीं, " तुमच्याविशीं माझ्या मनांत बिलकुल दगा नाहीं " दग्याच्या वेळीं प्राण गेला तरी रजपूत लोक अशी शपथ घ्यायाचे नाहींत, हें महाराज जाणतच आहेत.

**शिवाजी**–( अंमळ विचार करून ) असो. श्रीअंबाबाईचें भविष्य नाहींच कधीं खोटें व्हायचें. दलेलखानानें पुरंदर घेण्यापूर्वीच आपण जयसिंगाची भेट घ्यावी. ( रघुनाथपंतास ) तर मग आतांचेआतां जयसिंगाकडे जा. त्याचा कल कसा काय आहे त्याचा नीट तपास करा व मी भेटीस येत आहें असें त्याला सांगा. त्यावर तो काय ह्मणेल तें मला झट् कळवा, ह्मणजे मी तसाच निघून येईन.

**रघुनाथपंत**–( विनयानें ) जशी महाराजांची आज्ञा, ( जातो. )

**शिवाजी**–वहिर्जी, तान्हाजीरावाला ह्मणावें फौजेपैकीं पंचवीस हजार धारकरी अगदीं जय्यत तय्यार करून ठेव. तूं एक हज्जार मावळ्यांना एकसारखा बादली पोषाख देऊन सजीव.

**वहिर्जी**–जी. ( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

### स्थल.—जयसिंगाचा डेरा.

**रघुनाथपंत**—(उठून अदबीनें) दलेलखांने पुरंदरपर जो चढाई किई है, उस्में आप्की बिलकुल सला नहीं होंगी, यह हमारे महाराजको यकीन् है.

[दलेलखानानें पुरंदरावर जी चढाई केली आहे, त्यांत अपली बिलकुल संमति नसावी, हा आमच्या महाराजांस विश्वास आहे.]

**जयसिंग**—बेष्क, इस् काममें हमारी बिलकुल सला नहीं है.

[निःसंशय, या कामांत माझी मुळींच संमति नाहीं.]

**हुजऱ्या**—(प्रवेश करून) महाराज, आप्के मुलाकातकेवास्ते शेवाजी महाराज आयें हैं.

[महाराज, आपल्या भेटीसाठीं शिवाजी महाराज आले आहेत.]

**जयसिंग**—कौन? दोस्त शेवाजी राजे आये हैं?

[कोण? मित्र शिवाजी राजे आले आहेत?]

**हुजऱ्या**—जी हां, हुजूर.

[जी होय, महाराज.]

**जयसिंग**—(उठून) अच्छा. चलो उन्को यहां लायियें. (इतक्यांत शिवाजी महाराज येतात.) आईये (उभयतां भेटतात.) प्यारे शेवाजी, बैठीये. (आपल्याजवळ उजव्या बाजूस बसवितो.)

[ठीक; चला त्यांना इथें घेऊन येऊं. यावें. प्रिय शिवाजी, बसावें.]

**शिवाजी**—(बसून) आपका रामसिंग, वैसा मैं हूं.

[आपला रामसिंग, तसा मी आहें.]

**जयसिंग**—सच् है, तुमको मैं वैसाही मान्ताहूं. क्यौं के, तुम् हम् एकही हैं. प्यारे शेवाजी, तुम् मत् डरो. तुह्मारे बालके तरफभी

कोई निगाह उठाकर देखे, तो वहां मैं अपूनी जान कुरवान् करनेको तय्यार हूं.

[ खरें आहे. तुम्हाला मी तसाच मनतों. कारण, तुम्ही आम्ही एकच आहोंत. प्रिय शिवाजी, तुम्ही भिऊं नका. तुमच्या नुसत्या केसाकडे जर कोणी वाकड्या नजरेनें पाहील, तर मीं तिथें आपलें बळिदान देण्यास तय्यार आहें. ]

**शिवाजी**–सच है. सलाकेलिये आपूका आया हुवा खत्, और मेरे वकीलकेसाथ हुई हुई आपूकी दोस्तीकी गुफ्तगू सुनतेही मुझे यकीन् हुआ के, जरूर आपूसे मुलाकात् करूं.

खरें आहे. सामोपचाराविर्शी आपलें आलेलें पत्र, व माझ्या वकीलार्शी झालेलें आपलें दोस्तीचें भाषण ऐकूनच माझी खात्री झाली कीं, जरूर आपली भेट घ्यावी.]

**जयसिंग**–वहोत् खूब. अच्छा, प्यारे शेवाजी, अब् तुम् गौर करो के, औरंगजेब वादशाहाने मुझे किसलिये यहां भेजा है? आज वह वादशाह अपूने मुल्कमें वडा जोरावर है? उसूकेसाथ दुष्मनी करके रेहना अच्छा नहीं. तुमने शाईस्तेखांको दगा दिया और हाजीयोंका तकलीफ् देना शुरू किया; इसूलिये वादशाह तुमपर वहोत् नाराज है!

[ फार उत्तम. असो; प्रिय शिवाजी, आतां तुम्ही विचार करा कीं, औरंगजेब वादशाहानें मला येथें कां पाठविलें आहे? हल्लीं तो वादशाहा, आपल्या देशांत फार प्रबल आहे. त्याच्याशीं वैर करणें चांगलें नाहीं. तुम्ही शाईस्तेखानाला दगा दिला, मक्केस जाणाऱ्या यात्रेकऱ्यांस त्रास दिलात, म्हणून वादशाहा तुम्हांवर अगदीं नाखुष आहेत। ]

**शिवाजी**–वेषक्, वे खफा हुवे होंगे. और औरंगजेव वादशाह जोरावरही हैं. उनूकेसाथ दुष्मनी करनेका मेरा विल्कुल् इरादा नहीं है. लेकिन् क्या करें? आजतक् उन्होंने–अपूने धरम, गो, ब्रह्मन, साधु, संत, देवल, औरतें और भाईयोंपर जो जुल्म जारी किया है–और कुल् हिंदूओंपर 'जेजीया' लगाया है–सो देखतेही–मेरा दिल् जल रहा है!! इन्के मौकूफ करनेकेलिये यह कोशिश करता हूं. अगर, अक-

वर बादशाहाके मुआफिक जो शाह औरंगजेब चलता, तो उस्केसाथ लडनेका मेरा क्या काम था?

[ खरेंच, ते नाखुष झाले असतील. औरंगजेब बादशाहा प्रबल तर आहेतच. त्यांच्याशीं वैर करण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. पण काय करावें? आजवर त्यांनीं– आपल्या धर्मावर, गाईब्राम्हणांवर, साधुसंतांवर, देव, देवळें, स्त्रिया व आपल्या लोकांवर जो जुलूम मांडला आहे व सगळ्या हिंदूंवर जो माणूसपट्टीचा कर बसविला आहे–हें बघूनच माझ्या उराचा इतका भडका झाला आहे! हा जुलूम बंद व्हावा म्हणून मी ही खटपट करीत आहें. अकबर बादशहासारखा जर शाहा औरंगजेब वागता, तर त्याच्याशीं लढायचें मला काय काम होतें? ]

**जयसिंग**–शेवाजी, अप्ने धरम और लोगोंपर उस्ने बहोत् जुल्म मचाया है, यह बात सच है. लेकिन्, वो बडा जोरावर होनेसे उस्का मुकाबला करना मुनासिब नहीं है.

[ शिवाजी, आपल्या धर्मावर व लोकांवर त्यानें फारच जुलूम मांडला आहे, ही गोष्ट खरी आहे. पण तो फार प्रबल आहे! तेव्हां त्याच्याशीं वैर करणें योग्य नाहीं. ]

**शिवाजी**–( त्वेषानें ) यहां सब् हिंदूही हैं, इस्लिये मैं खुले दिल्से कहता हूं के, चाहे वो उस्सेही अत्यंत प्रबल हो; लेकिन् डरके उस् मुगलकेताबेदारीमें रेहेनेसे अप्ने धरमका, लोगोंका और अप्ने देसका कभी न भला होगा. उस् नापाक मुगलके सक्त जुलमसे और अप्ने आपसके कुसंपसे दिनवदिन अप्ने कुल् देसकी कितनी बूरी हालत होती जाती है? अहा! बडा शोक है–के–अप्ना देस, अप्नी जन्मभूमि, अप्नी सत्ता–सब कुछ् अप्ना हि होके, आज हम् सभोंको परदेसीयोंकी ताबेदारी करनी पडती है! यह कितनी शरमकी बात है? क्या–हम् सबही नामर्द भयें? क्या–हमारा वीर्य नष्ट हो गया? क्या–हमारा धरमाभिमान बिल्कुल् लुप्त हो गया? क्या-हम् सबही शंढ बनें? क्या–शूर राजपूतोंने या भारथीय क्षत्रियोंने अप्ना क्षात्र-

धर्म, स्वातंत्र्य और राज्यसत्ता खोके, दुष्ट मुगलोंकी गुलामीही करना? धिक्कार–धिक्कार–अनंत धिक्कार हैं ऐसे क्षत्रियोंको! वेहत्तर, इस्से, स्वदेश, स्वधर्म और स्वातंत्र्य रक्षाकेलिये दुष्मनोंकेसाथ जंग मचामचाके ही मरजाना अच्छा हैं. हां; अगर कोईभी हिंदू सार्वभौम हो, तो मैं दिलोजानसे उस्के गुलामका गुलाम वनूंगा. लेकिन्! महाशोक है के, वह दिन कव आयेगा?

[ इथें आपण सर्व हिंदूच आहोंत, तेव्हां मी मोकळ्या मनानें सांगतों कीं,- आणखी तो वाहीपेक्षां अधिक प्रवल झाला म्हणून काय झालें. परंतु, भिऊन या मोंगलाच्या ताब्यांत राहिल्यानें आपल्या धर्माचें लोकांचें व आपल्या देशाचें कधींच चांगलें नाहीं व्हायचें. या नीच मोंगलांच्या सक्त जुलमानें व आपसांतील आपल्या कलह कुसंपानें दिवसेंदिवस आपल्या अवध्या देशाची किती नीच दशा होत चालली आहे? मोठ्या दुःखाची गोष्ट आहे कीं, आपला देश–आपली जन्मभूमि–आपली सत्ता–सर्व कांहीं आपलें असतां, आज आम्हां सर्वांना परक्यांची तावेदारी करावी लागत आहे। ही केवढ्या निर्लज्जपणाची गोष्ट आहे! काय–आपण नामर्द आहोंत? काय–आपलें वीर्य नष्ट झालें? काय–आपला धर्माभिमान अगदीं लुप्त झाला? काय–आम्ही वेडे व केवळ शंढ वनलों? शूर रजपूतांनीं किंवा क्षत्रियांनीं आपला क्षात्रधर्म, स्वातंत्र्य व राज्यसत्ता सोडून, दुष्ट मोंगलांची गुलामी करावी? धिक्कार–धिक्कार–अनंत धिक्कार असोत असल्या क्षात्रधर्माला!! चिंता नाहीं–यापेक्षां स्वदेश, स्वधर्म व स्वातंत्र्य राखण्यासाठीं–शत्रूंशीं लढून लढून मरणेंच उत्तम आहे. हां; अथवा जर कोणी आपला हिंदु सार्वभौम राजा आहे, तर मी माझ्या खुषीनें त्याच्या गुलामाचा गुलाम वनेन. पण–हाय हाय। तो दिवस कधीं येईल? ]

**जयसिंग**–( खोंचून व शिवाजीस कडकडीत भेटून ) प्यारे शेवाजी! अव ज़ियादा मत कहो. इस् वातसे मैंने तुह्मारा कुल् तुहे जानलिया. अवसे तुम् मेरे प्यारे भाई हो. श्री एकलिंग और श्रीकर्पुरगौरीकी गव्हाई लेके कहता हूं के, आजसे तुह्मारे कार्यको भीतरसे मेरा पूर्ण साहाय्य है. (असें ह्मणून आपला शेला शिवाजीस देतो व शिवाजीही आपला शेला त्यास देतो.) यही अप्ने दोस्तीकी निशानी.

[ प्रिय शिवाजी ! आतां नकाच अधिक बोलूं. या बोलण्यानें तुमचा सर्व हेतु मला समजला. आजपासून तुम्ही माझे सख्खे बंधु झालांत. श्रीएकलिंगाची व श्रीकर्पुरगौरीची आण वाहून सांगतों कीं, आजपासून तुमच्या कामाला आंतून माझी पूर्ण मदत आहे. हीच आपल्या मैत्रीची खूण. ]

**शिवाजी**–( सहर्ष ) मैंभी आजसे आपका तावेदार हूं. अब् मेरी आप्‌केपास ऐसी बिनती है के, पुरंदरपर आप्‌काही निशान चढवाना. उस् दलेलखांको अभीके अभी पीच्छे बुलाना. उस् मुसलमानको यश देना मुझे अच्छा नहीं लगता !

[ मीही आजपासून आपला अंकित आहें. आतां आपल्या जवळ माझी इतकीच विनंती आहे कीं, पुरंदरावर आपलें निशाण चढवावें. आतांच्या आतां त्या दलेलखानाला परत बोलवावें. त्या मुसलमानानें यशस्वी व्हावें हें मला चांगलें वाटत नाहीं। ]

**जयसिंग**–( खुष होऊन ) भाई शेवाजी, वो दलेलखां वडा फ़ेहमींदा है. हुजूरकी उसपे वहोत् मेहरवानी है. खैर. ( मिशांस पीळ देऊन ) कुछ् पर्वा नहीं. मेरे आदमीकेसाथ तुह्मारा वकील दो. वे जाके उस् किलेको अपने कवजेमें लेके, उस्‌पे अप्‌ना निशान लगाके खांको पीच्छे बुलायेंगे.

[ बंधु शिवाजी, तो दलेलखान् मोठा उन्मत्त आहे. शहाची त्याच्यावर कमाल मर्जी आहे. असो. कांहीं चिंता नाहीं. माझ्या माणसावरोवर तुमचा वकील द्या. ते जाऊन तो किल्ला आपल्या ताब्यांत घेतील व त्यावर आपलें निशाण रोवून खानाला परत बोलावितील. ]

**शिवाजी**–अच्छा, वहोत् खूषीसे–लेजायीये हमारे वकीलको.

[ ठीक; फार खुषीनें–घेऊन जावें आमच्या वकिलाला. ]

**जयसिंग**–भवानसिंग, तुम साथ सो राजपूत और शेवाजीके वकीलको लेके, पुरंदरपर जाओ; और वो किला अप्‌ने कवजेमें लेके, दलेलखांको कहोके, शेवाजी राजे सलाकरनेकेलिये अप्‌नेपास आये हैं; इस्‌लिये लढाई बंद कर पीच्छे फिरो.

[ भवानसिंग, तुम्ही बरोबर शंभर रजपूत स्वार व शिवाजींचा वकील घेऊन पुरंदरास जा, व तो किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन दलेलखानास म्हणावें कीं, शिवाजी राजे सल्ला करण्यासाठीं आपल्याकडे आले आहेत; म्हणून लढाई बंद करून मागें यावें. ]

**भवानसिंग**–जी हां. जैसा हुजूरका हुक्म. ( वकीलासह जातो. )
[ जी होय. जसा महाराजांचा हुकूम. ]

**जयसिंग**–भाई शेवाजी, देखो, अब् तुम यूं करो. कुल् गडकोट बादशाहाके तावेमें हैं वैसा कबूल करके, उन्के मुलाकातकेवास्ते तुम् देहलीको चलो.

[ बंधु शिवाजी, पहा, आतां तुम्ही असें करा; सगळे गडकोट बादशाहाचे अमलांत आहेत असें कबूल करून, त्यांच्या भेटीला तुम्ही दिल्लीस जा. ]

**शिवाजी**–( अमळ विचार करून ) सब् गडकोट तो मैं नहीं दे सक्ता! लेकिन्, हमारे सताईस गडकोट आप्के कब्जेमें देता हूं! और इस् दक्खनकी अदलशाही और कुतबशाही फतःकरके उन्पै औरंगजेब बादशाहाका कुल् इखत्यार बिठवाता हूं. देहलीको जानेकेलिये आप् कहते हो–लेकिन् इस् बातको मेरा दिल् कचकता है! क्यौं की वो औरंगजेब बादशाह है! और आप् उस्को मेरेसेभी जियादे पहेचानते हो. उस्के पास जाना–मगरोके मूहमें जानेके मुआफिक है!

[ सगळे गडकोट मला नाहीं देतां येत! पण सत्तावीस गडकोट आपल्या ताब्यांत देतों! आणखी, या दक्षिणेंतील अदिलशाही व कुतुबशाही जिंकून, त्यांवर औरंगजेब बादशाहाचा पूर्ण अधिकार बसवितों. दिल्लीस जायाचें म्हणून आपण म्हणतां–पण, या गोष्टीला माझें मन कच खातें! कारण, तो औरंजेब बादशाहा आहे! आपण त्याला मजहून अधिक जाणत आहां. त्याच्याजवळ जाणें–मगराच्या जबड्यांत जाण्यासारखें आहे! ]

**जयसिंग**–तोभी तुमको किसी तऱ्हासे तकलीफ न होगी. इस्की पहिलेसेही मैं तजवीज कर रक्खूंगा. मेरा रामसिंग हुजूरकेपास है. इस्को कोशिशखत लिखके सूचित करता हूं. वो कुल् बंदोबस्त और तुह्मारी अच्छी तऱ्हासे रक्षा करेगा. डरनेका कुछ् काम नहीं. और तु-

ह्मारेलिये वादशाहाके दिल्में शक् न रहे ऐसा खत लिखके, अभी भेजता हूं, और उन्का अभयपत्र मंगवाता हूं.

[ तरी पण तुम्हाला कोणत्याच गोष्टीची तसदी पडणार नाहीं, असा मी पूर्वींच बंदोबस्त करवितों. बादशाहापाशीं माझा रामसिंग आहेच. त्याला पत्र पाठवितों व सर्व सुचवून ठेवितों. तो सर्व तुमचा बंदोवस्त ठेवील व तुमचें चौकसपणें रक्षणही करील. भिण्याचें मुळींच काम नाहीं. शिवाय तुमच्याविशीं बादशहाच्या मनांत कपट न राहील असें पत्र पाठवून त्याचें अभयपत्र मागवितों. ]

**शिवाजी**–अच्छा. आप् और रामसिंग जिम्मेदार होते हैं, तो मैं वहां जानेको तय्यार हूं. मगर, वहां जानेके अव्वल ऐसा करना मुनासिब है के, विजापूरवालोंपे चढाई करकर, उन्का सब् मुल्क तावेमें लेना. कुल् फौज लेके साथ मैंभी आप्को साहाय्य करूं गा.

[ ठीक. आपण व रामसिंग जिम्मेदार होतां, तर मी तिथें जाण्याला तय्यार आहें. पण, तिथें जाण्यापूर्वीं हें करणें अधिक अगत्याचें आहे कीं, विजापूरकरांवर स्वारी करून, त्यांचा सगळा मुलूख जिंकावा. मी सुद्धां आपली सगळी फौज घेऊन आपल्याला साह्य करीन. ]

**जयसिंग**–वेषक्, इस्से वादशाह तुह्मारेपर वहोत् राजी होंगे. दलेलखां आनेबाद कुल् फौजलेके विजापूरके तरफ जाना होगा. तुमभी आना.

[ निःसंशय, यानें बादशाहा तुम्हावर फारच प्रसन्न होतील. दलेलखान् आल्यावर सगळ्या सैन्यानिशीं जरूर विजापूरावर स्वारी करायची. तुम्ही पण या. ]

**शिवाजी**–क्यौं नहीं ? बहोत् खूषीसे आयेंगे.

[ कां नाहीं ? मोठ्या आनंदानें येईन. ]

**जयसिंग**–भाई शेवाजी, विजापूर सर कियेवाद, यहांका कुल् वंदोवस्त करके, देहलीको जानेकी सब् तय्यारी करो. "विजापूर सर करके जल्द शेवाजी हुजूरके मुलाकातकेलिये भेज देता हूं" वैसा लिखके उन्का अभयपत्र मंगवाते हैं.

[ बंधु शिवाजी, विजापूर घेतल्यावर येथील सर्व बंदोबस्त करून, दिल्लीस जायाची सर्व तय्यारी करा. "विजापूर घेतल्यावर लवकरच शिवाजी आपल्या भेटीस धाडून देतों" असें लिहून बादशाहाचें अभयपत्र आणवितों. ]

**शिवाजी**–बेफिकीर मंगवाना. अब् मैं रुकसत होता हूं. ( उठतो. )
[ निःसंशय मागवावें. आतां मी निरोप घेतों. ]

**जयसिंग**–( भेटून ) अच्छा, आईये.
[ ठीक, यावें. ]

( जातात. )

## तिसरा अंक समाप्त.

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

### स्थल–रायगड. मुत्सद्दी बसायची जागा.

**मोरोपंत**–चिटणीस, आपले सत्तावीस गड मोंगलांच्या ताब्यांत गेले; हें अमळ नामर्दपणाचें काम झालें!

**बाळाजी**–सगळ्याच गोष्टी कशा साधतात? तरी पण, चौथाई व सरदेशमुखी, हे दोन हक्क आपल्याला अगदीं कायमचे मिळाले. पुनः, 'कांट्यानें कांटा काढावा,' तसा मोंगलाच्या साह्यानें अगदीं जवळचा शत्रु जो विजापूरकर, त्याची मात्र पुरी खोड मोडली. आतां तो आपली मान कशाला करतो वर?

**मोरोपंत**–हें मात्र छान झालें. असो; आलेला भयंकर प्रसंग कोणीकडून एकदाचा सामोपचारानें पार पडला, हें सोन्याहून पिवळें झालें. पण, महाराजांचा शेवटीं दिल्लीस जाण्याचा बेत नक्की झाला, हें मात्र वावगें झालें!

**बाळाजी**–वावगें तर खरेंच. पण महाराजांचा बेत कोणी फिरवावा?

**मोरोपंत**–भीष्मप्रतिज्ञाच ती; ती कश्शी फिरते. पण काय हो चिटणीस, जयसिंगाच्या शिफारशीवरून, त्या औरंगजेबानें जीं अभयपत्रें पाठविलीं आहेत; त्यांप्रमाणें तो कपटी, आपल्या महाराजांशीं दोस्तीनें वागेल का शेवटपर्यंत?

**बाळाजी**–पंत, खरें पुसाल तर मी त्याच विचारांत आहें! औ-

रंगजेबाचें अभयवचन ह्मणजे निव्वळ वाळूची भिंत–किंवा आळवावरील पाणी. महाराज मोठे धूर्त, पुरे चौकस व खरे राजकारणी असतां, ह्या मोहांत कसे पडले ? असो ! श्रीअंबाबाईच आतां यांतून पार पाडो ह्मणजे झालें.

**मोरोपंत**–तिच्यावरच आतां आपला सर्वांचा भरिभार आहे. चिटणीस, तुह्मी, तान्हाजी, हिरोजी, येसाजी, चिमणाजी, निराजी वगैरे जिव्हाळ्याचीं माणसें महाराजांबरोबर जाणार. पण, मी मात्र पुरा कम नशीब !

**बाळाजी**–सगळींच कर्तीं व जिवाचीं माणसें तिथें गेलीं, तर मग इकडचा कारभार कोणीं पहावा ? महाराज तरी कुठें तिथें फार दिवस रहाणार आहेत ? बादशहाची भेट घेऊन लौकरच परत येणार.

**मोरोपंत**–त्या मगरमिठींतून महाराज मोकळे होतील तेव्हां.

**हुजऱ्या**–( प्रवेश करून अदबीनें ) आपनासनी महाराज बलावत्याती.

**मो॰ व बा॰**–चल, हे आलोंच. ( जातात. )

---

## प्रवेश २ रा.

### स्थल–रायगड–राजमहाल.

**सईबाई.** ( चिंतेंत बसलेली पाहून. )

**लक्ष्मी**–बाईसाव, इळभर इचार ककरून, जिवाला मातुर दुकामंदीं घालायच. अंबाबाईच्या किरपेन आपल्यासनी कंचबी सुख, कमी का हाये ? संमदीं सुक अक्शी पायांप लोळत्याती. चाकुर, वटीक, चिरकुटकामरुन, दागदागीन, धनदोलत, अन् मानपान, यामंदीं–इवलस

दिखील कमी न्हाई बगा! अक्शी पाटाच ताटावर अन् ताटाच पाटावर जव्वा वगाव तव्वा व्हतया. अन् रामाची पिरती जशी सिताबाई-वर–हिंग तश्शीच ह्माराजांची पिरती आपनावर हाये.

**सईबाई**–लक्षे, तें सगळें खरें. पण–

॥ पद ॥ ( चाल–जाऊं नको रे विषयाटविंची" )

काय असुनी हें वैभव? नाहींच लवभर सुख शांति ॥
भीति, चिंता व्याधिपरि हीं अति दुस्सह असती ॥ ध्रु० ॥
अग्निज्वाला दुरुनी जैशा बहु सुंदर दिसती ॥
परि जाउनि त्यां स्पर्श करितां दग्ध तनुस करिती ॥
तैशीं दुरुनी राज्य-सुखें हीं सुखकरशीं गमती ॥
परिचय त्यांचा घडतां वाटे आहे ती भ्रांती ॥ १ ॥

**लक्ष्मी**–हं–आल ध्येनांत. ह्माराज उंद्या दिल्लीसनी जायच हायती, ह्मंगुन आपल मन इक्त माशावानी इवळतया. तेबी खर हाये. ह्मा-राजांवर आपली पिरतीच तशी हाये.

**सईबाई**–लक्षे! तिकडे जायचें ऐकल्यापासून किनई बाई–

॥ पद ॥ ('द्रिगलोचन' ही चाल.)

न पडे चैन मुळीं मजला। चिंताव्याल हा हृदया डसला! गडे चै.॥ध्रु॥
विरहवेदना भिडुनी शरीरीं। विव्हल करिल ही काया सारी ॥
सोसवतिल ते वेग कसे तरी। शमविल कोण ह्मा तीव्र विषाला॥ चैन.

**लक्ष्मी**–खरी पिरती असतीया, तत हिंग अस्सच व्हतया. पुन बाईसाव, अस दुक करुनशी का व्हतया? आपुन लईबी दुक केल, म्हून ह्माराज जायच न्हानार हायती हुई? त्येंचा व्योत न्हाईच कंदी फिरायचा. (इतक्यांत महाराज येतात, त्यांस पाहून) अग-बया! बाईसाव–बाईसाव–( डोळ्यानें खुणावून ) ह्माराज आल!

**शिवाजी**–( सईबाईकडे पाहून मनाशीं ) अहो! आमचा दिल्लीस जाण्याचा विचार इकडे समजलाच एकून. (उघड–) लक्ष्मे,

**लक्ष्मी**–( अदबीनें पुढें येऊन ) जी.

**शिवाजी**–तुझी धनीन आज अशी कां ग?

**लक्ष्मी**–त्ये ह्याराजांनींच पुसाव.

**शिवाजी**–ठीक, तूं जाऊन तिथें उभी रहा आणि राबता वंद ठेव.

**लक्ष्मी**–जी. ( जाते. )

**शिवाजी**–( सईबाईजवळ येऊन ) हें काय? आज चंद्रग्रहण मध्येंच कोठून आलें! तवीयत नाहींना आपली विघडली आज?

**सईबाई** (दुःखाचा उसासा टाकते व डोळे आंसवांनीं भरून येतात.)

**शिवाजी**–( ते शेल्यानें पुसून मोठ्या कळवळ्यानें ) हा दुःखवेग आणखी कुठवर दाबून धरायचा? पहा! शेवटीं तो अनावर होऊन, ह्या सुंदर विशाल नेत्रद्वारांनीं वाहूं लागला! तुझे हे दुःखाश्रु–तापलेल्या तेलासारखे माझें मन पोळीत आहेत! कोणतेही सुख तुला कमी नाहीं. मग तूं अशी कां? ( तिच्या हनवटीस हात लावून ) सांग तरी तुला काय होत आहे तें?

**सईबाई**–( मिठी मारून ) दुसरें तिसरें कांहीं नाहीं! पण–

॥ **पद** ॥ ('कंथविन' ही चाल.)

**कशी क्रमूं दिनरात। तुझ्याविण कशी०। पडलें ह्या घोरांत ॥ ध्रु० ॥**
**वसे जलीं कमल परी। विकसवि सूर्यचि त्यास।**
**तेवि आपुला सहवासची। साधन सकल सुखास। तुझ्या० ॥ १ ॥**

**शिवाजी**–ह्या जीवांत जीव आहे तोंपर्यंत आपला वियोगच नाहीं व्हायचा. सूर्य आकाशांत किती उंच आहे? पण, तो कमलाला विसरला आहे का कधीं?

**सईबाई**–खरें; पण–

**शिवाजी**–तर मग तूं हें आज काय आरंभिलें आहेस? आईसाहेबांची आज्ञा आणि आशीर्वाद घेऊन, मोठ्या उमेदीनें मी तुझ्या भेटीला आलों. पण–इथें पहातों तर सगळेंच उलट! (पुनः तिच्या हनुवटीस हात लावून) अग! लोक तुला 'वीरपत्नी' म्हणतात; आणि तूं तर आज हा असा भित्रेपणा दाखवीत आहेस! वीरांगना आणि भय–हीं एकत्र रहातील तरी कशीं?

**सईबाई**–इतकी भित्री असतें, तर घरावाहेर पाऊल तरी पडूं देतें का? जिथें तिथें थोड्या नाहींत झाल्या स्वाऱ्या. पण मी आड आलें होतें का कधीं त्यांच्या? पण गडे, आजची स्वारी–जीवावरची होत आहे, म्हणून वाई मनाला इतकी धास्ती! पुरे झालें हें आतां इतकें राज्य; आणखी तें किती तरी वाढवायचें? मेला व्याप तितका संताप; म्हणून पायापाशीं माझी आतां इतकीच विनंति आहे कीं–(मिठी मारून)

॥ **पद** ॥ ("इस् आतशके उल्फत्‌में" ही चाल.)

**ऐका इतुकें प्राणनाथा। नका जाऊं दिल्लीसी। हो न०॥**
**असे दुष्ट, कपटी, तो। औरंगजेब साहसी॥ ध्रु०॥**
**व्याघ्रमुखीं घालितां कां! हात बळें जाउनी॥**
**नका लोटूं दुःखडोहीं! आपुल्या दीन दासिसी॥ हो आ०॥ ४॥**

**शिवाजी**–हें तूं काय म्हणतेस? तुला त्या औरंगजेबाचें इतकें भय? खरोखर–वीरांगनांना–वीरपत्नींना हें शोभत नाहीं. संयुक्ता, कर्मदेवी, पद्मिनी, ताराबाई, वीरा, दुर्गावती, कमलावती, व कर्णवती वगैरे वीररमणींचा महिमा जो ह्या जगांत अखंड राहिला आहे, तो असल्या भ्याड स्वभावानें राहिला असता काय?

वीररसानें ओतप्रोत भरलेल्या ज्या त्यांच्या कथा तूं ऐकल्यास, त्याचा शेवटीं हाच का परिणाम? स्वदेश हा प्रत्येक वीरांगनेचा आवडता भव्य वाडा नाहीं काय? त्यांत परक्यांनीं येऊन, हवा तसा जुलूम करावा व तो तिनें निमूटपणें सोसावा काय? जर तूं वीरांगनाच आहेस, तर अशा जुलमी शत्रूचा नाश करण्यासाठीं तुझें मन, चौताळलेल्या विक्राळ सिंहिणीसारखें रात्रंदिवस कसें—अगदीं खवळून राहिलें पाहिजे! 'पुरे झालें हें आतां इतकें राज्य' हे उद्गार तुझ्या मुखांतून? तूं इतकी परदुःखशीतल आहेस, असें तर माझ्या स्वप्नांतही येत नाहीं. अहाहा!! धन्य ती वीरपत्नी कीं, जी 'शत्रूचा पराभव करा' ह्मणून आपल्या नवऱ्याला नेहमी सांगणारी! धन्य ती वीररमणी कीं, जी लढाईस जाणाऱ्या आपल्या पतीला पंचारती करून, मोठ्या उत्साहानें त्याच्या गळ्यांत विजयमाला घालणारी! शाबास ती वीरयुवती कीं, जी शत्रूचा पराभव करून, त्याच्या रक्तानें भिजलेला आपल्या पतीचा लालभडक पोषाख व विजयश्रीनें टवटवीत दिसणारें मुखकमल पाहून, त्याला प्रेमालिंगन देणारी! आणि धन्य धन्य ती वीरांगना कीं, जी रणोत्साहमंडित अशा आपल्या पतीला उत्तेजन देणारी!! प्रिये! ती वृत्ति, तो उत्साह, ती वीरश्री, तें धैर्य, ती शक्ति व ती ईर्षा—ह्यांचा कसा तुझ्याशीं अगदीं एकजीव झाला आहे असें मी समजलों होतों. पण, आज तुझी ही भ्याड मुद्रा पाहून व तुझे हे संकुचित विचार ऐकून, पाण्यांत पडलेल्या ढेंकळासारखी माझ्या मनाची अवस्था झाली आहे! तूं उदासीन? काय हें? प्रिये! तूं या वेळीं मोठ्या उत्साहानें माझ्या कपाळीं मंगलतिलक लावून, विजयमाळा माझ्या गळ्यांत घालशील व प्रेमानें मंगल आरती करून 'विजयोस्तु' ह्मणून भवानीचा (तलवारीकडे पाहून) जयजयकार करशील, तर औरंगजेबासारखे शेंकडों

अविंध जरी चालून आले, तरी हं हं ह्मणतां मी त्यांना—अगदीं जमीनदोस्त करून टाकीन.

**सईबाई**—( खोंचून ) झालेला निश्चय नाहींच कधीं फिरायचा. मला हें आधींच ठाऊक होतें.

**शिवाजी**—तर मग इतके आढेवेढे कां वरें घेतलेस? खरें बुवा! स्त्री हें एक जबरदस्त मोहनास्त्रच आहे! एक शुकदेवच त्यांतून पार पडला.

**सईबाई**—आणि आपण तरी कुठें त्यांत सांपडतां? असो पण; पुरे आतां हा विनोद. आणखी शंभूला बरोबर न्यायचें ह्मणून ऐकतें?

**शिवाजी**—होय. वरें मग तुझा काय विचार आहे?

**सईबाई**—मी नको ह्मटलें ह्मणून माझें कोण ऐकतें?

**शिवाजी**—तर मग तुझ्या मनांत त्याला घरकोंबडा बनवायचा आहे वाटतें? आतांपासूनच जर त्याला हळू हळू राजकीय गोष्टी शिकवीत गेलें, तरच तो पुढें राजकार्यधुरंधर होईल.

**सईबाई**—आठवें वर्ष संपून नुक्तेंच कुठें नव्वें लागलें आहे. तितक्यांत त्याला राज्यकारभाराच्या गोष्टी शिकवायच्या? काय बाई तरी या खटपटीला ह्मणावें?

**शिवाजी**—वाहवा! आतां मात्र तूं खरी वीरमाता! लव, कुश, अभिमन्यु, बभ्रुवाहन, वृषकेतु—हे सर्व मोठे का होते? खातांपितां, निजतांउठतां, नाचतांबागडतां, वीररसानें भरलेल्या लहान लहान कथा सांगून, आपल्या मुलाचें मन स्वाभिमानी व रणोत्साही करणें, हें वीरमातेचें कर्तव्य नाहीं काय? बघ! वाघीण देखील आपल्या पिलाला लहानपणापासून आपला धंदा शिकवीत असते; आणि तूं तर प्रत्यक्ष वीरांगना आहेस. ( इतक्यांत संभाजी येतो त्यास पाहून ) अग! तो

बघ शंभु आला. बेटा मोठ्या ऐटीनें चालत आहे! आणि बघीतलीस का ती चिमणी तलवार त्याच्या हातांत कशी चमकत आहे ती?

**शंभु**–(ऐटीनें आईस) आई! ही बघ माझी तलवार! कशी चक्क आहे? ढाल! बघ ही किती छान आहे? आपला हिरोजी, हीं मला रोज फिरवायला शिकवितो. आणखी, बाबांनीं मला एक फक्कड घोडा पण दिला आहे! त्यावर किनई आई, मला बसतां येतें. आज तर मी त्यावर स्वार झालों होतों, स्वार! हातांत लगाम न धरतां मी त्याला–भरधांव फेंकीत होतों! पण आई, तूं कुठें तो बघीतला आहेस?

**सईबाई**–(कुरवाळून घाम पुसून मुका घेते.) माझें बाळ तें. माझ्या तान्हुल्या! नको असा घोडा भरधांव फेंकीत जाऊं. हातपाय मोडून घेशील एखादा.

**शंभु**–आणि आईग! बघितलीस ही माझी बंदूक! बाबांनीं ही मला आजच दिली. मला किनई आई, ही फार आवडते! केवढ्यानें हिचा आवाज होतो पण? उद्यांपासून हिरोजी, मला निशाण मारायला शिकविणार आहे.

**सईबाई**–(परत मुका घेऊन) शिक माझ्या चिमण्या; पण संभाळ बरीक.

**शिवाजी**–पुढें कसा निघेल तो निघो. सध्यांची गुलामाची बालक्रीडा तर मोहक आहे! कायरे शंभू, येतोस का दिल्लीला?

**शंभु**–हो तर–आपल्या हिरोजीनें मला मघांच सांगितलें आहे.

**शिवाजी**–पण, तुझी आई कुठें तुला धाडते?

**शंभु**–(आईच्या हनुवटीस हात लावून लाडकपणानें) खरेंच काग आई?

**सईबाई**–मी नको ह्मणून का तूं रहाणार आहेस?

श्री अंबाईचें दर्शन.



**शिवाजी**–असो तें. पण आतां तुला इतकेंच सांगतों कीं, मी दिल्लीहून परत येईपर्यंत तूं ह्या राज्याकडे नीट पहात जा. मोरोबा, अण्णाजी सुरनीस, निळो सोनदेव वगैरे तुझ्या हुकमाबाहेर जाणार नाहींत. एकमतानें येथील सर्व व्यवस्था ठेवा ह्मणजे झालें. राजारामावरही नीट नजर असूं दे.

**सईबाई**–( डोळे आंसवांनीं भरतात ) इकडची नको इतकी काळजी. पण, तिथें बरीक फार सावधपणानें वागावें. ( दासीस ) लक्षे,

**लक्ष्मी**–( येऊन ) जी.

**सईबाई**–तेवढं तें पंचारतीचें साहित्य घेऊन ये बरें इथें.

**लक्ष्मी**–जी. ( जाते. )

**शिवाजी**–( सद्गदित ) वाहवा ! प्रियेनें तर आज मोठीच तयारी केली आहे ! आतां मात्र तूं खरोखर वीरांगना आहेस !

**लक्ष्मी** ( पंचारतीचें साहित्य घेऊन येते. )

**सईबाई**–( प्रथम श्रीअंबाबाईची पूजा करून, )

॥ **पद** ॥ ("भला जन्म हा" ही चाल.)

प्रणतवत्सले दीनदयाळे अंबे श्रीविजयिनी ।
भवानी भक्तदुरितनाशिनी ॥ ध्रु० ॥
यवनमहिप औरंगजेब तो छळितो नानापरी ।
दयेचा लेश नसे अंतरीं ॥
केली पीडित भरतभूमि ही दीन धेनूपरी ।
करावें मुक्त हिला झडकरी ॥
शक्तिरूपें प्रगटुनि माते भक्तहृदयमंदिरीं ।
बनवि त्या भीषण नरकेसरी ॥

प्रबल शत्रुशीं युद्ध करितां करि विजयी संगरीं ।
ठेवी वरदहस्त तच्छिरीं ॥
तन-मन-धनें लावी सकलां स्वदेशजनरक्षणीं ।
सोडवी परवशतेपासुनी ॥ प्र० ॥

( नंतर शिवाजी महाराजांस पंचारती करिते. )

आंतून— ॥ श्लोक ॥

भासो भीषण शत्रुसी तिलक हा त्या शंभुनेत्रापरी ॥
माला ही न कराल व्यालिच असें मानोत चित्तीं अरी ॥
होवो हीहि खळांस घातक जशी ती श्रीभवानी मखीं ॥
जावो शत्रुचमू जळून सगळी ह्या कापुरासारखी ॥

**शिवाजी**—( ऐकून ) श्रीअंबाबाई हें भविष्य सत्य करो.

( सर्व जातात. )

## चौथा अंक समाप्त.

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

### स्थल–दिल्ली, शिवपुरा–एक वाडा.

**बाळाजी**–(आपल्याशीं) अहाहा! या भव्य, विस्तीर्ण व सुंदर दिल्ली शहराचें वर्णनच करतां येत नाहीं! प्रतिइंद्रपुरीच! छपन्न देशांची संपत्ति, सत्ता व ऐश्वर्य हीं एकवटून, या आलमगीर बादशाहाची जणूं सेवाच करीत आहेत! तें रमणीय पवित्र यमुनातीर; ते सुंदर बागबगीचे; गगनचुंबित घुमटांच्या त्या नकशीदार भव्य मसिदी; ते विस्तीर्ण व सुरेख राजवाडे; अठरा कारखाने; पुरे वगैरे जागा पाहून तर मी अगदीं थक्क झालों! मोंगलाच्या ऐश्वर्याची कमाल झाली बोवा!!

**निराजी**–(प्रवेश करून) कां चिटणीस, इतका वेळ कुठें गेलां होतां? (स्मरण झाल्यासारखें करून) हं, समजलों. तुह्मी तर बोवा खूपच मनावर घेतलें आहे. दिल्ली शहराची छडान्‌छडा माहिती मिळवितां वाटतें.

**बाळाजी**–तसें केवळ नाहीं; पहा निराजी, रिकामें बसून तरी काय करायचें आहे? गनिमाच्या अशा सुंदर शहराची टुमदार रचना, त्यांच्या रीतिभाती, त्यांचा व्यवहार, त्यांचा स्वभाव, त्यांची राज्यनीति व त्यांचा मुत्सद्दीपणा वगैरेची माहिती, मिळेल तितकी मिळवावी इतकेंच. बरें पण, काय हो निराजी, दरबारचा काय बेत ठरला?

**निराजी**–आज संध्याकाळीं दरबाराला जायाचें.

**बाळाजी**–काय ह्मणतां? ठीक झालें. मोंगलाईंत फार दिवस कुचंबत रहाण्याचा प्रसंग टळला एकून.

**निराजी**–आपले महाराज कसले धोरणी ? त्या रामसिंगाशीं जीवश्चकंठश्च दोस्ती करून, परभारें त्याच्याच मार्फत हा आजचा दरबारचा बेत त्यांनीं नक्की करविला.

**बाळाजी**–बरें पण, काय हो निराजी, कोण कोण मंडळी महाराजांबरोबर दरबाराला जायाची ?

**निराजी**–तें पण नक्की झालें आहे. खुद्द महाराज, धाकटे महाराज, मी, तुह्मी, त्रिंबकजी, प्रतापराव, दत्ताजी, राघोजी, हिरोजी, नरहरपंत, दावजीदादा व जीवनराव, अशीं शेलकीं शेलकीं माणसें, खूप थाटाचा दरबारी पोषाक करून व हत्यारबंद होऊन जायाचीं. शिवाय खुद्द महाराजांची हुजूर पागा पण अगदीं कंबरबस्त होऊन महाराजांबरोबर येईल.

**बाळाजी**–मला वाटतें, बाकीची फौज पण गुप्तपणें तयार करून ठेवावी.

**निराजी**–तें देखील नक्की ठरलें आहे.

**बाळाजी**–ठीक. चला तर मग, महाराजांची भेट घेऊन ते सांगतील तसे आपण तयार होऊन राहूं. (जातात.)

---

## प्रवेश २ रा.

### स्थल–दिल्ली–दरबार.

(संकेताप्रमाणें सर्व आपापल्या जागीं बसले असतां औरंगजेब बादशाहा येतो. सर्व उभे रहातात.)

**औरंगजेब** (तक्तावर बसतो. दर्जाप्रमाणें सर्व पाळीपाळीनें मुजरे करतात.)

मराठी ग्रंथ संग्रहालय.
ठाणे.

दिल्लीदरबार.



**शिवाजी** (मनांत) मोंगलाला मुजरा करण्याचा हाच पहिला प्रसंग ! काय करावें ? (मोठ्या नाखुषीनें मुजरा करून ऐटीनें आपल्या जागेवर वसतो.)

**औरंगजेब**–(वेअदव केलेली जाणून) रामसिंग, यह वोहि शेवाजी राजा ?

[रामसिंग, हाच तो शिवाजी राजा ?]

**रामसिंग**–(लवून) जी हां, हुजूर, वोही.

[जी होय, महाराज, तोच.]

**औरंगजेब**–(मिशांस पीळ देऊन व किंचित् हंसून) वहोत् अच्छा. क्यौं ? शेवाजी, कैसी खवर है ?

[फार चांगलें. कां ? शिवाजी, कशी खवर आहे ?]

**शिवाजी**–(न उठतां) अच्छी है. [**चांगली आहे.**]

**शिवाजी**–(हळूच रामसिंगास) मेरेसे ऊपरके दर्जेपर यह कौन सरदार वैठा है ?

[माझ्या वरच्या अंगास हा कोण सरदार वसला आहे ?]

**रामसिंग**–(हळूच) महाराज जसवंतसिंग.

**शिवाजी**–(संतापून मनांत) केवढा हा अपमान ? काय करूं ? खंजीर खुपसून या गुलामाला तक्तावरच ठार केला असता. (मिशांस पीळ देतो व रामसिंगाच्या हळूच कानाशीं लागतो.)

**रामसिंग**–(हळूच) ठेरिये. यह मौका नहीं है.

[थांवा. ही वेळ नाहीं.]

**औरंगजेब**–(ही शिवाजीची चळवळ पाहून) निहायत् खुषीकी वात् है के, आज हमारा दक्खन्‌का सूवा, हमारे हज़ूरमें हजीर है. यह वोही शेवाजीराजा, जो हिंदुमज़हब्‌का वड़ा फख़र रख़ता है. (असें ह्मणून दाढीवर हात फिरवितो.)

[ मोठ्या आनंदाची गोष्ट आहे कीं, आज आमचा दक्षिणचा सुभेदार आपल्या दरवा-रांत हजर आहे. जो हिंदुधर्माचा मोठा अभिमान बाळगीत आहे, तोच हा शिवाजी राजा.]

**जाफरखां**-लेकिन्, यह तो नामकाही राजा है.

[ पण, हा केवळ नांवाचाच राजा आहे.]

**शिवाजी**-( खोंचून न उठतां ) हुजूरका और आप्का फर्माना बिलकुल् मुनासिब् है. जो षक्स जिस् मज़हब्में पैदा होता है, उस्से अप्ने मज़हब्का जरूर फख़र होता है. और फरेबी या जबरदस्तीसे शाहा या राजा बन्नेसे सचाईका राजा होनाही ठीक है. और काबिलोंका कौलभी वैसा है.

[ महाराजांचें व आपलें बोलणें अगदीं रास्त आहे. जो माणूस ज्या धर्मांत पैदा होतो, त्याला स्वधर्माचा अभिमान साहजिकच असतो. आणखी दग्यानें किंवा जुलमानें महाराजा किंवा राजा होण्यापेक्षां, सत्यानें राजा होणेंच ठीक आहे; व शहाण्यांचें मुद्दां हेंच म्हणणें आहे.]

**औरंगजेब**-(खोंचून) रामसिंग, अब् तुम् शेवाजीको ले जाओ. कल, या फुरसत्के वक्त इन्को लाना. खूब अदब्केसाथ इन्का बहोत् अच्छी तऱ्हासे बंदोबस्त रखना.

[ रामसिंग, आतां तुम्ही शिवाजीला घेऊन जा. उद्यां किंवा फुरसुतीअंतीं यांना घेऊन या. सन्मानपूर्वक यांचा उत्तम बंदोबस्त ठेवा.]

**रामसिंग**-जैसा हुजूरका हुक्म. **[जशी महाराजांचीं आज्ञा.]**

**शिवाजी**-मेरीभी तबियत आज नादुरुस्त है. ( मुजरा न करतां आपल्या मंडळीसह जातो. )

[ माझीही प्रकृति आज अस्वस्थ आहे.]

**औरंगजेब**-( मिशांस पीळ देऊन ) वजीर, **[ प्रधानजी. ]**

**जाफरखां**-किब्ले आलम.

[ विश्वपती. ]

## अंक ५ वा.

**औरं०**–शेवाजी कुछ् यूं त्यूं नहीं है ! वो बडा शैतान है ! दरवारमें आया तब्सेही हमारी उम् शैतानकेतरफ निगाः थी; और उम्ने जो अब् गुफत्गू किई, इस्से तुम् क्या समझे !

[ शिवाजी कांहीं असातसा नाहीं ! तो मोठें सैतान आहे ! दरवारांत आल्यापासून माझी त्या भुतावर नजर होती; व आतां त्यानें जें भापण केलें, त्यावरून तुम्ही काय समजलांत ? ]

**जाफर०**–गरीव परवर, वेषक्, वो वडा फित्नापरदाज है !

[ दीनरक्षक, खरोखर, तो मोठा दगेखोर आहे ! ]

**औरं०**–अच्छा; वजीर, अव् तुम् यूं करो; पौलादखां कोतवालको हुक्म दो के, चारोतरफसे उस्पर सक्त निगाःवानी रक्खो. देखो ! वो वडा दगावाज है ! इहांसे कब् गुम् हो जावेगा उस्का विलकुल् इतवार नहीं. अब् उस्से विलकुल् छोडना न चाहिये. कुल् दक्खन् हमारे कब्जेमें आनेको अब् वक्त न लगेगा; और हमारे मजहवे इस्लाम् खूव तरक्की वर्पा होगा ! ( दाढीवर हात फिरवून ) जो हुआ सो दुरुस्त हुआ !

[ ठीक; प्रधानजी, आतां तुम्ही असें करा; कोतवाल पौलादखांस आज्ञा करा कीं, त्यावर तुम्ही खडा पहारा ठेवा. पहा ! तो मोठा दगलवाज आहे ! येथून केव्हां फरारी होईल त्याचा अगदीं नियम नाहीं. आतां त्याला वंदींतच ठेवायचें. सगळा दक्षिण देश आपल्या ताब्यांत यायाला आतां नाहींच उशीर लागायचा. आणखी आपल्या मुसलमानी धर्माची आतां खूप उन्नति होईल ! जें झाले, तें ठीक झालें ! ]

**जाफ०**–हुजूरके फर्माने वमुजब् इन्तजाम् करता हूं. अब् उस्की क्या ताकत है के, पौलादखांके सक्त पेहेरेमेंसे वो भागे ?

[ महाराजांच्या आज्ञेप्रमाणेंच व्यवस्था करतों. आतां त्यांची काय शक्ति आहे कीं, पौलादखानाच्या खड्या पहाऱ्यांतून तो फरारी होईल ? ]

**छडीदार**–रोषननिगार, दरवार वरखास्त.

[ दरवार वरखास्त. ]

---

# प्रवेश ३ रा.

## स्थल–दिल्ली. शिवपुरा–महाराजांचा वाडा.

**शिवाजी**–( संतापलेला ) माझी त्या पांचहजारी सरदारांत गणना ऑं ? आणखी अपमान तो कसा करायचा ? त्याच वेळीं माझ्या सगळ्या आंगाचा कसा–अगदीं भडका होऊन गेला होता. रामसिंगानें जर तितकें आवरून धरलें नसतें, तर इतका आवेश आला होता कीं, गुलामाला तक्तावरच ठार केला असता. जर मी इतका यःकश्चित् आहें, तर मग दरबारांत व शहरभर इतका सक्त बंदोबस्त ठेवायचा नव्हता. बाळाजी, तुह्माला काय सांगूं ? तिकडून आल्यापासून माझें मन, वादळानें खवळणाऱ्या महासागरासारखें खवळून राहिलें आहे. ( मिशांस पीळ देऊन ) असो; कदाचित् तो अपमानही मीं सहन केला असता. पण, भरदरबारांत–सर्वांदेखत तो व त्याचा वजीर जें मला लावून बोलले, तें तर माझ्या उराला–जलाल विषासारखें झोंबलें आहे ! ( आवेशानें ) खरा होईन तर, "शिवाजी हा सगळ्या दक्षिणचा राजा आहे" हे शब्द त्यांच्याच तोंडून खरे करवीन. बस्स; आतां पुनः त्याचें मुखावलोकन नको. ( अमळ विचार करून दुःखानें ) शिव शिव ! जें सिंहासन सोमवंशांतील राजांनीं सुशोभित केलेलें; नित्य वेदमंत्रांनीं जिथें आशीर्वाद व्हावयाचे; जिथें गाईब्राह्मणांची पूजा व्हावयाची; सत्य, न्याय, राजनीति, स्वातंत्र्य, दया, क्षमा, शांति व विवेक हीं जिथें मूर्तिमंत वसत होतीं; तिथें अन्याय, कपट, अधर्म, जुलूम इत्यादिकांचा पुरा अम्मल बसावा काय ? तिथें गाईब्राह्मणांच्या वधाच्या व आमच्या पवित्र धर्माच्या नाशाच्या गोष्टी व्हाव्यात काय ? तें भव्य व सुंदर सिंहासन, औरंगजेबा-

सारख्या हरामखोर अविंधानें वसून अपवित्र करावें काय? व असल्या महानीच तुर्कांपुढें आह्मांला मुजरे करण्याचा प्रसंग यावा काय? (पुनः मिशांस पीळ देऊन) केवढी ही आमची दुर्दशा व नाचक्की? (संतापानें दांत ओंठ चावून) काय करूं? आमची जन्मभूमि, आमचा हक्क, आमची मालकी, आमची मालमत्ता, आमच्या देशाचे आह्मी खरे वारस असतां—आह्मी चोर—आह्मी लुटारू—आह्मी तावेदार—काफर—गुलाम—वंडखोर—व हांजी हांजी करणारे—चिटणीस, काय हें? आपल्या देशाशीं ज्यांचा काडीचाही संवंध नाहीं, त्यांनीं आमचें सगळें लुटावें, कोंवड्या वकऱ्यांसारखें आमच्या लोकांला छाटावें, छळावें—धर्मभ्रष्ट करावें—आणि आह्मीं भागूवाईप्रमाणें हें सर्व मुकाट्यानें पहावें? (आवेशानें) अहा—जर आमची सर्वांची एकी असती, स्वातंत्र्याचा व स्वदेशाचा सर्वांस पुरा अभिमान असता, तर हे जंगली लांडगे—आमच्या वाऱ्याला तरी उभे राहिले असते काय?

**बाळाजी**—महाराजांचें ह्मणणें वरोवर आहे. पण या वेळीं वारा वाहील तशी पाठ दिली पाहिजे. संतापून काय होणार?

**शिवाजी**—(आवेशानें) समजेल, काय होईल तें? (दांत ओंठ चावून) संधि साधून—गुलामाच्या नरडीचा घोट घेईन, तेव्हांच शांत होईन. (मिशांस पीळ देत उभा आहे इतक्यांत रामसिंग येतो.)

**रामसिंग**—भाई शेवाजी, यह क्या करते हो? किसीका कंठपान करने चहाते हो?

[ वंधु शिवाजी, हें काय करितां? कोणाचें कंठपान करूं इच्छितां? ]

**शिवाजी**—और किसीका? (अमळ शांत होऊन) कौन, रामसिंग? आईये.

[ आणखी कोणाचें? कोण, रामसिंग? यावें. ]

**रामसिंग**–भाई शेवाजी, ऐसा कहनेका और करनेका यह वक्त नहीं है! बादशाहाके पोशिदागो चारोतरफ फिरते हैं! और (कानांत सांगतो) बादशाहानें ऐसाभी किया है! इस्‌वास्ते आप्‌ गाफिल मत्‌ रहें.

[बंधु शिवाजी, असें बोलण्याची व करण्याची ही वेळ नाहीं! बादशाहाचे गुप्त हेर सर्वत्र फिरत आहेत! आणखी–बादशहानें असेंही केलें आहे! म्हणून आपण बेसावध राहूं नका.]

**शिवाजी**–(चकित होऊन) यह आप्‌ क्या कहते हो? यहांतक्‌ उन्होंने किया? (अमळ विचार करून) अच्छा! हम्‌ यहांतक्‌ आया येही हमारी बडी भूल भई! फिकर नहीं. जो नसीबमें होना था, सो हुआ. आजतक्‌ शिवाजी किसीका बंदिवान नहीं हुआथा; मगर, आज अपने हातसेही नज़रकैद हुआ है!

[हें आपण काय सांगतां? इथवर त्यानें केलें? ठीक! मी इथें आलों हीच माझी मोठी चूक झाली! चिंता नाहीं. जें नशिबांत व्हायचें होतें तें झालें. आजपर्यंत शिवाजी कोणाचा कैदी नव्हता झाला; पण, आज आपल्या हातानेंच नजरकैदी झाला आहे!]

**बाळाजी**–(आश्चर्यानें) महाराज, हें आपण काय म्हणतां?

**शिवाजी**–आणखी तें काय म्हणायचें आतां? आजपासून आपण सर्व बादशाहाचे नजरकैदी झालों, नजरकैदी–समजलांत! औरंगजेबानें ही आपली तैनात वाढविली म्हणायची!

**बाळाजी**–खरोखर, या बादशाहाच्या कपटी वर्तनाची अगदीं कमाल झाली आतां!

**शिवाजी**–(शिवाजी मिशांस पीळ देऊन) होऊं द्या. असो. चिंता नाहीं. संकटें हीं भावी सुखाचीं शुभचिन्हें आहेत. आतां भिऊन काय होतें? धीर सो गंभीर. नाशास उपनाश, किंवा शेरास सव्वाशेर आहेच. तुम्ही मात्र धीर सोडूं नका. श्रीअंबाबाईच हें संकट, हं हं म्हणतां दूर करील.

**बाळाजी**—महाराज जशी आज्ञा करतील, तसेच आह्मी सर्व वागूं.

**शिवाजी**—फार उत्तम. (रामसिंगास) भाई रामसिंगजी, अब् आप् क्या कहते हो?

**रामसिंग**— प्यारे शेवाजी! इस् वातसे मैं निहायत् गमगीन हूं! पिताजी और मेरे भरोंसेसे आप्पै यहांतक् आफ़त आन पड़ी के, आप्को यह तक्लीफ़ उठानी पड़ी! वेषक्! ऐसा दगेवाज़ वादेशाह, कुल् दुन्याके तवारीखमें नज़र न आवेगा.

[ प्रिय शिवाजी, या गोष्टीमुळें मी अत्यंत दुःखी आहें! बाबांच्या व माझ्या विश्वासामुळें, आपणांवर हें इतकें संकट आलें कीं, आपणांला हें असें दुःख सोसावें लागलें! खचीत, असा विश्वासघातकी बादशाहा, सगळ्या जगाच्या इतिहासांत नाहीं मिळायचा. ]

**शिवाजी**—जो होना था, सो हुवा. इस् वात्में आप्को और आप्के पिताजीको हम् विलकुल् दोष नहीं देयेंगे. क्यौंके, वो वादशाहही फ्रेबका वादशाह है.

[ जें व्हायचें तें झालें. या गोष्टींत आपल्याला व आपल्या वडिलांला मी अगदीं दोष नाहीं द्यायाचा. कारण, तो बादशाहाच मूळचा विश्वासघातकी बादशाहा आहे. ]

**रामसिंग**—अब् आप् ग़ाफिल मत् रहिये. आप्के ऊपर वादशाहाने निगाःवानी करनेकेलिये कोतवाल पौलादखांको मुक़र्रर किया है. वो निहायत् फितुरी है! उस्के आदमीयोंके सामने वादशाहाके वरखिलाफ न कीजियेगा, यह मेरा आप्से इलतमाश है. जव्तक् आप् यहांसे वेफिक्र रुक्सत् नहीं हो जाओगे, तव्तक् मैं गमीके दर्यामें गोतेही खाता रहूं गा!

[ आतां आपण बेसावध राहूं नका. आपणांवर चौकीपहारा करण्यासाठीं बादशाहानें पौलादखान कोतवालाची नेमणूक केली आहे. तो मोठा विश्वासघातकी आहे! त्याच्या माणसांदेखत बादशाहाची कांहींच गोष्ट बोलूं नका, ही माझी आपणांस सूचना आहे. जोंपर्यंत आपण येथून बिनधोक जाणार नाहींत, तोंपर्यंत चिंतेच्या समुद्रांत मी गोते खात राहीन।]

**शिवाजी**–आप् बेफिकर रहैं. वादशाहाका कुल् हेतु हमें मालूम हुआ. उस्के दिलिइरादेको अव् हम् खूव समज गयें. अच्छा; आप् अव् इत्ना कीजिये-( कानांत सांगतो. )

[ आपण निर्धास्त असा. बादशाहाचा सर्व हेतु मला समजला. त्याचा गुप्त इरादा ही मी खूप समजलों. ठीक; आतां आपण इतकें करा. ]

**रामसिंग**–उमेद है के, वादशाहा यह वात तो वड़े खुबीसे मंजूर करेगा. ( उठतो ) अच्छा; अब् मैं रुक्सुत लेता हूं

[ आशा आहे कीं, बादशाहा ही गोष्ट मोठ्या आनंदानें कबूल करील. बरें; आतां मी निरोप घेतों. ]

**शिवाजी**–( उठून ) आईये. [ **यावें** ] ( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

### स्थल–दिल्ली, शिवपुरा; शिवाजी महाराजांच्या वाड्याजवळची चौकी.

**जमालखां**–( पहारा करतां करतां ) भाई सरफ्राजखां, पूरे तौर-पर निगाःवानी करना. क्यौं के, वो शेवाजी है !

[ बंधु सरफ्राजखां, चांगला चौकी पहारा करा. कारण, तो शिवाजी आहे ! ]

**सरफ्राजखां**–( ऐटीनें ) होने दो. अप्ने सक्त निगाःवानिमेंसे चिंवटीभी जाने नहीं पाती; फेर शेवाजीकी क्या मगदूर है के, वो यहांसे गुम् हो जायगा !

[ असूं द्या. आपल्या खड्या पहाऱ्यांतून मुंगीसुद्धां जायची नाहीं; मग त्या शिवाजीची काय विशाद आहे कीं, तो येथून पळून जाईल ! ]

**जमालखां**–वेषक्, वैसाही गश्त करना दुरुस्त है. ( इतक्यांत राघोजी मिठाईनें भरलेले करंडे घेऊन येतो. )

[ खरोखर, असाच पहारा करणें रास्त आहे. ]

**राघोजी**–( लवून ) आलेकम सलाम. [ रामराम. ]

**सरफ्राज**–आलेकम सलाम; सब्र करो. ठेरो; देखने दो इन्में क्या है!

[ रामराम; थांबा, उभे रहा. पाहूं द्या यांत काय आहे तें ! ]

**राघोजी**–( मराठी बोलतो. तें त्यांस न समजल्यामुळें घोटाळा होतो. ) अच्छा, देखो. और कुछ् नहीं जनाब. शिर्फ मिठाईही है. बडे नबाब साहेबके यहां लेजानेका हमारे महाराजका हुक्म हुवा है.

[ बरें; पहा. आणखी कांहीं नाहीं महाराज, फक्त मिठाईच आहे. थोरल्या नबाब साहेबांकडे घेऊन जाण्याचा महाराजांचा हुकूम झाला आहे. ]

**जमालखां**–( तपासतो ) खैर, लेजाओ. [ असो; जा घेऊन. ]

**राघोजी**–जी जनाब, वंदगी. (जातो.)

[ जी महाराज, रामराम. ]

**जमालखां**– वगैरे तलाश, कोईभी चीज या षक्स, अंदरसे बहार या बाहारसे भीतर कभी न जाने आने देना.

[ चौकशीखेरीज कोणतीच वस्तु किंवा माणूस, आंतून बाहेर अथवा बाहेरून आंत कधींच जाऊं देऊं नये. ]

**सरफ्राजखां**–दुरुस्त, वैसाही करना चाहिये.

[ वास्तविक, असेंच केलें पाहिजे. ]

---

## प्रवेश ५ वा.

### स्थल-दिल्ली-शिवपुरा, शिवाजीमहाराजांचा वाडा, एक खोली.

**शिवाजी**–तावेदारीसारखें दुसरें दुःखच नाहीं ! त्यांतून ही नजरकैद ह्मणजे निव्वळ जिवंत रौरौनरकवासच आहे ! ! खरोखर, माणसाची स्थिति मोठी विलक्षण आहे ! तिला स्थिरता कशी ती नाहींच.

बहुरुप्यासारखीं तिचीं रूपें, वरचेवर बदलतात. पुनः, भवितव्यता पडली तिची मुख्य चालक. तेव्हां, तिच्या झटक्यांतून कोण पार पडला आहे? प्रत्यक्ष भगवान् रामचंद्र, हरिश्चंद्र, नळ, पांडव यांनाही तिनें सोडलें नाहीं; तिथें माझा तो काय पाड? (अमळ विचार करून) अथवा मी चुकतों. सारखे टांकीचे घाव खातो, तेव्हांच दगडाला देवकळा येते. घणाचे घाव खाल्यावांचून हिऱ्याची पारख होत नाहीं. कसोटीवर घांसून, कापून, तोडून, ठोकून व शेवटीं आगींत तापवून सोन्याची परीक्षा करतात; तशीच ही माझ्या निश्चयाची व मर्दुमकीची परीक्षा नसेल कशावरून? होऊं द्या. ती देण्याला मी तयार आहें. संकटावांचून धैर्याची, पराक्रमाची, निश्चयाची, चातुर्याची व स्वदेशाभिमानाची खरी पारखच व्हायची नाहीं. संकट ही एक खडतर देवताच आहे. तिच्या कसास उतरणें हेंच खरें शौर्य आहे. असो. (मिशांस पीळ देऊन) गुलामा–तुर्का–औरंगजेबा, 'मी आतां कृतकृत्य झालों' असें तूं आपल्या मनांत समजत असशील? खुशाल समज. पण, हा बोचक्यांत बांधलेला धगधगीत विस्तव आहे.

**हिरोजी**–पुन महाराज, वाड्याभवल्याल त्यान अक्शी खडा पारा ठेवलाया.

**शिवाजी**–ठेवूं दे. सुरुंग जितका जितका चिळून भरावा, तितका तितका तो जोरानें उडतो. कमान जितकी खेंचावी, तितका तीर जोरानें लांबवर जातो. आगीवर जसजसें अधिक तेल ओतावें, तसतशी ती जास्तच भडकते. याच्याहीपेक्षां खडा पहारा असला तरी काय होणार? तितका आपला बेत अधिक चांगला वठेल. ऐकलें हिरोजी, आपल्यापाशीं असे कांहीं हुन्नर आहेत कीं, असल्या खड्या पहाऱ्यांतून आपण केव्हां व कसे निघून जाऊं हें त्यांना शेवटपर्यंतही नाहीं स-

मजायचें. आपलीं बाकीचीं माणसें बिनदिक्कत येथून गांवीं गेलीं हें एक उत्तमच झालें !

**हिरोजी**–पुन सरकार, तिक्त आपला ज्वार कमी झाल.

**शिवाजी**–चुकतोस तूं इथें हिरोजी. यांत माझा हेतुच वेगळा आहे. येईल लौकरच तो तुझ्या लक्षांत. आणखी हें माझें आजारीपणाचें ढोंग, गस्तवाल्यांशीं केलेली दोस्ती, बादशाहाच्या प्रीतींतल्या मुत्सद्यांशीं ठेवलेली सलगी, फकिरांना चालू असलेला दानधर्म, नवाब, काजी, सरदार, व इतर लहान मोठ्या मानकऱ्यांकडे जात असणाऱ्या आपल्या भेटी; या सर्व गौडबंगालानें त्यांची अशी नजरबंदी केली आहे कीं, आपल्याविशीं ते अगदीं बेफिकीर झाले आहेत.

**हिरोजी**–त्यवी खर हाये. आताशा गस्तवाल आदुगरवानी लई बारकाईन पुसतपास न्हाई करीत.

**शिवाजी**–आपल्याला तरी हेंच पाहिजे होतें. हिरोजी, हे मिठाईचे करंडे, बघ–लौकरच असें कांहीं अजब गौडबंगाल करतील कीं, पौलादखां व त्याचे एकंदर साथी, यांच्या हातापायांत शेवटीं बिड्याच घालतील किंवा त्यांना ठार करतील. अंबाबाईचा शकुन मात्र खरा होवो व धारलेला बेत बेमालूम पार पडो. (इतक्यांत निराजी व बाळाजी येतात व मुजरे करितात.)

**निराजी**–आज्ञेप्रमाणें सर्व तयारी केली आहे.

**शिवाजी**–तर मग. (कानांत सांगतो–) तुह्मी सर्वजण तिथें असा.

**निराजी**–ठीक आहे. पण, महाराजांनीं मात्र फार सावध असावें.

**शिवाजी**–त्याविशीं तुह्मी अगदीं बेफिकीर असा. आजचा अंबाबाईचा शकुनच तसा आहे.

**निराजी व बाळाजी** (मुजरा करून जातात.)

**शिवाजी**–हिरोजी, असा ये; ( हिरोजी जवळ येतो, त्याच्या कानाशीं लागून–) इतकें करुन, शिताफीनें इथून पार पडा.

**हिरोजी**–( हात जोडून ) का भवानी करील त्य खर, पुन सरकार, आपला पोशाक मातुर मी न्हाई कंदी घालणार आंगामंदीं.

**शिवाजी**–बरें नको घालूं. तुला वाटेल तसें कर. असो; जा, लाग आपल्या तयारीला.

**हिरोजी**–जी. ( जातो. )

**शिवाजी**–(स्वतांशीं ) गाईब्राह्मणांच्या, स्वधर्माच्या व स्वदेशाच्या रक्षणासाठींच मी हें धाडस करीत आहें. ( हात जोडून ) श्रीअंबाबाई, मला या दुस्सह रौरौनरकवासांतून सोडविणारी आतां तूंच आहेस. ( जातो. )

---

## प्रवेश ६ वा.

### स्थल–दिल्ली–शिवपुरा–चौकी.

**प० शिपाई**–( बाळाजीस ) क्या–ये सब् मिठाईसेहि भरे हैं ?
[ काय–हे सर्व मिठाईनेंच भरले आहेत ? ]

**बाळाजी**–( लवून ) जी हां जनाब. सबमें मिठाईही है.
[ जी होय महाराज. सगळ्यांत मिठाईच आहे. ]

**दु० शिपाई**–खैर. तब तो जानेदो. हरदम् क्या देखते हो ?
[ बरें, तर जाऊं द्या. नेहमीं काय तपासायचें ? ]

**प० शि०**–अच्छा. ( बाळाजीस ) ऐ, ये किसीके यहां ले जाते हों?
[ठीक; अरे ए हें कोणाकडे घेऊन जातोस ? ]

**बाळाजी**–( पुनः लवून ) अपने बडे मौलवी साहेबके यहां.
[ आपल्या थोरल्या मौलवी साहेबांच्या इथें. ]

**प० शि०**–खैर; ले जाओ. [ बरें; जा घेऊन. ]

**बाळाजी**–जी हां जनाब्. वंदगी. ( करंड्यांसह जातो. )

[ जी होय महाराज. रामराम. ]

**दु० शि०**–भाई, शेवाजी तो अभी बहोत् अजीज हो रहा है. वो जल्द मुसलमीन हो जाता, तो बहोत् खूब होता.

[ वंधु, शिवाजी तर आतांशा फारच नम्र झाला आहे. तो झट् मुसलमान होईल, तर फारच चांगलें होईल. ]

**प० शि०**–अपूने वादशाहाके जाहोजलालके आगे उसूका कहां-तक जोर चलेगा? रफ़ुते रफ़ुते वो आपूसेही मुसलमीन हो जायगा.

[ आपल्या महाराजांच्या पराक्रमापुढें त्याचें सामर्थ्य कोठवर चालणार? हळू हळू तोच होऊन मुसलमान होईल. ]

**दु० शि०**–इनूशाल्लाताला: ! अच्छा, अब् मैं नमाज आदा कर-नेकेलिये जाताहूं. वंदगी भाई, वंदगी.

[ ईश्वर करील तर ! बरें, आतां मी ईश्वरभक्ति करायला जातों. रामराम वंधु, रामराम. ]

**दु० शि०**–वंदगी. मैंभी नमाज आदा करताहूं.

[ रामराम. मी पण ईश्वरभक्ति करितों. ] ( जातात. )

---

## प्रवेश ७ वा.

### स्थल–दिल्ली शहराजवळील एक संकेतस्थल.

**शिवाजी**–( सहर्ष ) अंबाबाईच्या कृपेनें धरलेला बेत तर अगदीं बेमालूम पार पडला ! आतां हिरोजी मात्र तेथून बिनधोक निघून आला कीं, गंगेंत घोडे न्हाले.

**निराजी**–महाराज, आतां त्वरा होईल तितकें चांगलें. संकेता-प्रमाणें पलीकडच्या राईत घोडे व पोषाख तयार आहेत.

**शिवाजी**–ठीक आहे. (जातांना आवेशानें) गुलामा, आवेंधा, औरंगजेवा–अरे, या शिवाजीला तूं आपला गुलाम वनवीत होतास काय? वनीव आतां कसा वनवितोस तो? (दांत ओंठ चावून व मिशांस पीळ देऊन) हे हरामखोरा–विश्वासघातक्या तुर्का! हा पहाडी उंदीर नाहीं, तर ऐश्वर्यमदानें माजलेल्या तुजसारख्या नरगजाचें गंडस्थल विदारणकरणारा विक्राळ सिंह आहे. (जातो.)

---

## प्रवेश ८ वा.

### स्थल–शिवपुरा–चौकी.

**जमालखां**–तोवा! भाई सरफ्राजखां, अव् क्या करना? वेषक् दगा हुआ!

[हायहाय! वंधु सरफ्राजखां, आतां काय करावें? खचित दगा झाला!]

**सरफ्राजखां**–भाई, क्या–हुआ क्या?

[वंधु, काय–काय झालें?]

**जमा०**–मेहेलमें तो एक आदमीभी नहीं नजर आता!

[वाड्यांत तर एक देखील माणूस नाहीं दिसत!]

**सर०**–(चकित होऊन) यह तुम् क्या वक् रहे हों? क्या–अंदर कोईभी षक्स नहीं है? क्या–यह तुम् ख्वाव्में कहते हो–या वेदार सच्ही कहते हो?

[तूं हें काय वरळतोस? काय–वाड्यांत कोणी नाहीं? काय, स्वप्नांत तर नाहींसना तूं वरळत? किंवा भाऊ, हें खरेंच सांगतोस?]

**जमा०**–लाहोलविल्ला:! कुव्वत् इल्लाविल्ला:? क्या–मैं झूंट कहता हूं? नहीं मैं सच् कहता हूं. नजरसे खुद् देख आया हूं. मकानमें कोईभी पक्स नहीं है. अगर तुझे यकीन् न हो, तो खुद् अपनी आंखसे देखलो.

[ हे ईश्वरा! हें अघटित कसें झालें? काय मी हें खोटें सांगतों? नाहीं, मी खरें सांगतों. मी स्वतः पाहून आलों आहें. वाड्यांत कोणीच माणूस नाहीं. अथवा तुझी खात्री होत नसेल, तर तूं स्वतः जाऊन पहा. ]

**सर०**–( जातो व परत येऊन आश्चर्यानें ) तोवा! वेषक्, दगा हुआ!! मगर ताज्जुब् इस् वात्से है के, ऐसी सक्त निगा:वानीमेंसे वे लोग क्योंकर गुम् होगये? क्या–हम् सब्ही ऐसे ग़ाफिल् होगये?

[ हाय हाय! खचित, घात झाला!! पण, मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे कीं, अशा खड्या पहाऱ्यांतून ते कसे पळाले? काय आम्ही सर्वच गाफिल झालों? ]

**जमा०**–मैंभी ताज्जुब् होता हूं! भाई, अब् कोतवालसाहेबको क्या इतल्ला देना?

[ मीही मोठा आश्चर्यचकित झालों आहें! बंधु, आतां कोतवालसाहेबांना काय सांगावें?

**सर०**–भाई, यह वात् सुन्तेही मेरा कलिजा फट् गया–और दिल्भी फड़फड़ता है! ( इतक्यांत कोतवाल येतो, त्यास पाहून ) कंबख़ती! कोतवालसाहेबभी आन् पोंहोंचे!

[ भाऊ, ही गोष्ट ऐकतांच माझें काळीज फाटलें–व ऊर पण उडत आहे। पुरें दुर्दैव! कोतवालसाहेबही आले। ]

**पौलाद्खां**–( प्रवेश करून ) क्यों सरफ़्राजखां?

**सर०**–( लवून ) जनाब्. ( महाराज. )

**पौला०**–निगा:वानी बरावर रखना.

[ चौकीपहारा बरावर ठेवा. ]

**सर०**–हां जनाब, सब् बराबरही है.

[ होय महाराज, सर्व यथास्थित आहे. ]

**पौला०**–खैर; शेवाजीकी मुलाकत्केलिये हम् अंदर जातें हैं; क्यों के, वो वहोत् दिन्से बुख़ारसे वेमार है. ( जातो. )

[ असो; शिवाजीच्या भेटिला मी आंत जातों; कारण, फार दिवस झाले, तो तापानें फार अजारी आहे. ]

**सर०**–( दुःखाचा उसासा टाकून ) भाई जमालखां, अब् कब्रमें जानेकी तय्यारी करो! अब् अप्नी जिंदगी तमाम् हुई!!

[ बंधु जमालखां, आतां मसणांत जाण्याची तय्यारी करा. आतां आपल्या आयुष्याची दोरी तुटली!! ]

**पौलाद०**–( संतापानें दांत ओंठ चावीत व हातपाय आपटीत येतो. ) या इलाहीः! तोबा! इस्तगफुरउल्लाः!! सरफ्राजखां–जमालखां; यह क्या गज़ब् हुआ? मकानमें एकभी षक्स नज़र नहीं आता! वे सब् क्या हुये?

[ हे ईश्वरा! हाय हाय! काय हा ईश्वरी कोप!! सरफ्राजखां–जमालखां; हा काय अनर्थ झाला? वाड्यांत एक देखील माणूस दिसत नाहीं! ते सर्व काय झाले? ]

**सर० व जमा०** ( उत्तर न देतां खालीं माना घालून उभे रहातात. )

**पौलाद०**–( अधिक संतापून ) क्यौं–सरफ्राजखां, क्यौं–जमालखां, मैं क्या पूच्छताहूं? ज़बाव क्यौं नहीं देते हो? क्या–ऐसेही निगाःबानी करते हो?

[ कां–सरफ्राजखां, कां–जमालखां, मी काय विचारतों? जबाव कां नाहीं देत? असाच पहारा करितां काय? ]

**सर०**–( कांपत कांपत ) ज–ज–ना–ब्! न–नमा–मालूम् वे लोग क्या हुये?

[ म–म–महाराज–ख–खब र ना–नाहीं, ते लोक काय झाले? ]

**पौला०**–( अधिक संतापून व दांत ओंठ चावून ) क्या हुये? बेवकूब्फों, यह तुम् क्या बक्ते हो? क्या–ऐसेही निगाःबानी करते हो?

[ काय झालें? मूर्खहो, हें तुम्हीं काय बरळतां? काय तुम्ही असाच पहारा करतां? ]

**सर०**–जनाब्! निगाःबानीसे तो हम् एक लेजाभी ग़ाफिल् नहीं हुये. लेकिन्, खुदा जाने–यह क्या गज़ब् हुआ?

[ महाराज, चौकीपहाऱ्यांत आमची काडीची देखील कसूर नाहीं झाली. पण, ईश्वर साक्षी–हा कसा घात झाला ? ]

**पौला०**–( रागानें ) गज़ब् हुआ–गज़ब्–! वेवकूफों, कहो जल्द; वे लोग कैसे गुम् हो गये ? नहीं तो, अबी तुह्में कत्ल करता हूं. (तलवार उपसतो. )

[ घात झाला–घात ! मूर्ख हो, सांगा लौकर; ते लोक कसे पळून गेले ? नाहीं तर आतां छाटून टाकतों तुम्हांला. ]

**सरफ़ां०**–वेषक् हम् गुन्हागार हैं. लेकिन् ईमानसे कहताहूं के; वे लोग, कब् और कैसे गुम् हो गये, इस्का भेद, अब्तक्भी हमें नहीं मालूम हुआ.

[ खचित, आम्ही अपराधी आहोंत. पण, सत्यस्मरून सांगतों कीं, ते लोक, केव्हां व कसे पळून गेले, ह्याचा पत्ता अझूनही आम्हांला लागला नाहीं. ]

**पौला०**–( निराश होऊन ) अफ़्सोस ! अफ़्सोस ! ! पांच हज़ार फौजका पेहरा होके, आज यह कैसी गफलत् होगई ? अब् मैं हुजूरको क्या मूह् बतावूं ? या अल्ला: ! आजतक् ईमान्से बादशाहाकी जो नौकरी बजाई, सो सब् ख़ाकमें मिल गई ? मेरे कुल् नेकनामीको तुम्ने आज आग लगा दिई ! ऐ कंबख्त निगाःवांनो, निकल जाओ तुम् सब् यहांसे. तुह्मारा बेवफाईका मूह मुझको मत् दिखाओ. चलो; मेरे आंखोंसे दूर हों. या अल्ला: ! अब् मैं कौनसा मूह् लेकर बादशाहाके हुजूरमें जाऊं ? इस्सें बेहत्तर है के, अप्नी जिंद्गानीको यहांही तमाम् करूं. ( खंजीर उपसतो ) ऐ मेरे जा़न्के अजी़ज़ खंज़र ! तू अब् मेरे खूनसे रंगीन हो ! इस् दुनियामें बेईमान्, दगेबाज और निमकहराम् बन्कर रेहेनेसे जिंद्गीको ख़तम् करनाही बेहत्तर है. पौलादखां! अब् तू इस् गफ़लत्का फल चाख जहान्नमें (उरांत खंजीर मारून घेतो.–)

[ हाय ! हाय ! ! पांच हज़ार शिपायांचा पहारा असतां, आज ही गफलत कशी झाली ?

आतां मी महाराजांस कसें तोंड दाखवूं ? हे ईश्वरा ! आजपर्यंत प्रामाणिकपणें जी बादशाहाची नौकरी केली, ती सारी मातींत गेली ! माझ्या साऱ्या प्रामाणिकपणाला तुम्हीं आज आग लाविली ! हे दुर्दैवी पहारेकऱ्यांनो, निघून जा तुम्हीं सारे इथून. तुमचीं हीं अविश्वासानें काळीं झालेलीं तोंडें मला नका दाखवूं. चला–व्हा माझ्या दृष्टिआड. हे ईश्वरा ! आतां मी कोणत्या तोंडानें बादशाहाकडे जाऊं ? बेहत्तर–यापेक्षां आपल्या जीविताचाच आतां इथें शेवट करावा. हे माझ्या जीवलग मित्रा खंजिरा ! तूं आतां माझ्या रक्तानें रक्तबंबाळ हो ! या जगांत अप्रामाणिक, अविश्वासी, व निमकहराम बनून रहाण्यापेक्षां आयुष्याचाच शेवट करणें आतां उत्तम. पौलादखां ! भोग आतां या हयगईचें फळ नरकांत.]

**सर्व शिपाई**–तोबा ! या इलाही !! कोतवालसाहेबने यह क्या किया ? यह तो बडी गज़बकी बात् हुई !

[हाय हाय ! हे ईश्वरा !! कोतवालसाहेबांनीं हें काय केलें ? ही मोठी अघटित गोष्ट घडली ! ]

**सरफ्राजखां**–यारों ! अप्‌ने गफ़ल्‌त्‌से यह सब् हुआ ! अब् जीनेसे क्या फायदा ? ( झट् खंजीर उरांत मारून पडतो. )

[ मित्रहो ! आपल्या हयगईनें हें सर्व झालें ! आतां जगून काय फळ ?]

**जमालखां**–( खंजीर उपसून ) प्यारे सरफ्राजखां ! मैंभी आप्‌केसाथ अप्‌नी जान् कुरबान् करताहूं. ( तो खुपसून पडतो. )

**दुसरे शिपाई**–तोबा ! यह क्या हुआ ? आप्‌समें कुरबानी ! न मालूम् यह क्या गजब् है ?

[हाय हाय ! हें काय झालें ? आपसांत आत्मघात ! समजत नाहीं हा काय अनर्थ आहे ? ] ( जातात. )

## प्रवेश ९ वा.

### स्थल–दिल्ली, दरबार.

**औरंगजेब**–( सर्वांचे मुजरे घेतल्यावर ) उस् पहाडी मूषने दक्खनमें बहोत् खलल् मचाया था; लेकिन् कैसे फन्‌से उस्‌को सक्त पिं-

जरेमें ड़ाल दिया ? ऊमरभर उस्से यूंहि रखूंगा. अगर, वो मजहवे इस्लाम् इखत्यार करेगा, तो हम् उस्के सब् गुन्हा मुआफ् करके, तमाम् दक्खन्का सुवादार वना दूंगा. खैर; (दाढीवर हात फिरवून) देख ऐ वजीर, दक्खन्में अब् हमारा कोईभी दुष्मन् नहीं है. फरब्रे हनूद्भी कोई नहीं है. खुदाके फज्लसे तमाम् दक्खन्को हम् इस्लाम्का पेरवा करेंगे.

[ त्या पहाडी उंदरानें दक्षिणेंत फार पुंडाई मांडली होती; पण, युक्तीनें कसा पिंजऱ्यांत घातला ? मरेपर्यंत त्याला असा ठेवीन. अथवा जर तो मुसलमान होईल, तर त्याचे सर्व अपराध क्षमा करून, सगळ्या दक्षिणचा मी त्याला सुभेदार वनवीन. असो; पहा प्रधानजी, दक्षिणेंत आतां आपला कोणी शत्रु नाहीं. हिंदुधर्माभिमानी पण कोणी नाहीं. ईश्वरीकृपेनें सगळा दक्षिणदेश मी मुसलमान करीन. ]

**जाफरखां**–(उठून अदवीनें) किब्ले आलम् ! हुजूरके इक्वालके आगे उस् फित्नापरदाज् नाचीज् मुजीका क्या कदर है ? ज़हांपन्हांकी ज़ाहोज़लाल देक्ख, उस्का तो वहीदम् खुष्क होगया है ? उस्की फौज़भी मारेडरके पीच्छे लौट गई. अब् शिवाय पांच् छ आद्मियोंके उस्केपास कोई नहीं है. पौलादखांका पेहराभी यहांतक् सक्त है के, चिड़ियां तक्भी फटक्ने नहीं पाती; और हुजूर 'मुझे अभी नहीं छोड़ेंगे,' यह जान्के, वो वहोत्ही अज़ीज़ हो रहाहै. हरवक्त हुजूरके इक्वालकी तारीफ करकर, तावेदारही बन्ना चहाता है.

[ विश्वाधीश ! आपल्या थोरपणापुढें, त्या अविश्वासी नीच लवाडाची थोरवी ती काय ? महाराजांचा पराक्रम पाहून, तो अगदीं गर्भगलीत झाला आहे. त्याची फौजही भिऊन स्वदेशीं परत गेली. आतां फक्त पांच सहा माणसें त्याच्यापाशीं आहेत. पौलादखानाचा पहारा इतका कडक आहे कीं, चिडीसुद्धां त्यांतून उडून जायची नाहीं. आणि 'महाराज मला सोडायचे नाहींत' हें जाणून, तो आतां फार गरीब झाला आहे. नेहमीं महाराजांच्या मोठेपणाची प्रशंसा करीत असतो, व अंकित होण्याचीही त्याची इच्छा आहे.]

**औरंग०**–(दाढीवर हात फिरवून) मगर ऐ वजीर, उस् फित्ने

नापाक्पर एकदम् यकीन् न रखना चाहिये. क्यौं के, चिता, चोर और कमान्, जितने झूंके कावले इत्बार नहीं हैं. वैसा वो दगावाज अगरचे वहोत्ही नरम् है; मगर, लायक भरोसेके नहीं है. उस्की ऊपर ऊपरकी शिरीं गुफत्गूक्से भूलना वाजीब् नहीं है. क्यौं के मीठा बोल्नेवाले हमेषा दिल्के फ़रवी होते हैं. [ इतक्यांत एक शिपाई येतो. ]

[ पण प्रधानजी, त्या ठग नीचावर एकदम विश्वास ठेवितां येत नाहीं. कारण, चित्ता, चोर व धनुष्य, हीं जितकीं लवतात, तितकीं घातक होतात; तसा तो विश्वासघातकी जरी अत्यंत नम्र दिसला, तरी विश्वासपात्र नाहीं. त्याच्या वरवर गोड बोलण्यानें भुलूं नका. कारण, गोडबोले नेहमीं कपटी मनाचे असतात. ]

**शिपाई**–किब्ले आलम्की कदम्बोसी चहाता हूं ?

[ विश्वपतींच्या पायांचें चुंबन करूं इच्छितों ]

**औरंग०**–वजीर, देखो तो कौन है ?

[ प्रधानजी, पहा तो कोण आहे ? ]

**जाफर०**–जीहां, हुजूर. (आलेल्या शिपायास ) तू कौन है, और किस्लिये यहां आया है ? क्या अरज़ किया चहाता है ?

[ जी होय, महाराज. तूं कोण आहेस व कशाला आला आहेस ? कसली विनंती करूं इच्छितोस ? ]

**शिपाई**–हुजूर ! क्या कहूं ? ज़बान् छोटी, बात् बड़ी; और इस् गुलाम्का गुन्हा मुआफ् हो, तो अरज़ गुज़ारश् करूं.

[ महाराज ! काय सांगूं ? जीभ तोकडी व गोष्ट मोठी; आणि या दासाच्या अपराधाची क्षमा होईल, तर विनंती करीन. ]

**जाफर०**–ऐ सीपाही, तेऱ्हा गुन्हा हुजूरसे मुआफ् है. कह् क्या कह्ने चहाता है ?

[ हे शिपाया, महाराजांनीं तुझ्या अपराधाची तुला क्षमा केली आहे. सांग, काय सांगायचें तें ]

**शिपाई**–(हात जोडून कांपत कांपत ) हु–हु–हुजूर ! शे–शे–शे-

वाजी न–न–नज़रसे गुम् होगया–! पौ–पौलादखां इस् वेनंगीकेलिये जा-जानसे गु–गुज़र गये ! !

[म-म महाराज ! शि-शि-शिवाजी, न–न–नजर कैदेंतून पळून गेला ! पौ–पौलादखां या नामोशीमुळें म–म–मरून गेले ! ! ]

**औरंग०**–(चकित होऊन अतिशय संतापून) तोवा ! इस्तग़फ़ुरअल्ला: गज़व् खुदाका ! ! यह क्या अंधेर हुआ ? क्या–शेवाजी गुम् होगया ? पौलादखांका खून हुआ ?

[हाय हाय ! हे ईश्वर ! महाईश्वरी क्षोभ ! ! हा काय गोंधळ झाला ? काय–शिवाजी पळाला ? पौलादखानाचा खून झाला ?

**जाफर**–जीहां, हुजूर.

[जी, होय महाराज. ]

**औरंग०**–(दांत ओंठ चावतो व हातपाय आपटतो) गज़व् ! गज़व्–सद: गज़व् ! ! ! पांच हज़ार जंगी पेहरा होतेभी वो किस् तऱ्होंसे गुम् हुआ ? क्या–वे पांचें हज़ार ग़ाफ़ल् होगये ? क्या–निमकहराम् होगये ? निहायत् शरम्की वात् है के, मूषने आज पहाड़को गिरा दिया ! या आहूने शेरका शकार किया ! क्या–पटवीज़ने आफ़्ताव्को गारत् किया ? पौलादखां जैसा काविल् कोतवाल्, क्योंकर धोखा खा गया ? वेषक् हमारे फौज़में कुछ्ना कुछ् गोलमाल हुआ. अव् वो दगावाज हाथमें आना वहोत्–वहोत् मुष्किल् है ! इस् पौलादखांकी गफ़लत्ने हमारे मसलिहत्को वरवाद् करके, वादशाहत्को (हातावर हात आपटून) धव्वा लगाया ! ! वादशाहत्में ऐसे खलल् पैदा करनेवाले मुजीका रेहा करनेसे दक्खन् हमारे कव्ज़ेमें आना वहोत्–वहोत् दुष्वार है !

[अनर्थ–अनर्थ–सदाचा अनर्थ ! ! ! पांच हज्जार शूर शिपायांचा पहारा असतां तो कसा पळून गेला ? काय–ते पांच हज्जारही गाफिल झाले ? काय–अप्रामाणिक झाले ? अति लज्जेची गोष्ट आहे कीं, उंदरानें आज पहाड उलथून दिला ! किंवा हरणानें सिंहाची

शिकार केली! काय काजव्यानें सूर्य झांकला? पौलादखानासारखा चतुर फौजदार कसा फसला? खरोखर आपल्या फौजेंत, काहींना कांहीं तरी फितुरी झाली. आतां तो ठग हातीं लागणें फारच कठिण आहे! पौलादखानाच्या अशा हयगईनें माझी सगळी मसलत फसली! राज्याला धक्का पोंचला!! राज्यांत असे दंगेधोपे करणाऱ्या बंडखोरांकडे दुलर्क्ष केल्यानें दक्षिणदेश आपल्या हातीं येणें फारच कठिण आहे!]

**जाफर**–गरीबपरवर, जुल्म हुवा!

[दीनानाथ, अनर्थ झाला!]

**औरंग०**–वजीर, वेषक् पौलादखानें निमक्हरामी किई! (दांत ओंठ चावून व रागानें दोन्ही हात वर करून) ऐ कमूबख्त पौलादखां, इस्लामूका पेरों होकर यह तू क्या किया? अखीर अपूनी जान्भी गमाई, और खुदासेभी मूह् छिपानेके लायक हुआ! अफ्सोस! ऐ बदबख्त, तेरा दीन् और दूनी दोनों गया! (हातावर हात आपटून) मगर क्या करें? कुछ् चारा नहीं! अगर, तू जींदा होता–तो तुझे इस्की सजा यहांतक् पहुंचाता के, तेरे जिसम्, आतश्में जलाता, और तेरे वेईमानीको तामाम् दुनयामें रोषन् करता. खैर! ऐ वजीर उस् रामसिंगको जल्द बुला लाअ.

[प्रधानजी, खरोखर पौलादखानानें विश्वासघात केला! हे दुर्दैव्या पौलदखाना, हाडाचा खरा मुसलमान असतां हें तूं काय केलेंस? शेवटीं आत्मघात केलास व परमेश्वरापुढें तोंड दाखविण्यासही नालायक झालास! अरेरे! हे अधमा, धर्म व हें जग, या दोहोंसही तूं मुकलास! काय करूं? कांहीं उपाय नाहीं! जर तूं जीवंत असतास, तर तुला याची शिक्षा इतकी दिली असती कीं, तुला जीवंत अग्नींत जाळतों; व सगळ्या जगांत तुझा हा वेइमानीपणा जाहीर करतों. असो! प्रधानजी, त्या रामसिंगाला लौकर बोलावून आणा.]

**जाफर०**–हुजूरका हुक्म् चष्मोंसे वजा लाताहूं. (एका शिपायास) ऐ सीपाही, रामसिंगको जल्द बुला लाअ.

[महाराजांची आज्ञा शिरसामान्य आहे. हे शिपाई, जा, रामसिंगाला लौकर बोलावून घेऊन ये.]

**शिपाई**–जी हां, जनाब्. (जातो.)

**औरं०**–ऐ ज़ाफरखां, उस् बद्‌मुआष्‌की तालाश करनेके अव्वल् यूं करो; चारोंतरफ अप्‌ने बहोत्‌से सीपासालारको भेज दो; और उन्हे यह हुक्म दोके, कोईभी शिवाय इस्‌लाम्‌के–जंगम, जोगी, संन्यासी, तापसी, वैरागी, नानकपंथी, गोरखपंथी, ख़ाकी, बह्मन् या कंगाल–जो मिले, उस्‌को ज़बरदस्तीसे मुसलमान् बनाओ या जाहान्नमें गारत् करो. अगर उन्‌मेंसे वो बदज़ात्‌भी मिलजाय, तो उस्से कैद करके, जींदाही हमारेपास लाओ. जल्द तय्यारी करो. देर मत् करो.

[ हे जाफरखां, त्या अधमाचा तपास करण्यापूर्वी असें करा–चौफेर आपले पुष्कळ सरदार पाठवा., त्यांना अशी आज्ञा करा कीं–मुसलमानाशिवाय कोणीही जंगम, जोगी, संन्यासी, तापसी, वैरागी, नानकपंथी, गोरखपंथी, अवधूत, ब्राम्हण अथवा हिंदु भिकारी–जो मिळेल, त्याला जुलमानें मुसलमान बनवा, अथवा छाटून टाका; व जर त्यांत तो अधम मिळालाच तर कैद करून, जीवंत मजकडे घेऊन या. लौकर तयारी करा. उशीर लावूं नका. ]

**जाफर०**–किब्‌ले आलम्‌के हुक्मकी अभीकेअभी तामील करताहूं. (एका सरदारास) इनायत्‌उल्लाखां.

[ विश्वाधीशांच्या आज्ञेप्रमाणें आतांचे आतां तजवीज करतों. इना० ]

**इनाय०**–(उठून) जनाब, [ महाराज. ]

**जाफर०**–बेषुमार सवार और लष्कर लेकर इसी वक्त उस् बदमुआष्‌की तालाश करो.

[ पुष्कळ स्वार व शिपाई घेऊन आतांच त्या बंडखोराचा शोध करा. ]

**इना०**–बहोत् अच्छा, जनाब्. (जातो व रामसिंग येतो.)

[ फार चांगलें, महाराज. ]

**रामसिंग** (मुजरा करून अदबीनें बाजूस उभा रहातो.)

**औरं०**–रामसिंग, यह क्या हुआ ? शेवाजी कैसा गुम् हो गया ? और पौलादखांका कैसा खून हुआ ?

[ रामसिंग, हें काय झालें ? शिवाजी कसा पळाला, व पौलादखानाचा वध कसा झाला ? ]

**रामसिंग**–( आश्चर्यानें ) क्या–शेवाजी गुम् होगया ? और पौलादखांका खून हुआ ? जहांपन्हा, यह गज़ब्की ख़बर तो मुझे अभी मिली !

[ काय शिवाजी पळून गेला ? व पौलादखानाचा वध झाला ? महाराज, ही अघटित बातमी मला आतां समजली. ]

**औरं०**–देख रामसिंग, यह बात बिलकुल् तेरे यकीन्पर रेहनेसे हुई ! नहीं तो, हम् उस्से ऐसा सक्त जंजीरोंसे जकड़कर रखते के, क्या मगदूर था के, उस्का दम्भी निकलने पाता. बेषक् दगा हुआ!

[ बघ रामसिंग, तुझ्या विश्वासामुळें ही अशी गोष्ट झाली ! नाहीं तर, मी त्याला भक्कम बिड्या घालून इतक्या सक्त प्रतिबंदांत ठेविला असता कीं, त्याची काय छाती होती कीं त्यांतून तो सुटता ? त्याचा दमदम निघाला असता. खचित दगा झाला ! ]

**रामसिंग**–हुजूर, इस् बात्से अब्तक् मैं बिलकुल् बेख़बर हूं. मैं तो कलभी उस्के मकानपर गया था ! फेर न मालूम् यह क्या सितम् हुआ ? अगर मैं उस् वक्त जराभी फ़रेब या दगा देखता, तो हुजूरकी खिदमत्में अर्ज गुजारिश् करता.

[ महाराज, अझूनपर्यंत मला ही गोष्ट माहीत नव्हती. काल तर मी त्याच्या वाड्यांत गेलों होतों. आश्चर्य आहे ! हा अनर्थ कसा झाला ? त्यावेळीं जर मला थोडासा दगा किंवा लबाडी समजती, तर मी झट्ट महाराजांच्या पायांशीं विनंती केली असती. ]

**औरं०**–खैर; मगर ऐ वजीर,

[ असो; तर मग प्रधानजी, ]

**जाफर०**–हुजूर, [ महाराज, ]

**औरं०**–अब् तुम् जराभी ग़ाफिल् मत् रहो. यह फ़रेब क्योंकर

हुआ, उस्का खूब तालाश करो. जिस्का इस्में गुन्हा साबेत् हो, उ-स्से आतश्में जलाकर ज़ाहन्नम्का रास्ता दीखाओ; और उस् मुजीको पकड़नेकेलिये हरएक फन्में कसूर न करो. (मिर्शास पीळ देऊन) इन्शाल्लाः! अब् हम् ऐ बदबख्त शेवाजी, अगर तूं अब् कीं दफा हमारे हातमें आये, तो यकीन् जान के, तुझे इसी बादशाही तक्तके सहामने कत्ल करके, तेरे गोष्तको जानवरोंका खुराक् न करूं, तो हमारा नाम औरंगजेबहि नहीं.

[आतां तुम्ही अगदीं गाफिल नका राहूं. ही लबाडी कशी झाली याचा नीट तपास करा. जो दोषी ठरेल त्याला धगधगीत अग्नींत जाळून नरकाची वाट दाखवा. आणखी त्या ठगाला पकडण्यासाठीं हरएक प्रयत्न करण्यांत अगदीं कसूर करूं नका. हे ईश्वरा! हे अधमा शिवाजी, जर तूं आतां परत आमच्या हातीं लागलास, तर खात्री ठेव कीं, या राज्यासनापुढें तुझी कत्तल करून, तुझें मांस जनावरांना खायाला न घालीन, तर मी औ-रंगजेबच नाहीं.]

**सर्व**–खुदाके फजलसे किबूलेआलम्का इक्बाल् बढे और उसूके नसीब्में यूंही होगा.

[ईश्वराच्या कृपेनें विश्वाधीशांचा प्रताप वाढेल व त्याच्या कपाळीं हेंच येईल.]

**छडिदार**–दरबार बरखास्त. (जातात.)

**पांचवा अंक समाप्त.**

[illegible] निमगी [illegible]

# अंक ६ वा.

## प्रवेश १ ला.

### स्थल–गोंडवन व भागानगर प्रांतांतील एक मार्ग.

**शिवाजी**–निराजी, हा मोंगलांचा जुलूम बघून चौताळलेल्या सिंहासारखें माझें मन खवळून गेलें आहे! पण काय करावें? उपाय नाहीं. सध्यां कांहींच करतां येत नाहीं. (मिशांस पीळ देऊन) असो! निराजी, त्या मुर्शिदावादच्या व तशाच दुसऱ्या जीवावरच्या भयंकर प्रसंगांतून आपण होतों ह्मणून पार पडलों. तुह्मी पण काल खूप गाजविलीत! त्या वेषधारी संन्याशाला जर तुह्मी कंठस्नान घातलें नसतें, तर त्या मैंदानें आपल्याला खचित कैद केलें असतें!

**निराजी**–महाराज, अशा ठगाला हीच शिक्षा योग्य होती. वेषांतर करून आडवाटेनें जरी आपण जात आहोंत, तरी देखील त्या अविंधाचे हेर, निरनिराळे वेष बदलून, जागजागीं आपणाला गांठीतच आहेत! औरंगजेब मोठा धूर्त खचित! असो; महाराजांनीं धाकट्या महाराजांना मथुरेस ठेवलें, हें उत्तम केलें. गया, श्रीक्षेत्र काशी वगैरे क्षेत्रीं तर आपणाला फारच भीति होती! पण, श्रीविश्वेश्वराच्या दयेनें आलेले सर्व प्रसंग विनधोक पार पडले. अनायासें तीर्थयात्रा पण घडल्या. तरी पण, स्वदेशीं जाऊन पोंचेपर्यंत, काय काय विघ्नें येतील, तें सांगतां येत नाहीं!

**शिवाजी**–येऊं देत आलीं तर. त्या नजरकैदेंतून सुटेपर्यंतच काय ती मला त्याची भीति वाटत होती. आतां मी अगदीं निर्भय आहें.

प्रत्यक्ष काळ जरी माझ्या समोर येऊन उभा राहिला, तरी सुद्धां मी त्याला भ्यायाचा नाहीं. मग त्या मोंगलाची ती काय विशाद,? हा वेळपर्यंत गुदरलेले लहान मोठे प्रसंग जसे नेटानें व शिताफीनें पार पाडले, तसेच पुढचेही पार पाडूं. (आवेशानें) यापुढें हा शिवाजी, मरेपर्यंत लढेल, 'पण त्या तुर्कीचा तावेदार' असें कधींही ह्मणून घेणार नाहीं. अंबाबाईच्या कृपेनें मला माझ्या मुलखांत मात्र विनधोक जाऊन पोंचूं द्या. मग दाखवितों त्या तुर्काला हा शिवाजी कसा बाणेदार आहे तो? देशभर मांडलेल्या बेहद्द जुलमाचा त्याला सव्याज मोबदला देईन, तरच मी खरा मऱ्हाठा. [ इतक्यांत आंतून. ]

**आंतून**–सच् कह, तू कौन है? नहीं तो अबी तेरे मूह्में गायका गोषत् डालूंगा.

[ खरें सांग, तूं कोण आहेस ? नाहीं तर, आतां तुझ्या तोंडांत गोमांस कोंबतों. ]

**शिवाजी**–( ऐकून ) निराजी, बाबाजी, रघोजी; ऐकलेंत? आणखी हें काय अरिष्ट? ( आंत निरखून पाहून ) अरेरे! काय करावें? या क्रूर मोंगलांनीं आमच्या लोकांवर बेहद्द जुलूम मांडला आहे! (पुनः पाहून ) खचित–त्या औरंगजेबाचेच हे हेर!

**निराजी**–( पाहून ) हो खरेंच! महाराज, त्या गरिबाला घेऊन ते क्रूर लांडगे येथेंच येत आहेत! अमळ या बाजूच्या झाडींत दबा धरून बसावें. वेळ आहे! न जाणो; कदाचित् त्यांचा जमाव अधिक असला तर–

**शिवाजी**–तेंही खरें. पण कसेंही करून त्यांच्या हातून त्या गरिबाला सोडविलेंच पाहिजे. नाहीं तर ते दुष्ट लांडगे, त्या बापड्याला छळून छळून मारतील किंवा बाटवितील! (सर्व बाजूच्या झाडींत लपतात; इतक्यांत औरंगजेबाचे दोन हेर त्या ब्राह्मणास धरून घेऊन येतात.)

**भीमसेन शर्मा**—अजी भाई! मैं तो एक गरीब बह्मन हूं. मैं का खबर शिवाजी कौन है? मैं तो घरसे रामेसरकी जात्रा करनेके वास्ते जाताहूं. मैंको बेगुन्हा बीचमें पकड्कर काहाको सतावत हों? अरे भाई, भगवानके वास्तेभी दया करो!

[अरे बावांनो! मी एक गरीब ब्राम्हण आहें. मला काय माहीत शिवाजी कोण आहे तो? घरून मी रामेश्वरच्या यात्रेस जात आहें, मध्येंच मला निरापराध्याला पकडून कां छळतां? अरे बावांनो, ईश्वराकडे पाहून तरी मजवर दया करा!]

**अहमद्खां**—देख, झूंट मत् बोल. जल्द कह दे शेवाजी कहां है? नहीं तो, यह गोषत् तेरे मुहमें ड़ालूंगा और झट् मुसलमीन करूंगा. (गोमांस त्याच्या तोंडाजवळ नेतो.)

[पहा, खोटें बोलूं नको. लौकर सांग, शिवाजी कोठें आहे तो? नाहीं तर, हें मांस तुझ्या तोंडांत घालून तुला झट् मुसलमान करीन.]

**भीमसे०**—(तोंड फिरवितो व) हाय हाय!

॥ **पद** ॥ राग कालिंगडा.

**छुड़ावेगा कौन मुझे। सितमृगारोंसे ॥ ध्रु० ॥**
**मारपीट सक्ति करत। मूहकेपास गोषत् धरत।**
**करूं मुसलमीन कहत। जबरदस्तीसे ॥ छुडा० ॥ १ ॥**

[हाय हाय! मला या जुलुमगारांपासून कोण सोडवील? मारहाण व बलात्कार करतात! तोंडापाशीं गोमांस धरतात! जुलमानें तुला मुसलमान करूं म्हणून म्हणतात!!]

**अलिमर्दीखां**—तूं शेवाजीका पता कहदे. हम् तुझे अबी छोड़ते हैं.

[तूं शिवाजीचा पत्ता सांग. आम्हीं तुला आतां सोडतों.]

**भीमसेन**—अरे भाई! गंगामाईकी दुहाई. मैंतो शिवाजीको बिलकुल नहीं जानता. गोमाताकी दुहाई, मैंने उसिको अभितक चिन्हाभी नहीं.

[अरे बाबांनो, गंगामाईची शपथ. मुळींच मी शिवाजीला ओळखीत नाहीं. गोमातेची शपथ, मी त्याला अझूनपर्यंत पाहिला नाहीं.]

**अहम०**–(रागानें) ऐ नापाक, जाहन्नमें गई तेरी गोमाता और गंगामाई, हमारे रूबरू उन् नापाकोंका नाम मत् लो. फेरसे वे नाम लेगे, तो मुहमेंसे जबान् खेंचके झट् काटूंगा. भाई अलिमर्दीखां, अब् देर लगानेमें कुछ् हांसल नहीं. इस् नापाककी फौरन् कत्ल करना या झट् मुसलमीन बनानाही लाज़िम् है.

[हे अधमा; नरकांत गेली ती तुझी गोमाता व गंगामाई. पुनः तीं नांवें उचारशील,तर तोंडांतून जीभ खेंचून झट् छाटीन. बंधु अलिमर्दीखां, आतां उशीर लावून कांहीं अर्थ नाहीं. या अधमाची झट् कत्तल करावी किंवा लागलीच मुसलमान बनविणेंच योग्य आहे.]

**भीमसे०**–शोक–शोक–महा शोक ! हे भगवान्, अब् मैं का करी?

**॥ पद ॥ (गज्जल.)**

**पडा हूं इस् आफत्में । मुझको कौन छुडावेगा ॥**
**तूहि रक्षक प्रभो अब् हो ! तुझबिन् कौन बचावेगा ॥ ध्रु० ॥**
**अबतक् नहीं किया मैंने । सपन्में भी गुन्हा किसिका ॥**
**जुल्म है सक्त गनिमोंका ! तुझबिन् कौन बचावेगा ॥ पडा० ॥२॥**

[शोक–शोक–महाशोक ! हे भगवान्, आतां मी काय करूं ? मी या संकटांत पडलों आहें ! मला कोण सोडवील ? देवा, आतां तूंच माझा रक्षण करणारा आहेस ! तुझ्याशिवाय मला कोण वांचवील ? स्वप्नांत देखील मीं हा वेळपर्यंत कोणाचा अपराध केलेला नाहीं ! शत्रूंचा हा मजवर मोठा जुलूम आहे ! तेव्हां; देवा ! तुझ्याशिवाय यांतून आतां मला कोण सोडवील ?]

**जमाल०**–ऐ काफीर, तेरी मौत नजदीक आई. तुझे खुदाभी नहीं बचावेगा, वैसा तूं बुतपुरस्त नापक है.

[हे नीचा, तुझें मरण जवळ आलें. ईश्वरही तुला बचावणार नाहीं, असा तूं मूर्तिपूजक अपवित्र आहेस.]

**भीमसेन**–हाय हाय ! (दुःखानें जमिनीवर पडतो.) महाशोक है भारतपे ! !

॥ **पद** ॥ ('नदियाकिनारे कान्होबा' ही चाल.)

**भारतमें कोइ न वीर । अरिहंता रणधीर ॥ ध्रु० ॥**
**रविशशिवंशज क्षत्रिय सबही । कैसे भये हत्वीर ? ॥ भार० ॥**
**गोब्रह्मनकी कत्ल देख सुन । भये अंध बधीर ? ॥ भार० ॥**

[हाय हाय ! महाशोक आहे भारतवर्षावर ! ! या भरतखंडांत शत्रूचा संहार करणारा रणधीर असा कोणीच योद्धा नाहीं ! सूर्यवंशी सोमवंशी क्षत्रिय, सारेच कसे शौर्यहीन झाले? गाईब्राह्मणांचा वध ऐकून व पाहून ते बहिरे व आंधळे झाले ? ]

**अहमद्खां**–ऐ नापाक, ग़ाजी औरंगजेब बादशाहाके जाहोजलालके आगे इस् हिंद्के कुल् ग़ाजी मुखन्नस् होगये हैं. वे क्या करनेवाले हैं ? खैर. देख, अभी तुझको मुसलमीन करताहूं [असें ह्मणून गोमांस त्याच्या तोंडाजवळ नेतो; ब्राह्मण दोनी हातांनीं आपलें तोंड गच्च दाबून धरितो इतक्यांत–]

[हे अधमा, पराक्रमी औरंगजेब बादशाहाच्या प्रतापापुढें या हिंदुस्थानांतील सर्व योद्धे केवळ पंढ झाले आहेत. ते काय करणार आहेत ? असो; पहा, तुला मी आतां मुसलमान करतों. ]

**शिवाजी**–(आपल्या माणसांसुद्धां एकदम त्यांच्यावर तुटून पडतो व त्यांस जमिनीवर पालथे पाडून त्यांच्या उरांवर बसून ) सुव्वरों, यह क्या जुल्म करते हो ?

[डुकरांनो ? हा काय जुलूम करीत अहां ? ]

**अहम०**–(पडलेला असतां) तोबा ! या इलाही ! इत्नेमें यह क्या गजब् हुआ ?

[अरेरे ! हे ईश्वरा ! इतक्यांत हा काय अनर्थ झाला ?]

**शिवाजी**–(खंजीर त्याच्या उरावर ठेवून) सुव्वर, देख, इस् हिंद्के

कुल् गांजी, मुखन्नस होगये हैं या ग़ाजी हैं! बुला ला अबी तेरे गाजी औरंगजेव बादशहाको. यह शेवाजी तुझे जाहन्नमें भेजताहै. (उरांत खंजीर खुपसून त्याला मारतो व) निराजी, काय बघतां? खुपसा गुलामांच्या उरांत खंजीर. (निराजी तसें करतो व) ऐ पाक बह्मन् अब् तुम् मत् ड़रो. वेफिकर हो.

[डुकरा, बघ, हिंदुस्थानांतील सर्व योद्धे हिजडे झाले आहेत किंवा शूर आहे तें! बोलीव आतां तुझ्या शूर औरंगजेबाला. हा शिवाजी तुला यमपुरींत पाठवीत आहे,—हे पवित्र ब्राह्मणा! आतां आपण भिऊं नका. निर्भय व्हा.]

**भीमसे०**–(सहर्ष) ऐ मेरे प्राणदाता! भगवान् आपका सदा जयही करे.

[हे माझे प्राणदाता! भगवान् आपला सदा जयच करो.]

**शिवाजी**–(विनयानें) बंदा यही चहाता है.

[सेवक हेंच इच्छितो.]

**भीमसे०**–भाई, आपही शिवाजी हो?

[बंधु, आपणच शिवाजी आहां काय?]

**शिवाजी**–हां महाराज.

**भीमसे०**–तव तो–

॥ पद ॥

बढो यश नित अपना भाई। रक्खे सुखी आप्को गंगामाई॥
हरो दुःख रामके न्याई॥ बढो॥ ध्रु०॥
भये अरि प्रबल अत्याचारी। करत है जुल्म वे जारी॥
करो उनसे मुक्त भूमाई॥ रक्खे सुखी०॥

[तर मग, हे बंधु, सर्वदा आपल्या यशाची वृद्धि होवो; गांगामाता आपणाला सुखी ठेवो. रामचंद्रासारखें आपण दुःखाचें हरण करावें. कारण, अत्याचार करणारे शत्रु फार प्रबल झाले आहेत. ते फार जुलूम करीत आहेत. त्यांपासून आपण आपल्या मातृभूमीची सुटका करा.]

**शिवाजी**-(त्याच्या पायां पडतो, इतक्यांत हिरोजी येतो. त्यास पाहून व ओळखून) कोण-हिरोजी?

**हिरोजी**-(लवून) जी, सरकार.

**शिवाजी**-अरे! अचूक तूं इथेंच कसा आलास?

**हिरोजी**-अंबाबाईच्या किरपेनच महाराज आपली-अवचित भ्यट झाली वगा!

**शिवाजी**-ठीक झालें! तूं तेथून गुपचुप कसा पार पडशील, हीच आह्मांला मोठी काळजी लागली होती! हिरोजी, रस्त्यांत बघितलाच असशील तूं आपल्या लोकांवर चाललेला मोंगलांचा जुलूम?

**हिरोजी**-महाराज, त्ये पुसूच नगा! त्येंसनी कुनाच भ्याच न्हाई वगा! अक्शी देसभर धुंद मांडलिया..समद लोक इकृत व्याजार झाल्याती कि, हिंग 'ही मोगलाई कव्वा जाईल' अस्स जो त्यो म्हनतुया.

**शिवाजी**-अंबाबाई करील तर लौकरच तसें होईल. बरें पण कायरे हिरोजी, आपला हैवती कुठें आहे?

**हिरोजी**-नुक्तीच वाटमंदीं मोगलांच्या धारकऱ्यासंग आमचा सामना झाला! सरकार, त्यांसंग आमची लई-लई बानिची चकमक झडली वगा! त्यामंदीं आपला सूर हैवती पडला!! मी वी मरनार-पुन सरकारच्या पायाच्या परतापान जगलो. ह्या सामन्यामंदीं नोड लई मारले. पुन अक्शी जायबंदी झालो वगा! (आंगावर पडलेले घाव दाखवितो.)

**शिवाजी**-(पाहून) अरेरे! केवढे हे घाव तरी? शाबास तुझी हिरोजी! तूंच हे सहन केलेस. पण शेवटीं आपला शूर हैवती पडला अँ? फार वाईट झालें! असो! अंबाबाईची मर्जी! बरें पण हिरोजी,

आह्मीं तिथून निघून आल्यावर, तूं तिथून कसा फरारी झालास, तें सांग वघूं अगोदर.

**हिरोजी**—महाराज तकुंड निघाल्यावर, आपल्या हुकमापरमान मी त्या पलंगावर निजलो. आंगावर आपला शेलावी पांघुरला, अन् हैवतीसनी सांगुनशी ठेवल कि हिंग कुनिवी पुसल, तर त्यासनी सांग कि, "महारांजाच डोक्स आज लई दुखतया. अक्शी ब्याजार हा-यती." त्या मर्दान जेलातेला असच सागुनशन लावल वाटला. कास-राभर दिस ऱ्हायला. अन् गस्तवालवी निमाज पडायच्या गडबडीमंदीं गुतलेल वगून, झट पलंगावरन उठलो. खोलीच कवाड गच्च लावूनशी घेतल, अन संग हैवतीसनी घेऊनशी तसाच निघालो वगा! चा-वडीवर गस्तवाल्यान मातुर 'किदर जाते हैं' ह्मून पुसल. तव्वा "हकी-माकुंड दवा आनायाला जातुया. आज आमच्या महाराजाच डोक्स लई दुखतया. एकटच पलंगावर पडुनशी हायती." अशी वतावनी केली. तेवी "आच्छा हाए; जाओ" ह्मंनले. आह्मीवी त्येंच्या डोळ्या-आड व्हाताच—विगीविगी वेदम चालुनशन—चार कोस दिल्ली स्वा-डुनशी आड रानामंदीं गेलो. आपल्यागत फकीर बनलो अन तसच अडवाटन निघालो. जत तत आपला लई तपास केला. मोगलाच धारकरी आपल्या लोकावर लई चेवल्याती. कोंबड्याव-कऱ्यावानी त्ये आपल्या लोकांची डोक्सी तोतोडून—हिंग रानोमाळ फेकल्याती! शेकडो लोक, वळ धधरून. धडाड मुसलमान करल्याती! त्येंसनी कुनाच भ्याच न्हाई! ह्यो मोगलाचा जुलूम वगून—खर पुसाल त—सरकार, कोंडलेल्या वागावानी माझी गत झालिया. पुन का कराव? वसलुया दात व्होट चावुनशी गप. ऱ्हाउद्या त्ये समद. अंबाबाईच्या कि-रपेन महाराजाची अवचित भ्याट झाली, ह्य समयापक्षी ग्वाड झाल वगा!

**शिवाजी**–शाबास हिरोजी! खूप शिताफी दाखविलीस. असो. हैवतीशिवाय आपण सर्व अनेक भयंकर संकटांतून पार पडून अजून जगलों आहोंत. पुढें अंबाबाईची मर्जी. बरें, चला तर मग आतां असेच आडवाटेनें. अझून गनिमाच्या तडाक्यांतून आपण साफ नाहींत सुटलों. (भीमसेनास) महाराज, अप्‌भी चलो हमारेसाथ.

**भीमसे०**–अच्छा.

**निराजीवगैर**–चलावें महाराज. (जातात. इतक्यांत मोंगल हेरांची एक टोळी येते.)

**नाईक**–यार क्या करें? तालाश वहोत् करतें हैं, लेकिन् उस् शैतान्‌का बिल्कूल् पताही नहीं लगता!

[काय करावें? शोध तर पुष्कळ करीत आहों, पण त्या भुताचा मुळीं पताच नाहीं लागत!]

**ए. शिपाई**–वेषक्, जनाब्, वो बडा तेजरो है. तोभी कहांतक् वो ऐसा छूप्‌के बैठेगा?

[खरोखर, महाराज, तो मोठा तेजस्वी आहे. पण किती दिवस तो असा लपून राहील?]

**नाईक**–खैर. तो बनेतक् उस्‌का तालाशही करना. शायद् इस् भागानगरमें वो होगा. चलो. कूच कीजिये.

[असो. बनतांबनेपर्यंत त्याचा तपास करायचा. कदाचित् या भागानगरींत तो असेल. चला, चालूंलागा.]

**सर्व शिपाई**–वहोत् खूब्. [जातात.]

---

## प्रवेश २ रा.

### स्थल–भागानर. एक लहानशी पाठशाला.

[विष्णुशर्मा पंडित आपल्या विद्यार्थ्यांस पाठ सांगत बसला आहे. कांहीं विद्यार्थी दिलेले धडे पाठ करीत आहेत इतक्यांत—]

आंतून—मौलालीकी यारो दीन्.

[ अली पेगंबराच्या धर्माचा जय. ]

**विष्णुशर्मा**—( ऐकून सभय ) हें काय अरिष्ट एकाएकीं ? ( आंत पाहून ) अरे ! हे अविंध ! ! इथेंच येत आहेत ! आतां मात्र धडगत दिसत नाहीं. ( पुनः पाहून ) बापरे ! अगदीं जवळ येऊन ठेपले ! ! भरलीं आतां आमचीं शंभर वर्षे !

**मोंगल शिपाई**—( प्रवेश करून ) या अलिमदत्. पकडो—पकडो—करो काफिरोंकी सुन्ता. ( पाठशाळेंत शिरतात. )

[ पेगंबर अली मदत करो. पकडा—पकडा— करा अधर्मांच्या सुन्ता. ]

**विष्णुशर्मा व सर्व विद्यार्थी** ( भयाभीत होऊन सैरावैरा पळतात. )

हाय—हाय ! अधर्म—अधर्म—अनर्थ—जुलूम—जुलूम—( विष्णुशर्मा व कांहीं मुलें पळून जातात. कांहीं मुलें मोंगलांच्या हातीं लागतात, ते त्यांस मारतात, बाटवितात; मोठा कहर उसळतो. )

**नाईक**—हं, घूसो अंदर. बनाओ झट् मुसलमीन. करो ऐशीहि काफिरोंकी कत्ल.

[ हं ! शिरा आंत. बनवा झट् मुसलमान. करा अशीच नीचांची कत्तल. ]

**कांहीं शिपाई**—बोलो दीन् ! ( शाळेच्या आंतील भागांत शिरतात व आंत लपून बसलेल्या मुलांची कत्तल व सुन्ता करतात. )

**आंतून**—हाय हाय ! नका—नका—बाटवूं ! आह्मीं तुमच्या पायां पडतों. अरेरे ! ओय—ओय—मेलों मेलों. अधर्म—अधर्म—जुलूम—जुलूम—थूं—थूं—थूं—नका हें गोमांस आमच्या तोंडांत कोंबूं ! ( अशा हृदयद्रावक आरोळ्या होतात. )

**कांहीं शिपाई**—( आंतून बाहेर येतात. ) खूब् दीन् मचाया.

[ धर्म खूप गाजविला. ]

**नाईक**—मुद्दरीस नहीं मिला ? क्या वो भाग गया ? कुछ फिकर नहीं, जाने दो. हं, क्या देखते हो ? लगाओ अब् इस् मदरसाको आग.

[ गुरुजी नाहीं मिळाला ? काय तो पळून गेला ? चिंता नाहीं. जाऊं द्या. हं काय पहातां ? लावा आग आतां या शाळेला. ]

( सर्व शिपाई तसें करतात. )

**नाईक**—अच्छा किया. थोडेहि वक्तमें सब् खाक् हो जायगा ! चलो अब् दुसरी तरफ.

[ चांगलें केलें. थोड्याच वेळांत सर्व खाक होईल ! चला आतां दुसरीकडे. ]

**स० शि०**—जी हां; चालिये. मौलालीकी यारो दीन्.

[ जी होय, चलावें. अलीपेगंबराच्या धर्माचा जय. ] ( जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

### स्थल—भागानगराजवळचें एक रान.

**विष्णुशर्मा**—( दुःखानें ) अरेरे ! कोण हा अनर्थ ! देवा—

॥ **पद** ॥ ( 'मजला वरिल सुभद्रा काय' ही चाल )

ऐशा पीडित दीनाला । रक्षिल कोण आतां ? ॥ ध्रु० ॥
यवनरूपी हे शंखासूर । निर्भय छळिती अति निष्ठूर ॥
कोठें लपले क्षत्रिय वीर । राजे शूर भगवंता ! ॥ ऐशा० ॥
स्वदेश रक्षाया निजप्राण । अर्पित होते आर्य सुजाण ॥
परि तत्पुत्रीं नुरलें त्राण । झाले दीन-भगवंता ! ॥ ऐशा० ॥

**शिवाजी**—( साथीदारांसह हें आडून ऐकतो व ) अहा ! हें मी काय ऐकतों आहें ?

**विष्णु०**—( दुःखाचा सुस्कारा टाकून ) परमेश्वरा ! आतां कसें होईल ?

॥ श्लोक ॥

धर्मांचे बहु ग्रंथ इंधन तसे बौद्धादिकीं जाळिले ॥
तेव्हांही मुखपाठ त्यांस करुनी ज्या ब्राह्मणीं रक्षिलें ॥
त्यांतें गांजिति धर्मभ्रष्ट करिती जीवें अहा! मारिती ॥
हे म्लेच्छाधम ह्यांस दंडिल असा कोणी नसे भूपती! ॥

**शिवाजी**–( ऐकून ) निराजी, ऐकलेस हे उद्गार?

**निराजी**–होय, ऐकले. सध्यां तसेंच झालें आहे!

**शिवाजी**–( मिशांस पीळ देऊन ) चिंता नाहीं. जाऊं द्या मला एकदा आपल्या मुलखांत–

**विष्णु०**–( कळवळ्यानें ) खरोखर, आतां आमचें काय राहिलें आहे? शिव शिव!!

॥ **पद** ॥ ( 'जन्मुनी रविवंशीं ऐसा' ही चाल. )

देश हा अविंधमय झाला! नाहीं पार अनर्थाला!! ॥ ध्रु० ॥
मिळतां हिंदु बळें धरिती। यवन त्यां धर्मभ्रष्ट करिती ॥
निर्भय देवालयीं शिरती। धेनु मूर्तिवरी वधिती ॥
करुनी छिन्नभिन्न मूर्ति। जाळिती देवस्थान अंतीं ॥
शास्ता नच कोणीं त्यांला। नाहीं० ॥

**शिवाजी**–( ऐकून त्वेषानें ) शास्ता नाहीं?

**विष्णु०**–अहा! देवा! तूं तरी कसा आमच्यावर इतका निष्ठुर झालास? गोब्राह्मणांसाठीं व स्वधर्मासाठीं जीवापाड झटणारा एक महावीर आमच्यांत निर्माण झाला होता; पण तोही शेवटीं त्वां अविंधांच्या ताब्यांत द्यावासना?

**शिवाजी**–( आश्चर्यानें ) हा कोण असेल बरें?

**विष्णु०**– हरहर!

॥ पद ॥

झाला कसा यवनाधीन । राय शिवाजी ॥
गोब्राह्मणप्रतिपालक । देशभक्त गाजी ॥ ध्रु० ॥
दैन्य, पारतंत्र्य हरुनी । सोडविता क्लेशांतुनी ।
होती अशी आस मनीं । विपरित परि येइ घडुनी ।
निज हेतु सफल करुनी । घेती यवन पाजी ॥ झाला० ॥

**शिवाजी**—अहो पण, हा काय चमत्कार? जन्मांतही ह्याची माझी ओळख नाहीं! पण, माझ्यासाठीं हा किती हळहळत आहे? स्वदेशाचा व स्वधर्मांचा कळवळा असाच आहे! सगळ्या हिंदूंना जर अशी कळकळ असती, तर किती उत्तम झालें असतें? असो!! निराजी, खरें ह्मणशील तर मला असें कांहीं झालें आहे कीं, झट् जाऊन कडकडीत भेटावें ह्याला!

**निराजी**—खरें आहे. महाराज तो तसाच आहे.

**विष्णु०**—असो! पुरे हें आतां अरण्यरुदन. यानें आतां काय होणार? सर्वस्वी नाश तर झालाच आहे! (अंमळ विचार करून) आतां घोर अरण्यवासच वरा. तेथें जाऊन, स्वदेशभक्त व स्वधर्मरक्षक अशा महावीराचा उदय व्हावा ह्मणून, एकनिष्ठपणें नारायणाची आराधना तरी करीत बसावें. दुसरा उपायच राहिला नाहीं! (जाऊं लागतो.)

**शिवाजी**—(मोठ्या प्रेमानें जाऊन त्याला साष्टांगदंडवत घालतो) महाराज, तोच हा आपला सेवक शिवाजी.

**विष्णु०**—(त्याचा फकिरी वेष पाहून) कोण—तूं शिवाजी?

**शिवाजी**—(विनयानें) होय. अंबाबाईची शपथ, तोच मी.

**विष्णु०**—(अत्यंत दुःखानें) अरेरे! तर मग फारच वाईट झालें!

**शिवाजी**–तें कसें महाराज ?

**विष्णु०**–( दुःखानें ) आणखी कसें ?

॥ पद ॥

देश यवनांपासोनि सोडवायारे ।
शौर्य अंगीं तव पूर्ण असुनि रायारे ॥
अहा ! ऐसा तूं फकिर होउनीयांरे ॥
दुःखडोहीं बुडविसि स्वदेशा या रे ॥ देश० ॥

हरहर !

॥ पद ॥ ( 'शशिकुलभूषण' ही चाल )

कसे हे दिवस कठिण आले । अहा ! हें काय नृपा केलें ? ॥ ध्रु० ॥
प्राणाहुनि जी प्रिय होती । तुजला जन्मभूमि, मग ती ॥
देउनि यवनांच्या हातीं । होसी निंद्य कसा जगतीं ? ॥
॥ चाल ॥ परवशतेच्या प्रलयाग्नींतचि भूमाते ! तुज लोटियलें ।
सारें अविंधमय झालें !! कसे० ॥

**शिवाजी**–( आवेशानें ) महाराज, औरंगजेवाच्या हेरांनीं मला ओळखूं नये ह्मणून मीं हें वेषांतर केलें आहे. श्रीअंबाबाईची शपथ, व आपले पाय साक्ष; हा सूर्य, पश्चिमेस उगवेल किंवा हे पर्वतही आपली मर्यादा सोडतील, पण ह्या दुष्ट अविंधांच्या जुलमांतून आपला देश व आपला धर्म सोडविण्यासाठीं झालेला माझा दृढ संकल्प, कधींही फिरणार नाहीं. माझा देश मला जितका प्रिय आहे, तितका माझा जीवही मला प्रिय नाहीं. देशाच्या रक्षणासाठीं हा देह मीं समरभूमीला अर्पण केला आहे. आतां ह्यावर माझी मुळींच सत्ता नाहीं. आई व जन्मभूमि हीं मला मुळींच भिन्न नाहींत. ज्या पंचमहाभूतांचा हा पिंड बनला आहे, त्यांत माझ्या भूमातेचाच अधिक अंश

आहे. ह्या शरीरावर तिची पूर्ण सत्ता आहे. अहाहा! माझी पवित्र जन्मभूमि! किती मायाळू आहे? हा देह जळून राख जरी झाला, तरी ती ह्याला सोडीत नाहीं. आपल्या विशाळ पोटांत ती मोठ्या ममतेनें ठेविते! अशा माझ्या भूमातेला—दुष्ट क्रूर-अधम-कपटी-जुलमी मोंगलांच्या त्रासांतून सोडविणें हें माझें मुख्य कर्तव्य आहे. त्या हरामखोरांनीं देशभर मांडलेला बेहद्दजुलूम बघून, खवळलेल्या महासागरासारखी माझ्या मनाची स्थिति झाली आहे. आवेश-ईर्षा-अभिमान व त्वेष—ह्यांचा माझ्या उरांत एकसारखा कल्होळ चालला आहे! माझी जन्मभूमि स्वतंत्र, सुखी व निर्भय करण्यासाठीं माझ्या उरांत रक्ताचा एक थेंब उरेपर्यंत मी तुर्कांशीं निकरानें लढेन. रणमैदान त्यांच्या रक्तमांसांनीं भरून टाकीन. त्यांच्या रक्ताच्या नद्या वाहवीन. भर रणांत त्यांना आपलें खरें शौर्य दाखवीन. जयघोषाच्या गंभीर ध्वनीनें आकाश पाताळ एक करून, सारें रणमैदान दणाणून सोडीन. त्यांच्याशीं लढतां लढतां माझा शिरच्छेद जरी झाला, ह्या शरीराचे राई राई इतके तुकडे जरी झाले, तरी चिंता नाहीं; तेंच माझें समाधान, तोच माझा मोक्ष व तोच माझा विजय. महाराज, ह्या माझ्या निश्चयांत व कर्तव्यांत केसाइतका फरक झाल्यास, प्रचंड विद्युत्पात-किंवा प्रळयाग्नि मला जाळून भस्म करो! महाव्याधीसारख्या भयंकर रोगानें हें माझें शरीर सडून जावो. ह्या देहांत बोटबोट किडे पडोत! शिलापात किंवा वज्रघात होऊन, ह्या शरीराचा साफ चुराडा चुराडा होवो! मरणोत्तर घोरतम नरकवास घडो! गोहत्या-स्त्रीहत्या-बालहत्यादि महत् पातकें-माझ्या मस्तकीं पडोत!! आणखी, आपल्या जन्मभूमीची ही विटंबना व धर्माचा हा छळ बघून, ज्या हिंदूच्या देहांत वीरश्रीचा संचार होत नसेल, तो केवळ षंढ, मातृद्रोही व महा

कृतघ्न आहे. अखंड रौरवनरकाचा तो भागीदार असून- धिक्कार-धिक्कार-अनंत धिक्कार असोत त्या महा नीचाला.

**विष्णु०**–( सहर्ष ) वाहवा ! धन्य आहांत महाराज आपण ! ! मी आतां आपलें सर्व दुःख विसरलों ! खरोखर–

॥ **पद** ॥ ( ' शृंगाताडोनी ' ही चाल. )

**निश्चय हा आपुला करिल दूर सकल विपत्तीला । नृपाला ॥**
**ऐकुनी आपुली भीष्मप्रतीज्ञा संशय नच उरला । नृपाला ॥**
**भगीरथापरी महत् यत्न हा जाइल सिद्धीला । नृपाला ॥**
**खल यवनाचा नाश कराया जणुं शिव अवतरला । खचितची ॥**

**शिवाजी**–( नमून ) महाराज, केलेला निश्चय शेवटास जाईपर्यंत हा सेवक, या स्तुतीला मुळींच लायक नाहीं.

**विष्णु०**–महाराज, असें काय ह्मणतां ? सागरास जाऊन मिळणाऱ्या महानदीचा प्रवाह किंवा मध्यान्हावर येणाऱ्या देदीप्यमान सूर्यनारायणाची गति, जशी मागें फिरत नाहीं; तसा ह्या आपल्या प्रतिज्ञेचा प्रचंड वेग, मागें नाहींच फिरायचा. कारण कीं तो स्वाभाविक आहे.

**शिवाजी**–आपण भूदेवच आहांत; तेव्हां, आपली वाणी असत्य कशी होईल ? असो. बरें पण महाराज, आपलें नांव, गांव व मोंगलांनीं आपल्याला काय काय त्रास दिला, हें सर्व कृपा करून सांगाल, तर या दासावर आपले महत् उपकार होतील.

**विष्णु०**–उपकार कशाचे ? महाराज, मी एक वैदिक अध्यापक आहें. मला विष्णुशर्मा ह्मणतात. भागानगरांत माझी एक लहानशी पाठशाळा होती ! पण, हायहाय ! ती त्या दुष्ट अविंधांनीं जाळून खाक केली ! जीवापाड जपून ठेवलेल्या उत्तम उत्तम ग्रंथांची तर त्यांनीं

साफ राखरांगोळी केली ! बऱ्याच विद्यार्थ्यांचा त्या राक्षसांनीं निर्दय-पणें वध केला ! कैकांच्या मुखांत गोमांस घालून, शिखासूत्रें तोडून, जुलमानें सुनता केल्या ! राजा, त्या महाभयंकर प्रसंगाचें स्मरण झालें ह्मणजे, माझा हृदयभंग होतो ! ! ईश्वराची कृपा, ह्मणूनच मी त्या महत् संकटांतून पार पडलों ! ( वर पाहून व हात जोडून )

॥ श्लोक ॥ ( हरणीवृत्त. )

बहुत बरवें होतें जाता रसातळीं देश हा ॥
परि न सहवे आतां ऐशी दशा विषमा महा ॥
यवनमयही झाली आहे अहा ! अवघी धरा ॥
तुजविण हिला त्राता कोणी नसे जगदीश्वरा ! ॥

**शिवाजी**–( अतिशय दुःखीत होतो ) अहा ! काय हें ( हातावर हात आपटून आवेशानें ) गुलाम सध्यां अगदीं निरंकुश झाले आहेत. ( इतक्यांत आंतून–'हाय हाय' देवा, आतां आमचें कोण रक्षण करील ? असे करुणोद्गार ऐकतो. ) अरेरे-मी कायमचा बहिरा असतों तर बरें होतें ! हे विलाप आतां मला नाहींत ऐकवत ! ( आवेशानें ) अहा ! काय करूं ? ( इतक्यांत मुलें येतात. )

**मुलें**– ( सभय ) हाय हाय !

॥ पद ॥

देवा ! आतां रक्षिल कोण आह्मांला ? ॥ ध्रु० ॥
यवनीं पीडित देश हा आमुचा । रक्षक कोणी न झाला । देवा० ॥
कीट पतंगाहुनी नीच मानुनी । छळिती हिंदु-प्रजेला ॥ देवा० ॥
मारहाण वध जिकडे तिकडे । हाहाःकार उडाला ॥ देवा० ॥

**विष्णु०**–अरेरे ! हा माझाच शिष्यवर्ग ! कोणही मुलांची दुर्दशा ?

मराठी ... ठाणे.

आविंधांच्या भयानें हीं अगदीं गर्भगलित झालीं आहेत. (पुढें येऊन) मुलांनो, भिऊं नका, भिऊं नका.

**मुलें**–[ गुरुजीस पाहून ) आपले गुरुजी ! ! ( पायांपडतात व ) शिवाजी वगैरेकडे पाहून भितात. )

**विष्णु०**–मुलांनो, भिऊं नका. हे आपले महावीर शिवाजी महाराज आहेत. आतां हे आपलें रक्षण करतील.

**शिवाजी**–अगदीं निर्भय व्हा. मुलांनो, यापुढें ते दुष्ट, तुमच्या वाऱ्यास सुद्धां उभे राहणार नाहींत असें करून टाकतों.

**मुलें**–(सहर्ष) अहाहा ! महाराज, आपला सदा जय असो.

**विष्णु०**–बरें पण मुलांनो, ती आपली सवत्स कपिला व माझी लाडकी अंबा, यांची काय वाट झाली असेल ती असो? (दुःखानें) बाळे!

॥ **पद** ॥ ( राग जोगी. )

सुशीला माझी अंबा नकळे यवनीं कीं धरिली ॥
किंवा तिजला दुष्टांनीं त्या असेल कीं वधिली ॥ ध्रु० ॥
अहा ! माझी चिमणी हरिणी कशि संकटीं पडली ॥
शोकाकुल मन कांहीं न सुचे गुंग मति जाहली ॥ सुशी० ॥

**मुलें०**–पण गुरुजी–

॥ **पद** ॥ ( कालिंगडा. )

अंबा आपुली यवनकरीं नसेल मिळली ॥ ध्रु० ॥
शत्रु निकट येतां बघुनी । कपिलेसह त्वरित तिथुनी ॥
न कळत ती जातां निघुनी । आम्हीं पाहिली ॥ अंबा ॥

तरी पण–

यवनभयें प्रिय भगिनी । नकळे गेली कवण स्थानीं ॥
वाटे तिला क्रूर पशुंनीं । असेल भक्षिली ॥ अंबा०॥

**विष्णु०**—हरहर! तर मग आतां माझी लाडकी मला कधीं भेटते?

**शिवाजी**—महाराज, कदाचित् ती ह्या रानांत कोठें तरी आड जागीं लपून वसली असेल. चला आपण तिला हुडकूं. अंबाबाई करील, तर ती पण ह्या मुलांसारखी सुखरूप आपणाला भेटेल.

**विष्णु०**—ठीक आहे. हाच आतां शेवटचा उपाय राहिला आहे!

(जातात.)

---

# प्रवेश ४ था.

## स्थल—अरण्य.

**अंबा**—(कपिलेसह एका झाडाखालीं विलाप करीत वसली आहे.) हाय हाय!

॥ **पद** ॥ ('प्रार्थितें मी' ही चाल.)

**देवा हे दीनसख्या भगवंता! काय करूं आतां?**
**तुजवांचुनी नसे कुणी त्राता! ॥ नसे० ॥**
**छळिताती दुष्ट यवन हे भारी महा अविचारी**
**केवळ जे सर्प विषारी! ॥ सर्प० ॥**
**आली विषम दशा कशि देशा? अहा जगदीशा!**
**नुरली लेश सुखाची आशा ॥ सुखाची० ॥**

अहा! भयानें, शोकानें व चिंतेनें माझें मन अगदीं करपून गेलें आहे! देवा! त्या राक्षसांनीं ती पाठशाळा जाळली तर नसेल ना? माझे बाबा, त्यांच्या हातीं लागले असतील का? त्या विद्यार्थ्यांची काय वाट झाली असेल? कोण हें भयंकर संकट? मी त्यांच्या हातीं लागलें नाहीं, तरी पण मला त्या मांगांचें भय वाटतें! देवा!

॥ पद ॥ ( 'आओ आओ' ही चाल. )

पडलें दुःखभरीं ! करूं काय तरी ? त्राहि त्राहि हे कृपानिधान, हे भगवान् ! ध्रु० ॥ करतिल भ्रष्ट अविंध मला, झालें दीन हरिणी समान ! हे भगवान् ॥ पड० ॥ लुटतिल खचितची ते माझी लाज, होति भयभीत माझे प्राण ! हे भगवान् ॥ पड० ॥

( इतक्यांत आंतून 'मौलालीकी यारो दीन्.' असा शब्द होतो.) ( ऐकून सभय ) अगवाई ! हे कोण ? ( उठते व आंत पाहून ) हं, समजलें ! तेंच हे ! अरे देवा–घात झाला ! ! आतां कसें होईल ? ज्या पापाला मी भीत होतें, तेंच शेंवटीं माझ्या पायांशीं ! आतां मी काय करूं ? मला कोण सोडवील ? क्रूर वनपशूंनीं मला कां नाहीं खाल्लें फाडून ? देवा ! ही विडंवना मी आतां कशी सोसूं ? ( पुनः पाहून ) अगवाई ! ते यमदूत इथेंच येत आहेत ! आतां मी कसें करूं ? कुठें दडून वसूं ? ( गाईच्या गळ्यास मिठी मारून )

॥ पद ॥ ( 'जाई परतोनी' ही चाल. )

रक्षिल कोण तुला ? कपिले ! रक्षि० । न दिसे कोणि हिंदु वीर इथें,
बाहुं कवणाला ? कपिले० ॥ ध्रु ॥
मातृपित्रसम महोपकारी, पोषी तव कुल सर्वांला ।
परि यवन हे व्याघ्रची बनले वधुनि भक्षितिल तुजला ।
देवा ! आतां धांव तूं तरी वधीं या दुष्ट अविंधांला ॥ कपिले० ॥

( पुनः आंतून–' या आलिमदत. दीन्–दीन्–बोलो दीन् ' ह्मणत आपल्याकडेच येत आहेत असें पाहून व निराश होऊन ) अरे देवा ! आले–ते इथेंच आले ! माते वसुंधरे, तूंच आतां माझी मायवहीण ! तूंच आतां–

॥ पद ॥ ('काळ सोकला' ही चाल.)

**उदरीं घे मला! वसुधे! उदरीं घे मला! शरण मी तुला! उद० ॥ध्रु०॥**
**या दुरंत यवन खलां। बघुनी शरिरीं कंप सुटला।**
**आले जवळ भेसुर अहा! घात जाहला!! वसुधे० ॥**

(असें ह्मणून मूर्च्छित पडते. कपिला बाजूच्या झाडींत जाऊन लपते. इतक्यांत कांहीं मोंगल शिपाई—'या आलिमदत' ह्मणत येतात.)

**एक शिपाई**—(मूर्च्छित पडलेली एक स्त्री पाहून) भाई मुरादखां, देखो तो! इस् जंगल्में काफिर हिंदूकी एक औरत वेहोष् होके पड़ी है!

[बंधु मुरादखां, पहा! या जंगलांत नीच हिंदूची एक स्त्री मूर्च्छित पडली आहे!]

**मुरादखां**—(पाहून) हां; यार, औरत तो निहायत् खवसूरत है! मैं खियाला करताहूं के, शायद् यह वहांसे भाग्कर तो नहीं यहां आई होगी?

[होय; गड्या, बायको तर फारच देखणी आहे! मला वाटतें कीं, कदाचित् ही तेथून पळून तर नसेल इथें आली?]

**फकीरमहंमदखां**—शायद् यूं भी हुआ होगा. फेर अब् क्या देखते हो; झट् करो कत्ल इस् शैतानके खालाको.

[कदाचित् असेंही असेल. मग आतां काय पहातां; झट् छाटा या पिशाचणीला.]

**इब्राहीमखां**—तह:मुल् करो. यार, मालूम् तो करने दो यह कौन् है?

[थांबा. गड्यांनो, तपास तरी करूं द्याल कीं नाहीं, ही कोण आहे त्याचा?]

**सर्व शिपा०**—अच्छा, करलो तालाश.

[ठीक, करा तपास.]

**इब्राहीमखां**—(तलवारीचें टोंक तिच्या आंगास लावून) ऐ औ-

रत ! जल्द वेदार हो, और झट् ऊठके अपना हवाल कहदे के, तू कौन् है ?

[ स्त्रिये ! जागी हो लौकर, व झट् उठून आपलें वर्तमान सांग कीं, तूं कोण आहेस ?]

**मुरादखां**–भाई, शायद् इस्का दम् तो नहीं निकल् गया होगा ? क्यौंके, यह तो बिलकुल् मुरदेकीसी नजर आती है ! वेहत्तर हिलावो तो सई पांवसे; जींदा है या मर गई.

[ बंधु, कदाचित् ही मेली तर नसेल ना ? कारण, निव्वळ प्रेतासारखी दिसत आहे ! वेहत्तर हलवा पाहूं पायानें; जीवंत आहे कीं मेली आहे. ]

**इब्राहीमखां** (तसें करतो. इतक्यांत कपिला चौताळून येऊन मागून त्याच्या पाठींत शिंगें भोंसकते तों अवचित शिवाजी महाराजही आपल्या टोळीसह तेथेंच येतात व हा अनर्थ बघून ते झट् मोंगलांवर तुटून पडतात व त्यांस खालीं पाडून त्यांच्या उरावर वसतात. )

**सर्व शिपा०**-( चरफडत ) तोवा ! या इलाहीः ! इत्नेमें यह क्या गजव् हुआ !! ये कौन् षक्स !

[ अरेरे ! हे ईश्वरा ! इतक्यांत हा काय अनर्थ झाला !! हीं कोण माणसें ! ]

**शिवाजी**–( आवेशानें ) तुम् नापाकोंको जाहन्नमें भेजनेवाले फरिषतें हैं ! ऐ बेवकूफों, एक पाक गरीव हिंदु औरत्पर इस् कदर जुल्म करते हो ? चाखो इस् जुल्मका फल–( एकाच्या उरांत खंजीर मारतो व ) हां हिरोजी, निराजी, वावाजी, काय वघतां–खुपसा गुलामांच्या उरांत खंजीर व करा ठार.

[ तुम्हां अधमांना नरकपुरींत पाठविणारे देवदूत आहेत ! हे मूढांनो, एक निर्दोष गरीव हिंदु स्त्रीवर असा जुलूम करितां ? चाखा या जुलमाचें फळ. ]

**हिरोजी वगैरे** ( दुसऱ्या मोंगल शिपायांस मारतात. )

**शिवाजी**–( सहर्ष ) ठीक झालें. मिळतील तिथें गुलामांना आतां

असेच छाटायचे. (मूर्च्छित झालेल्या स्त्रीजवळ जाऊन) अहा! गरीब बिचारी स्त्री! अगदीं बेहोश पडली आहे!

**निराजी**–बरें झालें. आपण वक्तशीर येऊन पोंचलों. नाहीं तर या मांगांनीं हिचे हालहाल केले असते. (इतक्यांत कपिला येऊन तिला हुंगते.)

**शिवाजी**–(गाईजवळ जाऊन तिच्या पायां पडतो.) अहा! निराजी, पशूला देखील गरीबाची माया आहे, व रक्षणकर्त्याची ओळख आहे. असो. मला वाटतें ही त्या ब्राह्मणाचीच मुलगी असावी! जा, त्याला इथें घेऊन या. येतांना थोडेंसें पाणी पण आणा त्या ओढ्यांतलें आपल्या कटोऱ्यांत.

**निराजी**–जी. (जाऊन मुलांसह त्यास घेऊन येतो.)

**विष्णु०**–महाराज, कुठें आहे, कुठें आहे ती माझी लाडकी अंबा?

**शिवाजी**–(दाखवून) ही पहा.

**विष्णु०**–(तिला मूर्च्छित पाहून) हाय हाय! (मूर्च्छित होतो.)

**हिरोजी**–अरेच्चा! ह्यो बामनबी बेभान झाला बगा!!

**शिवाजी**–कसा नाहीं होणार? प्रसंगच तसा आला होता. असो. निराजी, डोळ्यांला पाणी लावून त्याला सावध करा. मुलांनो, पाणी लावा त्या मुलीच्या डोळ्यांला. भिऊं नका. ती आतां सावध होईल.

**निराजी** व **मुलें** (तसें करतात. दोघेंही सावध होतात.)

**मुलें**–झालीं सावध!

**अंबा**–(शिवाजीस पाहून भयानें) आले–अगदीं जवळ आले! (पुनः डोळे मिटते.)

मराठी ठाणे. १२३

**विष्णु०**–(उठून तिला आपल्या उराशीं धरतो) बाळे, सावध हो, भिऊं नको. हे आपले गोब्राह्मणप्रतिपालक शिवाजीमहाराज आहेत.

**शिवाजी**–निराजी, आपणांला मोंगल समजून ही पुनः भ्याली.

**निराजी**–असें खचीत.

**अंबा**–(डोळे उघडते व बापास पाहून) कोण बाबा!

**विष्णु०**–(कुरवाळून) होय तोच मी. अहाहा! माझी लाडकी!

॥ **पद** ॥ (राग भैरवी.)

**व्याघ्रमुखांतुन सुटली! माझी चिमणी हरिणी!! ध्रु० ॥**

**दुःख, शोक, भय, चिंता, मनिंचीं। क्षणांत दूर जाहलीं! व्याघ्र०॥**

(इतक्यांत कपिला येऊन त्याला हुंगते. तिच्या पाठीवर हात फिरवून) वाहवा! कपिला पण जीवंत आहे!

**मुलें**–पण, तिचा वत्स त्या अविंधांनीं त्या पाठशाळेंत मारला!

**विष्णु०**–अरेरे! गरीब विचारा उपकारी प्राणी! किती हा निर्दयपणा!!

**शिवाजी**–मांगांपेक्षांही निर्दय! सर्पसत्रासारखें त्यांचें महासत्र आरंभिल्या खेरीज नाहींच आपला देश निर्भय व सुखी व्हायाचा.

**विष्णु०**–आतां तेंच.

**अंबा**–हे फकीर असून असें काय बरें बोलतात बाबा?

**विष्णु०**–मुली, मीं मघां सांगितलेलें नाहीं वाटतें तुझ्या लक्षांत? हे फकीर नाहींत. हे गोब्राह्मणप्रतिपालक, स्वधर्म व स्वदेशरक्षक आपले श्रीशिवाजीमहाराज. कांहीं संकटामुळें त्यांनीं हा पांडवांसारखा अज्ञातवास धारण केला आहे.

**अंबा**–असें! तर मग श्रीअंबाबाई यांना सुखी ठेवो.

**शिवाजी**–महाराज, अंबाबाईच्या कृपेनें आपली मुलगीही आप-

त्याला कपिलेसह सुखरूप भेटली. आतां, आपण सर्वांनीं मजबरोबर चलावें. यथाशक्ति मी आपली सेवा करीन.

**विष्णु०**–अहाहा!! महाराजांचें मन किती उदार, किती विनयसंपन्न व किती दयाळू आहे? आमची आतां मनापासून हीच इच्छा आहे कीं–(मुलें व अंबा)

॥ **पद** ॥

हो विजयी संगरीं। शिव हरि रघुपरि घोर समर करीं। हो वि०॥
प्रबल यवन खल मारुनि निजपद करि स्थिर ह्या महीवरी॥ हो वि०॥
गोब्राह्मणगण रक्षुनि संतत। भय चिंता करीं दुरी॥ हो वि०॥

**शिवाजी** (त्यांच्या पायां पडतो. सर्व जातात.)

---

## प्रवेश ९ वा.

**स्थल**–रायगड–महाराजांचा महाल.

**सईबाई**–लक्षे! आतां बाई मी काय करूं? खरोखर—

॥ **पद** ॥ (राग परज.)

ते पाय मला अंतरले। कैसें विपरीत घडलें?॥ ते पाय० ध्रु०॥
दुर्लभ दर्शन; हें मजवरती आकाशचि कोसळलें॥ ते पाय०॥
या विरहाच्या दवाग्निंत मी कैसिं अवचित पडलें? ते पाय०॥
हे जगदंबे, कुळस्वामिणी धांव संकट ओढवलें! ते पाय०॥

**लक्षी**–त्य संमद खर. पुन बाईसाव, इळभर अस दुक्क करीत बसाल त कस व्हईल? अंबाबाई करील त महाराज खुशाल येत्याल बगा.

**सईबाई**–लक्षे, मला तर बाई आतां कांहींच सुचत नाहीं. वेड्यागत माझी अवस्था झाली आहे! अंबाबाईच आतां काय करील तें खरें! असें जिवावरचें संकट बाई यामागें कध्धींच नव्हतें आलें! लक्षे! तो मोंगल किनई निव्वळ झेरी नाग आहे बरें का! तिथें जातांना

॥ पद ॥

नका जाऊं दिल्लिसीं त्या ह्मणुनि बहु पार्थिलें ।
परि अभिमानीच ते त्यांनीं नच ऐकिलें ॥ ध्रु० ॥
जाणुनि पडतां जाऊनि आपण ज्वलत्त अग्निमुखांत ।
कैसा नाहीं होईल तेणें । निजप्राणांचा घात ।
तैसेंच हें जाहलें ॥ नका जा० ॥

**लक्षी**–पुन बाईसाब, जे व्हनार त्य कंदीं चुकतया हुई ?

**सईबाई**–नाहींच चुकत. पण, खरें ह्मणशील तर किनई लक्षे, माझा बाई आतां धीरच अगदीं खचला! कश्री आतां त्या काळाच्या विक्राळ दाढेंतून सुटका व्हायला ? आहा !

॥ अंजनी गीत ॥

काय करूं मी या राज्याला । स्मशानापरि भासे मजला ॥
दुःखाग्नि करी दग्ध तनूला । गेली सुखशांती ! ॥

( असें ह्मणून रडते इतक्यांत जिजाबाई येते.)

**लक्षी**–( जीजाबाईस पाहून ) बाईसाब, बाईसाब; बगा आईसाब इकडच येत्याती.

**जिजाबाई**–( येते. सईबाई उठून उभी रहाते. ) लक्षे,

**लक्षी**–जी; आईसाब.

**जिजा०**–जा, मोरोबांना मी इथें आहें ह्मणून सांग.

**लक्षी**–जी. ( जाते. )

**जिजा०**–( सचिंत ) माझा लाडका, त्या विकाळ मगरमिठींतून एकदाचा सुटला आहे; पण देवा! वाटेंत त्याला काय काय संकटें आलीं असतील ? आई अंबे! श्रीस्वामीमहाराज! माझ्या शिववाचें रक्षण करणारीं आतां तुह्मीच आहांत.

**सईबाई**–( आपल्याशीं ) माते अंबे, तर मग कां वरें नाहीं अझून येथें होत ?

**मोरोपंत**–( निराजीसह प्रवेश करून व अदबीनें ) आईसाहेबांची काय आज्ञा आहे ?

**जिजा०**–मोरोबा, आणखी कांहीं बातमी मिळाली आहे का माझ्या शिवबाची ?

**मोरोपंत**–आईसाहेब, बातमी तर शुभच आहे ! महाराज खुशाल आहेत !

**जिजा०**–( सहर्ष ) माझा लाडका खुशाल का आहे मोरोबा ?

**सईबाई**–( आनंदानें मनांत ) अहाहा ! अंबाबाईला माझी दया आली ! माते अंबे, माझा लाडका शंभु पण खुशाल असेल का ?

**मोरोपंत**–आईसाहेब, आतांच हें आनंदाचें वर्तमान आपल्या निराजीपंतांनीं मला सांगितलें.

**जिजा०**–निराजी, तूं केव्हां आलास बाबा ? खुशाल आहेना माझा शिवबा ?

**निराजी**–महाराज खुशाल आहेत. मी नुकताच आलों.

**सईबाई**–( प्रसन्नमुद्रेनें ) माते अंबाबाई ! तुझी मी कशी उतराई होऊं ?

**जिजा०**–पण, माझा लाडका, सध्या कुठें आहे निराजी ?

**निराजी**–भागानगरापर्यंत मी महाराजांबरोबरच होतों. पण 'मी सुखरूप येत आहें' हें कळविण्यासाठीं त्यांनीं मला इथें अगोदर धाडलें.

**जिजा०**–( सहर्ष ) आतां बरीक माझ्या जीवांत जीव आला ! आई अंबाबाई ! श्रीस्वामीमहाराज ! माझीं पाडसें मला एकदाचीं सु-

शिवाजीचे दिल्लीहून परत येणें.



स्वरूप आणून लौकर भेटवावीं, इतकीच आपल्या पायांशीं माझी विनंती आहे.

**निराजी**–मातोश्री, अंबाबाई करील तर महाराज आज–उद्यांच्या आंतच इथें येतील.

**जिजा०**–तुझे बोल खरे होवोत.

**सईबाई**–तुझें तोंड मी साखरेनें भरीन!

**हुजऱ्या**–( आनंदानें प्रवेश करून ) आईसाव, आईसाव! आपल महाराज येत्याती!

**जिजा०**–( सहर्ष उठून ) कोण–माझा शिवबा?

**सईबाई**–काय स्वारीचें येणें?

**हुजऱ्या**–जी, हिंग त्येच. ( पडद्याकडे पाहून ) ह्य वगा आल हकडच!!

**शिवाजी**–( येतो व सप्रेम ) मातोश्री! ( भेटून पायां पडतो. )

**जिजा०**–( भेटून व कुरवाळून ) अहाहा! माझ्या लाडक्या–(डोळे आनंदाश्रूंनीं भरतात. कंठ सद्गदित होतो.)

**सईबाई** ( सहर्ष त्याच्या पायां पडते. )

**शिवाजी** ( प्रेमदृष्टीनें तिजकडे पहातो, इतक्यांत निळोपंत शंभूस घेऊन येतो. )

**निळोपंत**–( विनयानें ) हे आपले धाकटे महाराज.

**संभाजी**–आई! (धांवत जाऊन आईच्या कमरेस मिठी मारतो.)

**सईबाई**–( भेटते व मुका घेऊन ) माझ्या चिमण्या शंभु! ( डोळे आनंदाश्रूंनीं भरतात. )

**जिजा०**–( संभाजीस जवळ घेऊन त्याला कुरवाळते व मुका घेऊन ) माझ्या तान्हुल्या! ( कंठ सद्गदित होतो. )

**मोरोपंत**–( मुजरा करून ) महाराज !

**शिवाजी**–मोरोबा ! ( भेटतात. ) खुशाल आहांतना ?

**मोरो०**–महाराज खुशाल आलेत, आतां खुशालीला काय कमी आहे ? ( इतक्यांत तान्हाजी वगैरे येतात. )

**तान्हाजी**–( महाराजांस कडकडून भेटतो. ) माझे जीवलग महाराज ! ( गळा आनंदानें भरून येतो. )

**शिवाजी**–( भेटून ) माझ्या संवगड्या शूर तान्हाजी !

**बहिर्जी**–(धांवत येऊन गच्च पाय धरतो.) माझ परतापी महाराज !

**शिवाजी**–माझ्या प्रामाणिक बहिर्जी ! अहाहा ! ! कोण आनंदाची वेळ ही ! ( महाराज आल्याची बातमी गडभर पसरते. राजवाड्यांत लोकांची एकच गर्दी होते. महाराज ती पाहून ) जिव्हाळ्याचीं सर्व माणसें मला आज भेटलीं ! ( आंत जयघोष होतो तो ऐकून ) या जयघोषानें माझे कान तृप्त झाले ! केवढें हें प्रजेचें मजवर निष्कलंक प्रेम ! आनंदसागरांत माझें मन पोहत आहे ! !

**जिजा०**–शिवबा, भरतभेटच ही !

**शिवाजी**–खरेंच ! श्रीसमर्थांची व अंबाबाईची कृपा आह्मांवर किती आहे ह्मणून सांगूं ?

**जिजा०**–त्यांची आपणांवर पूर्ण कृपा आहे, ह्मणूनच तूं बाबा त्या घोर संकटांतून पार पडून आज आह्मांला भेटलास.

**शिवाजी**–खरें आहे मातोश्री.

**सईबाई**–माते अंबे ! शेवटीं तूं आह्मां अवघ्यांना आज आनंदमंदिरांत आणून बसविलेंस ! तुझी लीला अगाध आहे.

**जिजा०**–( शिवाजीच्या पाठीवर हात फिरवून ) माझा लाडका,

कसा अगदीं भणंग फकीर बनला आहे ! समजलें मी तूं कां फकीर बनला आहेस तें.

**शिवाजी**–( विनयानें ) चतुर माणसांना अशा गोष्टी तेव्हांच समजतात.

**लक्षी**–( हळूच सईबाईस ) बाईसाव, बगा ! महाराज कस अक्शी फकिरावानी दिसत्याती !

**सईबाई**–( रागानें हळूच ) दिसूंदेत. बैस गप्प. मेली थट्टा करायला तेवढी तयार एका पायावर !

**लक्षी**–( हसून हळूच ) न्हाई बाईसाव, चुकलें.

**शिवाजी**–मोरोबा, दिल्लीहून परतलेलीं सर्व माणसें बिनधोक येऊन पोंचलींना इथें ?

**मोरो०**–होय, महाराज.

**शिवाजी**–ठीक. रस्त्यांत आमच्यावर मधून मधून फारच भयंकर प्रसंग गुदरले !

**मोरो०**–निराजीपंतांनीं तें एकंदर वर्तमान सांगितलें. आपण ह्मणूनच त्यांतून पार पडलांत.

**शिवाजी**–असो; यापुढें आतां तुह्मी सर्व आपापली जय्यत तयारी करा. पहिल्यानें गनिमाच्या ताब्यांत दिलेले आपले सगळे गड कोट, झट् परत घ्या. शिवाय, त्याचा मिळेल तो मुलूख सर करून, आपल्या राज्यास मिळवा. आपल्या मराठ्यांचा दरारा व सामर्थ्य त्या तुर्काला पुरेपूर दाखवून, त्याची बालंबाल खात्री करा; व ' शिवाजी हा सगळ्या दक्षिणचा खरा राजा आहे ' हे शब्द त्याच्या तोंडून खरे करवा.

**मोरोपंत**–( आवेशानें ) महाराज, त्या तुर्कांच्या मगरमिठींतून

आपली सुटका होऊन आपण येथें केव्हां याल, अशी सगळ्यांना रात्रं-दिवस मोठी चिंता लागली होती. पण, श्रीअंबाबाईनें तो सोन्याचा दिवस आज दाखविला! दिल्लींत व तेथून परत येतांना महाराजांवर व आपल्या इतर लोकांवर गुदरलेल्या भयंकर प्रसंगांची खबर ऐकल्या-पासून, आपले सगळे मऱ्हाठे वीर, सूड उगविण्याची संधि केव्हां मिळते, याची वाट पहात बसले आहेत. त्यांत, महाराजांचा हुकूम झाला. आतां काय? हरणांच्या कळपावर जसा सिंह, किंवा पर्वतावर जसें वज्र किंवा मेघमंडळावर जसा झंझावात, किंवा खांडववनावर जसा दावानल, तसे आह्मी सर्व, त्या तुर्कांवर तुटून पडूं. त्यांची कत्तल करून सारें र-णमैदान–रक्तबंबाळ करूं. यवनवस्तांच्या रक्तानें विक्राळ रणदेवीला स्नान घालूं. त्यांच्या मांसाच्या पूर्णाहुतीनें तिला तृप्त करून, जयघो-षानें सारें आकाश दुमदुमवून 'श्रीशिवछत्रपतिविजयपताका' शत्रूंच्या दुर्गावर फडकवूं.

**तान्हाजी**–महाराज, ह्यो भयरी ससाना तान्हाजी, पाखरागत त्या नोड्यांच्या माना मुरगाळील. वागागत त्येंच्या नरड्या फवाडिल. चिखलागत त्येंच रकत मास तुडवील; अन आपल्या संमद्या धारकऱ्या सकट, ढाल फिरंग परजून, अन ह्यो झेंडा घेऊनशी त्या नोड्यांच्या उरावर, हिंग कस्सा–कस्सा–भैरवागत अक्शी थैय थैय नाचल!

**शिवाजी**–शाबास! माझ्या रणशूर वीरांनो, शाबास! केवढा हा तुमचा आवेश! या वेळीं तुह्मी सर्व कृतांत काळासारखे दिसतां!! वी-रश्रीचा पूर्ण संचार तुमच्यांत झालेला पाहून, मी छाती ठोकून सांगतों कीं, तुह्मी हा मऱ्हाठशाहीच्या जयाचा झेंडा, ह्या रायगडावर खचीत लावाल.

**सर्व वीर**–तुरत्या रायगडावरच नाहीं. थेट अटकेपर्यंत लावूं अटकेपर्यंत–

**शिवाजी**–वाहवा! केवढा हा तुमचा दृढनिश्चय!! श्रीअंबाबाई हा सफल करो.

**सर्व**–(आपल्या तलवारी उपसून आवेशानें) तसेंच होईल. जय–जय! श्रीअंबाबाईचा जय!! जय! श्रीशिवाजी माहाराजांचा जय– (सर्व आवेशानें नाचत नाचत जातात.)

## सहावा अंक समाप्त.

---

# अंक ७ वा.

## प्रवेश १ ला.

### स्थल–रायगड. एक चावडी.

**मानाजी** ( पोषाख करून पानसुपारी खात बसला आहे इतक्यांत संताजी येतो. )

**संताजी**–रामराम, मानाजीराव, रामराम.

**मानाजी**–रामराम; संतवा, या कीव, लया रोजान भ्याट झाली राव. ( इतक्यांत जानराव वगैरे येतात. )

**जानराव** व **कोंडाजी**–रामराम मानाजीराव, रामराम, संतवा, रामराम–

**माना०** व **सं०**–रामराम, रामराम, या कोंडाजी. ( अमळ न्याहाळून पाहून ) कुन? जानराव हुई?

**कोंडाजी**–व्हय. त्योच गब्रू.

**माना०**–हिंग अस्स ! गडी राव भला जवान वनलया. वसा कीव जानराव.

**जान०**– ( वसून ) हिंग पा सा वरसानी मानाजी दादाची भ्याट झाली नव्ह का ?

**माना०**–व्हय. अन झगुनच राव न्हाइ तुमासनी वळकल.

**कोंडाजी**–कशी वळक पटनार? आपल झाराज दिलीकुंड आल्यापुन मोंगलाईमंदीं त्यांच्या जत तत सारख्या मोहिमीवर मोहिमी चालल्याती. अन आपल जानराव पडले जवान मर्दान गडी. तव्वा अ-

सली बान्दार पुऱ्या दमाचीं मानस रिकामीं कुनकड घावायचीं तुमासनी घडी घडी भ्याटायला ?

**माना०**–हिंग त्य बी खर हाये.

**जान०**–वडिल मानस का ह्मनतील त्य खर.

**माना०**–(सर्वांस तंबाखू देऊन) भवानीच्या किरपेन राव आपल्या ह्मराजांची जत तत अक्शी फते होऊन, आपल्या ह्मराटशाहीचा झेंडा आज ह्या रायगडावर अक्शी डंक्यान फडकतुया ! आपल संमद धारकरी, गडकरी, मोठ मोठ मानकरी अन संमद्या मुलखाचीं शेंकडो मानस ह्या रायगडावर जमल्याती.

**कोंडाजी**–खरे हाये. मोंगलाच्या कैदेमंदून आपल ह्मराज सुटतील, अन त्येंची जत तत फते होऊन, असा सोन्याचा दिस उगवल, ह्य राव, कुनाच्या सपनामंदींवी न्हवत वगा.

**जान०**–आपल्या ह्मराजाच ध्यात अन हुन्नर राव कुनासनीवी न्हाई सादायच. योक धारकरीवी न्हाई न्हाउ दिला त्येंनीं मोंगलाच्या कैदेमंदीं. संमदीं मानस अशा हरिफिन तकुंड पार केलीं कि हिंग, दिलीचा मोंगल मनगट चाचावून वसला जागच्या जागीं गप.

**संताजी**०–हिंग वर आठवल. ह्मराज दिल्लीपुन परत आल्यावर त्येंनीं ह्या पा सा वरसामंदीं मिळवलेल्या फतेचा पवाडा, आमच्या कोंडाजी रावान लई फाकड्र रचलया वगा ! संमदी ह्मराजांची मर्दुमकी त्यामंदीं दावलिया. ह्मंगा कीव तिकूता पवाडा कोंडाजी राव.

**मानाजी**–ह्मंगा कीव कोंडाजी. आजचा दिसवी खुशालीचाच हाये.

**कोंडाजी**–बर हाये–(साथीनें ह्मणतात.)

## ॥ पवाडा ॥

शिवछत्रपति सूर परतापी अवतार शंभूचा
करिती मोड मोगलाचा । हो जी० ध्रु० ॥
राज दिल्लिपुन परत आल्यावर करिती मोहिमेची
तयारी मोठ्या बानीची । हो जी० ॥
पाशें मावळे देउन तानाजी सिंहगडावर
धाडला मर्द झुंजार । हो जी० ॥
गड घेतला पुन त्यो गतला तानाजी रनसूर
राजे हळहळल फार । हो जी० ॥
भाव त्येचा पुन्या दमाचा सूर्याजीराव
राखी गडी त्येच नांव । हो जी० ॥
कल्यान, भिवडी अन ह्माउली झट करुनि सर
केल मोगल ब्याजार । हो जी० ॥
घाली घेरा पन्हाळगडाला सिद्दी जोहार
संग घे अब्रदल्याच प्वार । हो जी० ॥
फळी फोडुन जाती निघुन राज रांगण्यावर
बांजि करि गनिमाची हार । हो जी० ॥
फिरुन दिल्लीचा मोगल लढाया झाला तय्यार
धाडले मस्त सरदार । हो जी० ॥
पुन्या दमान लढुन धिरान मोगल लस्कर
मारिती मराठ रनसूर । हो जी० ॥
मोठ्या बानिची लढाय सालरची मोगलाबरावर
करती मराठ बान्दार । हो जी० ॥
भिवुन मोगल रानोमाळ पळती झरझर
बगुनी मराठ्यांचा मार । हो जी० ॥
अबदुल करिमा संग लढता परतापराव गुजर
झाल रनामंदीं ठार ! । हो जी० ॥

पुन हंसाजी पांचहजारी करी त्येची हार
घेई झट मर्द जेसर । हो जी० ॥
पडल गुजर ऐकुन राज झाल दिलगीर
नेमल तत राव हंबिर । हो जी० ॥
संपगांव, सातारा, कोपल, कऱ्हाड, कोल्हापूर
हुकेरी, चंदनगांव, धार । हो जी० ॥
घेउन; अशि लई ठानि बसवती आपला अखत्यार
वाढल मऱ्हाठ्याच ज्वार । हो जी० ॥
हारले मोगल रोविति राजे झेंडा फत्तेचा
पुऱ्या राव मऱ्हाठशाहीचा । हो जी० ॥

**सर्व०**–शेवास कोंडाजी, शेवास! अक्शी वहार उडवली राव! (इतक्यांत आंतून शिंग व डंका वगैरे मंगल वाद्यें वाजतात तीं ऐकून)

**जान०**–दरवारच्या तयारीच सिंग नव्ह का ह्यें?

**कोंडाजी**–(ऐकून) व्हय. हिंग त्येंच. चला की राव. आतां आपले सूर परतापी शिवाजीम्हाराज गादीवर कस सोवत्याती, त्यो समदा थाट वगू.

**सर्व**–हिंग चला की–(जातात.)

---

## प्रवेश २ रा.

### स्थल–रायगड–रस्ता.

**गोविंदभट**–नमस्कार रामभट, नमस्कार. आज तर वोवा तुमची भारीच धांदल उडाली आहे.

**रामभट**–(उभा राहून) धांदल कशाची? चाललेंच आहे. असे दिवस वारंवार येत असतात का गोविंदभट?

**गोविं०**—पण असें पहा रामभट, तुह्मी पडलांत वाळंभटजींचे आश्रित. वाळंभट ह्मटले ह्मणजे आजकाल महाराजांचे मुख्य पुरोहित. सांप्रत ते ह्मणतील ती पूर्वदिशा. पाहिलेंतना, कालच्या महाराजांच्या मौंजिबंधनादि विधिप्रसंगीं त्यांची कशी संभावना झाली ती? वाळंभटजी मोठे नशीबवान खचीत.

**राम०**—अहो गोविंदभट, ह्या सर्व पूर्वपुण्याईच्या गोष्टी आहेत. तेंच कशाला, आपले श्रीशिवाजीमहाराज, अशा योग्यतेस चढतील व अशा थाटानें त्यांस राज्याभिषेक होईल, हें ह्या मोंगलांच्या जुलमी कारकीर्दींत कोणास तरी वाटलें होतें काय?

**गोविं०**—नाहींच; उलट आणखी अशी भीति होती कीं, औरंगजेबासारख्या क्रूर, जुलमी अविंधाच्या कैदेंतून आपले महाराज आतां कसले सुटतात?

**राम०**—नक्कीमिठीच ती. ऐकून, सगळ्यांचें धाबें अगदीं दणाणलें होतें!

**गोविं०**—कसें नाहीं दणाणणार? मला तर रात्रंदिवस अशी कांहीं भीति वाटत होती कीं, यापुढें आपला धर्म साफ बुडणार व सर्वांचीं शिखासूत्रें तुटून, सुंता होऊन, अवघा देश अविंधमय होणार.

**राम०**—खरेंच. महाराज दिल्लीहून परत येतपर्यंत सर्वांना अशीच भीति पडली होती. पण, श्रीच्या कृपेनें तो घोर प्रसंग एकदाचा टळला. फार चांगलें झालें.

**गोविं०**—रामभट, खरोखर ह्मणाल तर आपले श्रीशिवाजीमहाराज हे एक अद्वितीय पुरुष आहेत.

**राम०**—ह्मणूनच तर अशा पराक्रमाच्या व धर्मरक्षणाच्या गोष्टी त्यांच्या हातून घडल्या. अहो, अवतारी पुरुषच ते, रामभट.

**गोविं०**—असें तर खरें. असो; पण रामभटजी, हा राज्याभिषेकोत्सवाचा अद्वितीय समारंभ अवलोकून, मला तर बोवा पुराणांतील रघुराजाच्या राज्याभिषेकोत्सवाच्या वर्णनाचें स्मरण होत आहे! अहो, ह्या रायगडाची केवळ अयोध्यानगरीच बनली आहे! गुढ्या, तोरणें, पताकादिकांनीं सगळा गड अगदीं शृंगारला आहे!! सर्व सेना, मानकरी, गडकरी, अधिकारी, याज्ञिक, शास्त्री, पंडित, तुमच्या आमच्या सारखी भिक्षुकमंडळी—वगैरे सर्व प्रकारचे लोक, आपल्या लवाजम्यानिशीं इथें आले आहेत. गडभर जिकडे तिकडे नाच, तमाशे, नानाप्रकारचे खेळ, ह्यांचा तर चार पांच रोज एकसारखा धुमाकूळ उडाला आहे! रणवाद्यांच्या व मंगलवाद्यांच्या घोषांनीं तर अवघा प्रांत अगदीं दुमदुमून गेला आहे! आणि आजचा दिवस राज्याभिषेकाचा! मग काय पुसतां? जिकडे तिकडे आनंदी आनंद!!

**राम०**—अशा महोत्सवाच्या गोष्टी वारंवार का होत असतात गोविंदभट?

**गोविं०**—तें तर खरेंच. (तपकीर देतो व आपण ओढून आठवल्यासारखें करून) हो, बरी आठवण झाली. कायहो रामभट, राज्याभिषेकानंतर महाराज आपली सुवर्णतुला करणार ह्मणून ऐकतों. खरें का हें?

**राम०**—होय. अहो, हा सर्व त्या गागाभटजींचा प्रताप! मोटा अपरसूर्य ब्राह्मण! एवढी याज्ञिक, शास्त्री, पंडित मंडळी जमली आहे, पण त्यांच्यापुढें कोणाची मात्राच नाहीं चालत. सगळीं शास्त्रें गायत्रीतुल्य त्यांच्या मुखोद्गत. केवळ बृहस्पतीच ते!

**गोविं०**—त्या द्रविडाची स्तुति करावी तितकी थोडीच. महाराज क्षत्रियकुलोत्पन्न असून, त्यांस राज्याभिषेकाचा पूर्ण अधिकार आहे हें

सशास्त्र प्रतिपादन करून, प्रतिपक्षीय ब्राह्मणांचीं तोंडें त्यांनींच वंद केलीं. (इतक्यांत राज्याभिषेक झाल्याचीं मंगलवाद्यें वाजतात, तीं ऐकून) राज्याभिषेक झाला वाटतें?

**राम०**–(ऐकून) तर हो! हा जयघोष! हा मंगलवाद्यांचा ध्वनी चालला आहेना! गप्पाष्टकांत इथें गुंतलों नसतों, तर आपल्या दृष्टीस पडला नसता का तो समारंभ?

**गोविंद०**–(वाईट वाटल्यासारखें करून) रामभटजी, क्षमा करा. असो. चला आतां पुढील शिष्टाचार तरी अवलोकन करूं.

**राम०**–हं, चला; चला तर मग. (जातात.)

---

## प्रवेश ३ रा.

### स्थल–रायगड–राजसभा.

(विधिपूर्वक राज्याभिषेक होऊन श्रीशिवछत्रपतिमहाराज सिंहासनावर बसले आहेत. सर्व मंडळी आपापल्या अधिकाराप्रमाणें नेमलेल्या जागीं बसली आहे. इतक्यांत आंतून–)

**पहिला स्तुतिपाठक**–जयजयकार महाराज–

॥ गद्य ॥

धन्य धन्य शिव भूपाला। पूर्ण करुनी हेतु आपुला॥
शोभसी ऐश्वर्यउदयाचला। मार्तंड जैसा॥
प्रबल खल शत्रुसी। अतुल बल दाविसी॥
हिंदुसत्ता स्थापिसी। महाराष्ट्रीं ह्या॥

**दुसरा स्तु०**–जयजयकार महाराज–

गोद्विजधर्मरक्षावया। सदा झटसी भूपवर्या॥

पाहुनि तव अतुल शौर्या । चकित सारे ॥
विजय तूझा सदा । हो दूर जनापदा ॥
वसो चिर सुखसंपदा । राज्यीं तुझ्या ॥
जयजयकार महाराज–

**पहिला भाट**–( प्रवेश करून )

***कवित.**

**तेरो तेज सरजा समथ्य दिनकरसो है दिनकरसो है तेरे तेजके निकरसो ॥ भौंसिला भुवाल तेरो जस हिमकरसो है हिमकरसो हैं तेरे जसुके अकसरसो॥भूपन भनत तेरो हियो रत्नाकरसो है रत्नाकरौ है तेरे हिय सुखकरसो ॥ साहिके सुपूत सिव साहिदानि तेरे करु सुरतरुंसो हैं सुरतरु तेरे करसो ॥**

[ हे शिवराजा, तुझें तेज सूर्यासारखें आहे. तुझ्या तेजानें सूर्यहि विशेष शोभत आहे. हे भोंसले-वंशांतील राजा, तुझें यश चंद्रासारखें आहे व तुझ्या यशरूप किरणांनीं चंद्र विशेष शोभायमान दिसत आहे. कवि भूषण म्हणतो कीं, तुझें हृदय सागरासारखें आहे व तुझ्या हृदयाच्या योगानें सागर विशेष सुखकर वाटत आहे. हे राजपुत्रा शिवाजी, तुझे दानशील हात सुरतरूसारखे आहेत, व तुझ्या हातांनीं सुरतरू शोभत आहेत. ]

**दुसरा भाट**– ***कवित.**

**इंद्रजिमिजंभपर वाडव ज्यों अंभर रावन सदंभपर रघुकुल राज हैं॥ पौन वारिवाहपर शंभु रतिनाहपर ज्यौं सहस्रवाहपर रामद्विजराज-है ॥ दावाद्रुमदंडपर चीता मृगझुंडपर भूपन वितुंडपर जैसे मृगराज-है ॥ तेज तमअंसपर कान्ह जिमि कंसपर त्यौं मेलेंच्छवंसपर सेर शिवराज है ॥**

[पर्वतावर जसा इंद्र, समुद्रावर जसा वडवानल, रावणावर जसा राम, मेघावर जसा वायु, मदनावर जसा शंकर; सहस्रार्जुनावर जसा भार्गवराम, वनावर जसा अग्नि, मृगांच्या झुंडीवर जसा चित्ता, हत्तीवर जसा सिंह, अंधकारावर जसा प्रकाश, कंसावर जसा कृष्ण, तसा मुसलमानांवर तूं नरसिंह शिवराज आहेस.]

प० भाट- *कवित.

कुंभकरण असुर अवतारी औरंगजेब कीनी मथुरा कतल दुहाई फरी रबकी ॥ खोद डारे देवीदेव सहर महल्लावांके लाखों किये मुसलमान माला छूटगई तबकी ॥ भूषन भनत भागो काशीपति विश्वनाथ और कौन गिनतीमैं जहांभूलीगत भवकी ॥ चारों वरण धरम छोड कलमा निवाज पढै सेवाहू न होत तो सुन्नत होत सबकी ॥

[कुंभकर्णाचा अवतार जो औरंगजेब, त्यानें मथुरेची कत्तल केली; सर्वत्र शोक पसरला! देवी, देव, शहरें, गल्ल्या हीं खणून टाकलीं. लाखों लोक मुसलमान केले. गळ्यांतील माळा तुटल्या. भूषण म्हणतो, काशीविश्वेश्वरच जर पळाला, तर मग इतरांची काय कथा? चारी वर्णांतील बहुत लोक धर्मभ्रष्ट होऊन कलमा पढूं लागले. पण, शिवाजी महाराज, जर आपण नसतां, तर सर्वांच्या सुन्ताच झाल्या असत्या.]

दु० भाट- *कवित.

वेद राखे विदित पुरान राखे सारसुत रामनाम राख्यो अति रसना सुधरमें ॥ हिंदुनकी चोटीरोटी राखी है सिपाहिनकी कांधेमें जनेउ राख्यो माला राखी गरमें ॥ मीड राखे मुगल मरोड राखे बादशाह वैरी पीस राखे बरदान राख्यो करमें ॥ राजनकी हद्द राखी तेरा बल शिवराज देव राखे देवल स्वधर्म राख्यो घरमें ॥

[हे शिवराज, आपण वेद, पुराण, काव्य, रामनाम ह्यांचें रक्षण केलें. हिंदूंची शेंडी राखिलीत, वर्णाश्रमधर्माचें रक्षण केलें. द्विजांचें जानवें व माला ह्यांचेंही रक्षण केलें. आपण मोंगल पिळून टाकले; बादशाहास दाबून टाकलें; शत्रूंचें पिसून पीठ केलें; वरदान आपल्या हातीं ठेविलें. राज्याची सीमा रक्षण केली. हे शिवराज, आपल्या पुरुषार्थानें देव, देवळें, व स्वधर्माचें रक्षण झालें.]

दो० भाट- *कवित.

एक प्रभुताको धाम सजे तीन्यो वेद काम है पंचानन षडानन राजी सर्वदा ॥ सातों वार आठौं जाम जाचक निवाजे नव अवतार थिर राजै कृपानल्यो हरिगदा ॥ शिवराज भूषन अटल रहै तौं लौं जौं लौं

श्रीशिवराज्याभिषेक.



त्रिदस भुवन सब गंग और नर्मदा ॥ साहितनै साहसीक भोसिला सूरजवंश दाशरथिराज तौं लौं सरजा स्थिर सदा ॥

[एखाद्या ईश्वरमंदिरांत तीन वेद, शंकर व षडानन हे सर्वदा प्रसन्नतेनें रहातात, सात दिवस आठ प्रहर याचक द्वारीं उभे असतात व नव अवतारही तेथें स्थिर रहातात,— तसे, व हरिगदा जशी हरीच्या हातीं असते तशी आपल्या हातांत तलवार सदा चमकत राहो. भूषणकवि म्हणतो कीं, जोंपर्यंत तीन लोक, दशदिशा, गंगा व नर्मदा हीं आहेत, तोंपर्यंत हे राजपुत्र, महासाहसी, हे दाशरथी, सूर्यवंशीय भोंसले, शिवराज, आपलें राज्य स्थिर राहो.] [जातात.]

**वारांगना**—(प्रवेश करून अदबीनें) ॥ **पद** ॥ (केरवा.)

धन्य धन्य हा दिवस आजिचा । दिवस आजिचा० ॥ ध्रु० ॥
सिंहासनीं जणु रामची विलसे । नरवीर शिव भरतभूमिचा ॥ धन्य०
पारतंत्र्यतम दूर कराया । होय उदय स्वातंत्र्यरवीचा ॥ धन्य० ॥
विजय विजय सर्वत्र विजय हो । भारतीय महा विजयश्रीचा ॥ध०॥

[जातात—इतक्यांत श्रीरामदासस्वामी येतात.]

**श्रीरामदासस्वामी**—जयजय रघुवीर समर्थ—

॥ **पद** ॥

सीतारमणराम योगीजन-विराम । किमपि मना तूं विसरूं न-शे ॥ सी० ॥ ध्रु० ॥ दीनदयाघन भवभयभंजन वंदिति मुनि-चरण जयाचे ॥ सीता० ॥

य रघुवीर समर्थ—

र्वे (उठतात.)

**श्रीशिवाजी** (पूजा करून साष्टांग दंडवत घालतो.)

**श्रीरामदास०**—कल्याण. बापा शिवबा, हा तुझा राज्याभिषेको- वघून, मला फार आनंद झाला !

**श्रीशिवाजी**–श्री समर्थांच्या चरणप्रसादाचाच हा सर्व प्रभाव.

**श्रीरामदास०**–बापा शिववा, जें ज्या वेळीं होणार, तें कधींही चुकत नाहीं. हिंदुराज्याची स्थापना व्हावी, ही श्रीची इच्छाच होती. त्याप्रमाणें सर्व गोष्टी अनुकूल होऊन, हा शुभ योग घडून आला. असो. शिववा! तूं आंगचाच चतुर व दक्ष आहेस. तुला मिळालेली अष्टप्रधानादि मंडळी ही तुझ्या अर्ध्या वचनांत वागणारी आहे. तेव्हां, हा राज्यभार वाहाण्यास तूं समर्थच आहेस. बापा शिववा,

॥ पद ॥

**सदा सुखशांति असो तव राज्यीं प्रजा तुजवरती करो बहु प्रीति ॥ध्रु०॥ सदय, क्षमाशील, सात्विक, धार्मिक । असो नृपा तव वृत्ति । ॥सदा०॥ महापुरुषार्थें विजयि होउनी । दूर करी जनभीति ॥सदा०॥ निजकर्तव्यीं दक्ष राहुनी । जोडि विभव, सुख, कीर्ति ॥सदा०॥ निजपुत्रापरी रक्षि प्रजेला । सोडूं नको नय नीति ॥ सदा० ॥**

**श्रीशिवाजी** (पायां पडतो.)

**श्रीरामदास०**–शिववा! त्वां लाविलेला हा भरतभूमीचा ज्यवैभववृक्ष उत्तरोत्तर वाढत जाऊन, त्याच्या शीतल छायेखालीं प्रजा सुखसमाधानानें राहो, हीच आमची इच्छा आहे.

**श्रीशिवाजी**–( विनयानें ) समर्थांची इच्छा ह्मणजे आशीर्वादच ह

**श्रीरामदास०**–असो, पण शिववा, तुझी काय इच्छा आहे?

**श्रीशिवाजी**–समर्थ प्रसन्न होऊन विचारतात, त्यापेक्षां यापुढें